# जीमी कार्टर अमेरिकन राष्ट्राध्यक्ष - निधन

संयुक्त राज्य अमेरिका राष्ट्राचे ३९वे राष्ट्रपती तसेच अमेरिकेच्या नौसेनेतील अधिकारी जेम्स अर्ल कार्टर ज्यूनियर यांचे वयाच्या १००व्या वर्षी निधन. जिमी कार्टर हे सन १९७७ ते १९८० या काळात अमेरिकेचे ३९वे राष्ट्राध्यक्ष म्हणून कार्यरत होते. त्यांच्या अगोदर ३८वे राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन तर नंतरचे ४० वे राष्ट्राध्यक्ष रोनाल्ड रिगन यांनी काम पाहिले. जिमी कार्टर डेमॉक्रॅटिक पार्टीचे सदस्य म्हणून कार्यरत होते.

जन्म :- वाईस क्लिनिक प्लेन्स जॉर्जीया अमेरिका.

आई :- लिलियन कार्टर ह्या हॉस्पिटलमध्येच नर्स होती

वडिल :- अर्ल कार्टर शेतकरी भुईमुग व कापूस उत्पादक.

भाऊबहिण :- १९२६ ग्लोरीया, १९२९ रुथ, १९३७ बिली.

१९४१ - जिमी कार्टर प्लेन्स हायस्कुलमधून १०वी पास.

१९४१ - जॉर्जीया साऊथवेस्टर्न कॉलेज अमेरिकसमधून महाविद्यालयीन शिक्षणास सुरुवात.

१९४२ :- वरील कॉलेज सोडून जॉर्जीया इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी मध्ये प्रवेश घेतला.

१९४३ :- एनापोलीस मेरीलॅंडमधील यू.एस नेव्हल ॲकॅडमीमध्ये प्रवेश घेतला.

१९४६ :- पास होऊन संयुक्त राष्ट्र अमेरिका नौसेनेत प्रथम प्रशिक्षणार्थी म्हणून पाणबुडीवर कार्यरत.

१९५३ :- वडिलांचा मृत्यु आला म्हणून जीमी कार्टर परत पत्नी जॉर्जीयासोबत गावी जाऊन शेती करु लागले.

७ जुन १९४६ :- बहिण रुथ हिची मैत्रिण एलानोर रोझालिन हिच्याशी कार्टर यांनी विवाह केला त्यानंतर मुले १९४७ विलीयम्स, १९५० जेम्स अर्ल ३, १९५२ डॉनल जेफ्री १९६७ एमी लिन यांचा जन्म झाला.

१९६२:- जिमी कार्टर यांची जॉर्जियाच्या सिनेटमध्ये सिनेटर म्हणून निवड करण्यात आली.

१९६६:- जॉर्जिया राज्याच्या गवर्नरपदासाठी प्रथमच उभे राहीले पण पराभूत झाले.

१९७१:- जॉर्जिया स्टेटच्या गवर्नरपदासाठी दुसऱ्यांदा उभे राहीले आणि विजयी झाले.

१९७७:- संयुक्त राष्ट्र अमेरिकेचे ३९ वे राष्ट्रपती / राष्ट्राध्यक्ष पदासाठी निवडून आले.

१९७८:- कॅम्प डेव्हीड मध्ये जिमी कार्टर यांनी मिस्र चे (इजिप्त) राष्ट्रपती अन्वर अल-सदात आणि इस्त्राईलचे पंत-प्रधान मेनाखेम बेगिन यांच्या दरम्यान समझोता करार केला यातून मिस्त्र व इस्त्राईल यांच्यात शांती करार. पनामा कालवा करार

१ जानेवारी १९७९:- अमेरिकेने चीनी गणराज्यास मान्यता दिली असून अमेरिका चीन राजनैतिक संबंध प्रस्थापित झाले आणि चीनी गणराज्याची मान्यता रद्द केली.

१९७९:- इराणमधील इस्लामिक क्रांती दरम्यान नोव्हेंबरमध्ये तेहराणमधील अमेरीकन दुतावासावर सर्व विद्यार्थ्यांनी ताबा मिळविला व ५० पेक्षा जास्त अमेरिकन लोकांना बंदी बनविले. दोन्ही देशात चर्चा सफल झाली नाही म्हणून १९८० मध्ये अपयशी सैन्य कारवाई पण यात अनेक अमेरिकन सैन्य मारले गेले नंतर १९८१ मध्ये ४४४ दिवसानंतर सुटका.

१९८०:- रशियाने अफगाणिस्तानवर आक्रमण केल्यावर मास्को शहरामध्ये होत असलेल्या ऑलंपिक खेळावर अमेरिकन खेळाडूंना बंदी / बहिष्कार घालण्याचे जिमी कार्टर यांनी आव्हान केले.

१९८०:- अमेरिकन राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणूकीत द्वितीय वेळेस उभे राहीले पण रोनाल्ड रिगन यांच्याकडून जिमी कार्टर यांचा पराभव केला.

धर्म:- बॅप्टिस्ट इसाई / बॅप्टीस्ट ख्रिश्चन.

राष्ट्रपती पदाची निवडणूक हरल्यानंतर त्यांनी अनेक मानवाधिकार संस्थासोबत काम केले असून सन १९८२ मध्ये जिमी कार्टरनी ॲटलांटा, जॉर्जिया स्थित एमरी महाविद्यालयामध्ये कार्टर प्रेसिडेन्शीयल सेंटरची स्थापना केली. जी लोकशाही आणि मानवविकासावर काम करत असते.

२००२ :- जीमी कार्टर यांना शांततेसाठी नोबेल पारितोषिक देऊन सन्मान करण्यात आला.

जन्म :- जिमी कार्टर यांचा जन्म १ ऑक्टोबर १९२४ रोजी.

- जिमी कार्टर पदावर असताना भारतास भेट देणारे तिसरे राष्ट्राध्यक्ष असून त्यांच्या नावावरुन हरियाणा राज्यात एका गावाचे नाव कार्टरपुरी असे ठेवण्यात आले.
- कार्टर यांनी ६० वर्षांपेक्षा जास्त काळ करुणा भय नैतिकतेने रोगांचे उच्चाटन, शांतता, नागरी हक्क, मानवाधिकारांची प्रगती, निष्पक्षपाती निवडणूक, बेघरांसाठी घर यावर काम करीत लोकांना दारिद्र्यरेषेवर आणले.
- जिमी कार्टर अलिकडे यकृत व मेंदू विषयक विकारांनी त्रस्त होते.

-१९ नोव्हेंबर २०२३ :- पत्नी रोझालिन कार्टर यांचे वयाच्या ९६ व्या वर्षी निधन झाले त्यानंतर ते व्हिलचेअर वरच बसून होते. अंत्यसंस्कारही व्हिलचेअरवर बसून केले होते.

३ जानेवारी १९७८ :- रोझलिन आणि जिमी कार्टर यांनी नवि दिल्ली जवळील दौलतपूर नसिराबाद गावास भेट दिली. भारतास भेट देणारे तिसरे तर राजनैतिक संबंध प्रस्थापित करणारे पहिले राष्ट्राध्यक्ष कार्टर होते. त्यांची आई लिलियन यांनी १९६० च्या दशकात पिस कोअरच्या माध्यमातुन आरोग्य स्वयंसेवक म्हणून काम केले होते. या भेटीनंतर तेथील गावकऱ्यांनी कार्टर यांच्या सन्मानार्थ आपल्या गावाचे नाव कार्टरपुरी असे केले होते. ३ संसदेत दुसऱ्या दिवशी भाषण

२००६- जीमी कार्टर यांचा लोणावळा व मुंबईशी अगदी जवळचा संबंध होता. आई लिलियनने विक्रोळी येथे ६८ व्या वर्षी पिसकोअर मधून आरोग्य स्वयंसेवक म्हणून काम केले. तर जिमीनी २००६ मध्ये पाठण येथे १०० बेघरांना घरे बांधताना आठवडाभर पत्नी रोझालिनसोबत राहून 2000 स्वयंसेवकासह, बॅड पिट, जॉन अब्राहम सोबत हॅबिटेट फॉर ह्युमॅनिटी संस्थेच्या माध्यमातून घरे बांधली. ३ जाने १९७८- संसदेत भाषण.

- इजिप्त इस्त्राईल शांतता करारासाठी तसेच पनामा कालवा करारासह जागतिक शांतता आणि सुरक्षा याबाबत लक्षणीय योगदान दिले.

# रेल्वेभाडे आणि मालवाहतूक वेग.

मालगाडीच्या एकीकडे वंदे भारत एक्स्प्रेस यासारख्या सेमी हायस्पीड गाड्या सुरू करण्यात येत आहे तर दुसरी कडे मालगाड्यांची गती कमी झाल्याचे दिसून येते. सन २०१३-१४ मध्ये मालगाड्यांचा सरासरी वेग ताशी २५.१४ किमी गेला होता तो गेल्या अकरा वर्षात सरासरी २५ किमी पर्यंत कमी झाला आहे. असे रेल्वे स्थायी समितीने आपल्या अहवालात नमूद केले आहे. सदर अहवाल रेल्वे मंत्रालयाकडे सुपुर्द करण्यात आला. रेल्वेच्या उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत मालवाहतूक आहे. भारतीय रेल्वेस प्रवासी गाड्या ना नफा ना तोटा तत्वावर चालवल्या जातात. त्यामुळे रेल्वेचा वेग वाढविणे अत्यंत गरजेचे आहे. रेल्वेची वाहतूक सुलभ व वेगवान करण्यासाठी महत्वाचे पाऊल उचलले आहे. लुधीयाना ते सोननगर (१३३७ किमी) व जे एन पी टी मुंबई ते दादरी (१५०६ किमी) वेस्टर्न डेडीके-केटेड फ्रेट कॉरीडॉर असे दोन कॉरीडॉर उभारणीचे काम हाती घेण्यात आले आहे. इस्टर्न डेडीकेटेड फ्रेट कॉरिडॉर काम पुर्ण झाले असून वैतरणा ते जे.एन.पी.टी या वेस्टर्न डेडी-केटेड फ्रेट कॉरीडॉर वरील १०२ किमी मार्गाचे काम डिसें. २०२५ पर्यंत पुर्ण होणे अपेक्षीत आहे. मालवाहतूक सेवेतून सन २०२३-२४ मध्ये भारतीय रेल्वेने १६८२९३ कोटी रु. -चा महसुल मिळविला होता. आता सन २०२४-२५ मध्ये १८०००० कोटी रुपयेचे ध्येय निश्चित केलेले असून त्या-साठी रेल्वेने खासगी कंपन्यांना मालधक्के सुरू करण्याची परवानगी दिली आहे. इंजिनचालक कमी पडल्यास स्वयं-चलीतपणे ब्रेक लावून ठराविक वेगमर्यादा गाडी चालविण्यास कवच यंत्रणा इंजिनचालकास मदत करते. हिवाळ्याच्या दिवसात धुके आणि पावसाळ्यात मुसळधार पावसामुळे दृश्य-तामान कमी होते. अशा प्रतिकूल हवामानात गाड्या सुरक्षीत चालविण्यासाठी कवचची मदत होते. परंतु या प्रक्रियेचे काम अतिशय संथगतीने चालू आहे. आत्तापर्यंत दक्षीण मध्य रेल्वेच्या १४६५ किमी आणि उत्तर मध्य रेल्वेच्या

८० किमी मार्गावर ही यंत्रणा बसविण्यात आलेली आहे. दिल्ली-चेन्नई, मुंबई-चेन्नई या महत्वाच्या मार्गासाठी या निविदा मागविण्यात आल्या आहेत. या कामांना गती देणे आणि भारतीय रेल्वे नेटवर्कमध्ये कवचच्या जलद प्रवेश सुनिश्चित करणे आवश्यक आहे असा अभिप्राय समितीने दिला आहे. रेल्वे अद्ययावत व आधुनिक राहण्यासाठी नियमितपणे संशोधन प्रक्रिया राबविणे आवश्यक आहे. यासाठी रिसर्च डिझाईन ॲंड स्टॅंडर्ड ऑर्गनायझेशन आहे. परंतु, त्यासाठी भरीव निधी उपलब्ध होत नसल्याचे अहवालात नमूद केले आहे. सन २०२४-२५ या वर्षात रेल्वेसंशोधनासाठी अर्थसंकल्पात केवळ ७२.०१ कोटी रु. तरतूद होती. गेल्या दोन वर्षात रेल्वेस मर्यादित निधी वापर करता आला नाही. सन २०२२-२३ मध्ये १०७ कोटी आणि २०२३-२४ मध्ये ६६.५२ कोटी रुपयांच्या सुधारीत अंदाज पत्रकाच्या तुलनेत प्रत्यक्ष खर्च अनुक्रमे ३१.७२ कोटी व २८.३४ कोटी रुपये आला. गत दोन वर्षात महसूल कमी आहे. तर सन २०२४-२५ साठी तो २८०० कोटी रुपये अपेक्षीत आहे. कारण प्रवासी वाहतुकीतून मिळणारा कमी महसूल. हा तोटा कमी करण्यासाठी रेल्वेने वातानुकुलीत श्रेणीचे डबे वाढविण्यावर भर देण्यात आला पण तरी देखिल उत्पन्नात वाढ झालेली दिसून येत नाही. यावर उपायासाठी रेल्वेने विविध गाड्या आणि सर्वश्रेणी भाडे यांचा आढावा घ्यावा असे सदर अहवाल सांगतो. सोबत वातानुकुलीत श्रेणीतील प्रवासी भाड्यांचा आढावा घेण्याची सूचनाही या समितीने अहवालाद्वारे केलेली आहे.

# अलमट्टीउंचीवाढीचा महाराष्ट्रास पुराचा धोका.

उत्तर कर्नाटकातील दुष्काळी भागात सिंचन अभावामुळे विकास रखडलेला असल्याने कर्नाटक शासनाने लाल बहादूर शास्त्री धरण अलमट्टी धरण बांधण्याचा घाट घातला. कृष्णा नदीवर व भौगोलिक दृष्ट्या विजयपुरा जिल्ह्यात हे धरण २००२ साली १२३ टी एम सी क्षमता असणारे बांधण्यात आले. यामुळे बागलकोट जिल्ह्यामधील मोठा भाग पाण्याखाली जातो. याचे उद्घाटन ए. पी. जे अब्दुल कलाम यांनी केले होते. २००५ साली पश्चिम महाराष्ट्रात महापुराने सांगली कोल्हापूर जिल्ह्यात हाहाकार उडवला व राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ काही दिवस बंद ठेवावा लागला. या भागा साठी पूर नवा नव्हता पण पाणी प्रथमच साठून राहिले होते. असे अलमट्टी धरणामुळे आले असावे असा निष्कर्ष तज्ञ समितीने काढला पाणी फुगवटा या मागे कारण होते. याशिवाय सांगली जिल्ह्यामधून कृष्णा व उपनद्या वाहतात त्यामुळे पुराचा धोका संभवला असा निष्कर्षही काढला गेला. नर्मदा बचाओ आंदोलनच्या नेत्या मेधा पाटकर तसेच स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राजू शेट्टी आदींनीही हा मुद्दाच मांडला. पुढे सन २०१९, २०२१ साली असाच पूर आला होता. कर्नाटक सरकारने अलमट्टी धरणाचा पहिला टप्पा पूर्ण केला असून तीन वर्षापूर्वी या धरणाची उंची ५२४ मिटर इतकी वाढविण्याचा निर्णय घेतला. त्यास महाराष्ट्र आंध्रप्रदेश सरकारने आव्हान दिले. मात्र कृष्णा जल लवादाने उंची वाढविण्यास परवानगी दिली. आंध्र कर्नाटक, महाराष्ट्र यांच्यातील कृष्णा नदी पाणीवाटप संदर्भात ब्रिजेशकुमार न्यायाधिकरणाने वाद सोडविताना धरणाला २०० टि.एम.सी साठवण क्षमतेसह उंची ५२४ मिटरपर्यंत वाढविण्यास हिरवा कंदिल दाखवला. या आधारे कर्नाटक सरकारने या धरणाची उंची वाढविण्याची हालचाल चालू केली आहे कारण अजूनही उत्तर कर्नाटक भागातील बराच भाग सिंचनाखाली येणे बाकी आहे. या परिसरातील रायचूर, कलबुर्गी, यादगिर विजापूर बागलकोट या भागातील सहा लाखाहून अधिक एकर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

अलमट्टी धरणामुळे पश्चिम महाराष्ट्रात पुर येतो का याबाबत मतभिन्नता आढळते. काहींच्या मते पश्चिम महाराष्ट्र आणि अलमट्टी धरणातील अंतर पाहता अशी शक्यता उद्भवणे शक्य नाही. तर काहींचे मत पुरांचे हेच कारण आहे गतवर्षी पुरस्थिती निर्माण झाल्यावर राज्याच्या विधीमंडळामध्ये निवेदन करताना महाराष्ट्र शासनाने अलमट्टी तसेच हिप्परगी धरणाची उंची महापुरास जबाबदार नसल्याचे निवेदन केले होते. परंतु पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी नेते कृष्णा महापूर नियंत्रण नागरी कृती समिती यांनी काही आकडेवारीच्या संदर्भ देऊन महापूर व अलमट्टी धरणाची संगती लावली. महाराष्ट्र आणि कर्नाटकच्या जलसंपदा विभागात गेल्या २ पावसाळ्यात पाण्याच्या विसर्गाबाबत पुरेसा समन्वय दिसला कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील पुराच्या पाण्यावर नियंत्रण ठेवणे तसेच पश्चिम महाराष्ट्रातील पुराचे पाणी राज्यामधील दुष्काळग्रस्त भागात वळविणे याकरिता राज्यशासनाच्या (महा०) महाराष्ट्र क्लायमेंट रेझिलियन्स डेव्हलपमेंट प्रोग्रॅम या ४००० कोटी रुपये खर्चाच्या महत्वकांक्षी प्रकल्पास जागतिक बँकेने मंजुरी दिली आहे. यात सांगली कोल्हापूर जिल्ह्यातील पुराचे नियंत्रण आणि पश्चिम महाराष्ट्रातील पुराचे पाणी राज्याच्या इतर दुष्काळग्रस्त भागाकडे वळविणे असे दोन टप्पे आहेत. पुर नियंत्रणाची कामे, उड्डाणपुल बांधणे, भूस्खलन रोखण्यासाठी उपाययोजना विनवाहक तारांचे स्थलांतर तसेच ऐतिहासिक स्मारकांचे, ऐतिहासिक सांस्कृतिक वारसास्थळांचे संरक्षण करणे, पूरसंरक्षक उपाययोजना करणे, पुराची पूर्वसूचना देणे आदी कामे करण्यात येणार आहेत. यामध्ये ७०% वाटा जागतीक बँकेच्या असून ३०% योगदान तर राज्यशासनाचे आहे. यापुढे अलमट्टी धरणाची ५२४ मिटर उंची गृहीत धरुन नियोजनात बदल करावा लागणार आहे.

# डॉ. मनमोहन सिंग यांचे निधन.

भारतीय संघराज्याचे १३ वे पंतप्रधान आणि अर्थशास्त्रज्ञ डॉ. मनमोहन सिंग यांचे एम्स रुग्णालय दिल्ली येथे निधन झाले. भारतीय रिझर्व्ह बँकेचे गवर्नर राहिलेल्या सिंग यांनी अर्थमंत्री म्हणून काम पाहताना ९० च्या दशकात १९९१ साली पी.व्ही.नरसिंहराव सरकारमध्ये जागतीकीकरण उदारीकरण व खाजगीकरण धोरणाचा पुरस्कार करुन आर्थिक संकटातून देश वाचवला होता.

नाव - मनमोहन गुरमुख सिंग.
जन्म - २६ डिसेंबर १९३२ रोजी.
जन्मठिकाण - गाह जि. चकवाल पंजाब येथे.
आई :- अमृतकौर
पत्नी - गुरुचरण कौर.
पक्ष - भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस.
मृत्यू - गुरुवार दि. २६ डिसेंबर २०२४ एम्स दिल्ली.
शिक्षण - पंजाब विद्यापिठातून पदवी.
पी.एच.डी - केंब्रीज विद्यापिठ.
डी. फिल - ऑक्सफर्ड विद्यापिठ.

१९५७-६५ - चंदीगड येथील पंजाब विश्वविद्यालयात प्राध्यापक म्हणून काम पाहिले.

१९६९-७१ - दिल्ली स्कुल ऑफ इकॉनॉमिक्स मध्ये आंतरराष्ट्रीय व्यापार विषयाचे प्राध्यापक.

१९७६ - जवाहरलाल नेहरु विश्वविद्यालय दिल्ली मध्ये मानद प्रोफेसर

१९८२-८५ - भारतीय रिजर्व बँकेचे गवर्नर पदी
१९८५-८७ - योजना आयोगाचे उपाध्यक्ष
१९९०-९१ - भारतीय पंतप्रधानांचे आर्थिक सल्लागार
१९९१ - पी. व्ही. नरसिंहराव सरकारमध्ये काँग्रेस सरकारमध्ये भारताचे वित्तमंत्री / अर्थमंत्री.
१९९१ - आसाममधून राज्यसभा सदस्यपदी / खासदार
१९९५ - दुसऱ्या वेळी राज्यसभेवर खासदार म्हणून.
१९९६ - दिल्ली स्कुल ऑफ इकॉनॉमिक्स मध्ये मानद प्रोफेसर म्हणून कार्यरत होते.
१९९९ - दक्षिण दिल्ली लोकसभा मतदारसंघातून पराभुत.
२००१ - तिसऱ्या वेळी राज्यसभेवर खासदार तसेच त्यांची विरोधी पक्षनेतेपदी निवड करण्यात आली.
२००४ - भारताचे १३वे पंतप्रधान.
१९८७ - पद्मविभूषण हा नागरी सन्मान.
२००२ - सर्वश्रेष्ठ सांसद
१९९५ - इंडियन सायन्स कॉंग्रेसच्या जवाहरलाल नेहरु पुरस्काराने गौरविण्यात आले.
१९९३/९४ - एशियामनी ॲवार्ड फॉर दि फायनान्स मिनिस्टर ऑफ दि इअर सन्मानाने सन्मानित केले.
१९९४ - युरो मनी ॲवार्ड फॉर दि फायनान्स मिनिस्टर ऑफ दि इअर सन्मान.
१९५६ - केम्ब्रिज विद्यापिठाचा एडम स्मिथ पुरस्कार.
१९९८ व २००४ - संसदेमधील विरोधी पक्षनेते राज्यसभा.
- संयुक्त राष्ट्र व्यापार आणि विकास संमेलन सचिवालयात आर्थिक सल्लागार पदी.

१९८७-९० साऊथ कमिशन जिनेव्हा मध्ये सचिव.
१९७१- डॉ. मनमोहन सिंह भारतातील वाणिज्य आणि आर्थिक मंत्रालयात मुख्य अर्थसल्लागार पदी नियुक्ती करण्यात आली.
१९९१- विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष म्हणून
जून१९९१- नरसिंहराव सरकारमध्ये अर्थमंत्री. याच वर्षी आसाममधून राज्यसभेवर निवड पुढे १९९५,२००१,२००७ व २०१३ राज्यसभेवर तर १९९८ व २००४ या काळात राज्यसभेचे विरोधी पक्षनेते.
२००४ ते २००९- राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा पराभव करुन कॉंग्रेस सत्तेत आले व २२मे २००४ रोजी त्यांनी पंतप्रधान पदाची शपथ घेतली.
- पंडीत जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुनर्निर्माण योजना अनुदानापासून दूर जाणाऱ्या आणि आर्थिक वाढीचा विचार करणाऱ्या अनेक योजनांची सुरुवात याच काळात आली आहे.
- २००८-चे जागतिक आर्थिक संकट भारताच्या उंबरठ्या-बाहेरच राहीले.याचाही विसर पडला होता.डॉ.मनमोहन सिंग यांच्या कारकिर्दीतील सर्वात महत्वाचे काम म्हणून भारत अमेरीका अणुकर्जा करार करण्यात आला. सदर करारास संसदेची मान्यता मिळविण्यासाठी त्यांनी आपले पद पणास लावले. अखेर या करारास संसदेची मोहोर उमटली व भारतीय अणुसंशोधनाचा वनवास कायम संपुष्टात आला.
१९९१-१९९६- भारताचे अर्थमंत्री असताना सिंगनी भारतीय अर्थव्यवस्थेची दिशा बदलली, रुळावर आणून तिला नवी शक्ती दिली. सोनेगहाण नामुष्की आलेल्या

भारताचर अर्थमंत्री असताना ८% ची सकल राष्ट्रीय उत्पादन वाढीचा दर प्रथमच १९९७ मध्ये पाहिला.

१९९१- मनमोहन सिंगांना उदारीकरण धोरणाचे जनक मानले जाते. १९९० मध्ये परकीय गंगाजळीने तळ गाठला होता. चलनवाढ दुहेरी आकड्यात होती. रिझर्व्ह बॅंकेस ४७ टन सोने जागतिक बॅंकेकडे गहाण ठेवावे लागले. त्यावेळी अर्थमंत्री असताना नरसिंहराव सरकारमध्ये उदारीकरणाच्या निर्णय घेताना रुपयाचे अवमुल्यन आयातशुल्कात कपात, सरकारी मालकीच्या उद्योगाचे खासगीकरण हे राजकीय कटू निर्णय घेतले गेले.

२०२४ पर्यंत ते राजस्थानमधुन राज्यसभेवर खासदार म्हणून राहीले त्यांच्या जागी आता सोनिया गांधी या जागेवरुन खासदार आहेत. सिंग यांच्यावर रिडु कार्डी थाक शस्त्रक्रियेसह पाचवेळा बायपास झाले होते.

२००५- माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांची संकल्पना असलेली सुवर्ण चतुष्कोन ही महामार्ग योजना सिंग यांनी पुर्ण केली.

२००५ डॉ. मनमोहन सिंग यांनी विक्रीकर रद्दबातल ठरवून त्याजागी मुल्यवर्धित कर लागू केला होता.

२००५ - माहिती अधिकार २००५ लागू केला.

२३ जून २००५ - राष्ट्रपतींनी विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम २००५ ला मंजुरी दिली होती.

१० फेब्रुवारी २००६- विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम २००६ लागू करण्यात आला. या माध्यमातून वस्तुची निर्मिती निर्यात, मालाची साठवण, आणि अन्य उद्योगासाठी लागणारे परवाने आणि इतर सोयी सुविधा अधिक सुलभ करण्यात आल्या.

१८ जुलै २००५ - भारत अमेरिका आण्विक करार हा डॉ. मनमोहन सिंग यांच्या पंतप्रधान पद कारकिर्दीतील एक मोठा टप्पा ठरला डॉ. सिंग व अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष जॉर्ज डब्लू

बुश यांच्या पुढाकाराने या कराराचा आराखडा तयार करण्यात आला होता. या अंतर्गत भारताने आपल्या नागरी आणि लष्करी आण्विक आस्थापना वेगवेगळ्या ठेवण्याचे मान्य केले. तसेच भारतातील नागरी आण्विक आस्थापना आंतरराष्ट्रीय आण्विक ऊर्जा संस्थेच्या देखरेखीखाली ठेवण्यासाठी मान्यता दिली.

२००६- ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडीकल स्टडीज (एम्स) आय.आय.टी, एम्स, आय.आय.एम आणि अन्य केंद्रीय शिक्षणसंस्थातून ओबीसींसाठी २७% आरक्षण लागू करण्याचा निर्णय घेतला.

२००८- मुंबईवर आलेल्या दहशतवादी हल्यानंतर राष्ट्रीय तपास यंत्रणेची स्थापना त्यांनी केली गेली.

२ जुलै २००९- राईट टू एज्युकेशन कायदा लागू केला.

४ ऑगस्ट २००९- राईट ऑफ चिल्ड्रन टू फ्रि अँड कम्पल्सरी एज्युकेशन अॅक्ट लागू करण्यात आला.

१९९३ व १९९४- पंतप्रधानांना देण्यात येणारे एशिया मनी अॅवार्डने सन्मानित करण्यात आले.

२००६- लोकमान्य टिळक पुरस्काराचे मानकरी.

अंकांचा सिद्धांत मांडणारे आणि सूखडीचे जनक श्री डॉ. पा.वा.सूखात्मे यांचे कार्य आणि ज्ञान यांचे समर्थन करीत सूखडीस मान्यता देण्याचे काम सिंगनी केले.

२००६- आयसरच्या स्थापनेस गती दिली. याशिवाय पुणे कोलकाता येथे इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अँड रिसर्च (आयसर) स्थापनेस मान्यता

२००५- केंद्र सरकारने राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजना अधिनियम लागू केला. याद्वारे ग्रामिण भागातील नागरिक आणि श्रमिकांना अक्षरस: उदरनिर्वाह व रोजगार उपलब्ध करून देऊन १०० दिवसाचा रोजगार ग्रामिण भागासाठी उपलब्ध

माहितीचा अधिकार :- मनमोहन सिंग यांच्या कालावधीत २००५ साली माहितीचा अधिकार लागू केला सामान्य नागरीकांना शासकीय अधिकारी आणि संस्थांची माहिती मागविण्याचा अधिकार प्रदान करण्यात आला सदर कायदा लागू झाल्यावर प्रशासनातील पारदर्शकता आणि जबाबदारी वाढल्याने आणि भ्रष्टाचाराचे प्रमाण कमी झालेले दिसते.

जीडीपी वाढविण्यास मदत :- भारताची अर्थव्यवस्था ८ ते ९% दराने वाढली तर सन २००७ मध्ये देशाच्या जीडीपी मध्ये सर्वाधिक ९% ची वाढ झाली. यामुळे जगात सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थात भारत दुसऱ्या क्रमांकावर पोहोचला. त्याआगोदर विक्रीकर रद्द करुन व्हॅट लागू करण्यात आला. सिंग यांच्या काळात जीडीपी १०.८% (२००५वर) पोहोचला.

एसईझेड बाबत सिंग पंतप्रधान असताना २३ जून २००५ रोजी राष्ट्रपतीनी विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम २००५ ला मंजूरी दिली. हा अधिनियम १० फेब्रुवारी २००६ रोजी विशेष आर्थिक क्षेत्र नियम २००६ म्हणून लागू झाला. या माध्यमातून वस्तूंची निर्मिती, निर्यात मालाची साठवण आणि अन्य उद्योगासाठी लागणारे परवाने आणि इतर सोयी सुविधा अधिक सुलभ करण्यात आल्या.

ऑक्सफर्ड विद्यापिठामध्ये असताना सन १९६४ मध्येच त्यांनी इंडियाज एक्सपोर्ट ट्रेंड्स् अँड प्रॉस्पेक्टस् फॉर सेल्फ सस्टेन्ड ग्रोथ या ग्रंथाचे लेखन करुन भारताचे व्यापार धोरण कसे असावे यावर प्रकाश टाकला.

१८ जुलै २००५ - भारत अमेरिका अणुकरार डॉ. मनमोहन सिंग आणि अध्यक्ष जॉर्ज डब्लु बुश यांच्या दरम्यान झाला. यात नागरी व लष्करी अस्थापना आंतरराष्ट्रीय आण्विक ऊर्जा संस्थेने देखरेखीखाली ठेवण्यास मान्यता दिली.

# सॉफ्टवेअर निर्यातील पुणे तिसऱ्या स्थानी.

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात पुण्याची आगेकुच कायम असून पुण्याने गेल्या पाच वर्षात राज्यातील अव्वल स्थान कायम राखले आहे. देशातील सॉफ्टवेअर निर्यातीत राज्यात पुण्याचा वाटा सर्वाधिक आहे. देशपातळीवर बंगळूरु आणि हैदराबाद नंतर पुणे तिसऱ्या स्थानी आहे. केंद्रीय माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री आश्विनी वैष्णव यांनी लोकसभेत देशातील सॉफ्टवेअर निर्यातीची गेल्या पाच वर्षातील आकडेवारी जाहिर केली. आकडेवारीनुसार गेल्या आर्थिक वर्षात सन २०२३-२४ मध्ये देशातील सॉफ्टवेअर निर्यातीत बंगळूरु ४०७०६८ कोटी रुपयासह प्रथम स्थानी असून त्यानंतर हैदराबाद १२७११५ कोटी रुपयासह व्दितीय स्थानी आहे. सॉफ्टवेअर निर्यातीत पुणे जिल्हा तिसऱ्या क्रमांकावर असून उत्पादीत वस्तु निर्यातीत देशात पाचव्या क्रमांकावर आहे. तर अभियांत्रिकी वस्तु निर्यातीत पुणे देशात पहिल्या क्रमांकावर आहे. माहिती आणि उत्पादन क्षेत्रामुळे पुण्यास दुहेरी फायदा आला आहे. या दोन्ही क्षेत्रात आपली कामगिरी चांगली आहे. हिंजवडी आयटी पार्कमधील पायाभूत सुविधांची मात्र समस्या असून त्या सोडविण्यासाठीही गती देण्याची गरज आहे. आता कृत्रिम प्रज्ञा (एआय) आणि ड्रोन यासारख्या नवतंत्रज्ञान क्षेत्रामध्ये आपण जास्त प्रगती करायला हवी. त्यासाठी सरकारने नविन क्लस्टर्स निर्माण करायला हवेत. यात एमसीसीआयए सरकार बरोबर काम करेल असा मराठा चेम्बर्स ऑफ

ऑफ कॉमर्स ॲंड इंडस्ट्रिज ॲंड ॲग्रीकल्चर्सचे मरा.
संचालक प्रशांत गिरबने यांनी सांगितले.

गत पाच वर्षात सॉफ्टवेअर निर्यात दुप्पट :-

सन २०१९-२० → ५०१५७ कोटी रुपये
२०२०-२१ → ५६९३८ —॥—
२०२१-२२ → ७०४८७ —॥—
२०२२-२३ → ९४१०६ —॥—
२०२३-२४ → १०५८१८ —॥—

महाराष्ट्रातील आघाडीचे सॉफ्टवेअर निर्यात जिल्हे :-

१) पुणे - १०५८१८ कोटीरुपये
२) मुंबई - ७६५६४ —॥—
३) नागपूर - ९४६ —॥—
४) नाशिक - ४९५ —॥—
५) कोल्हापूर - १८९ —॥—
६) छत्रपती संभाजीनगर - १३२ —॥—

# राज्यघटनेची ७५ वर्षे

२६ नोव्हेंबर २०२४ रोजी भारतीय राज्यघटना स्विकारली त्यास ७५ वर्षे पुर्ण झाली हे साजरा करताना ७५ वर्षे वाटचालीचे स्मरण केले. पण १४,१५ ऑगस्ट १९४७ रोजी पंडीत नेहरु यांनी केलेले नियतीशी करार सारखे भाषण असो की २५ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधानसभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले लोकांचे सरकार ही भाषणे स्मरणात राहिली नाहीत. असे एकही भाषण नव्हते ७५ वर्षांपुर्वी कॉंग्रेस पक्ष हा संविधान सभेच्या चर्चेमागील प्रेरक शक्ती होता. बाबासाहेबांनी कॉंग्रेसचा उल्लेख हा संविधान सभेत सुव्यवस्था व शिस्त भावना आणणारा असा केला आहे. आज कॉंग्रेस लोकसभा राज्यसभेत विरोधी बाकावर आहे. हा परिवर्तनीय वेदनादायी बदल आहे. भाजप आणि उजव्या विचारसरणीच्या पक्षांना बिगर कॉंग्रेस राजकारण अपेक्षीत आहे. अशा राजकीय परिस्थिती-ची चर्चा करताना तेव्हा ते कॉंग्रेसच्या संविधानाशी संबंध काय हे सांगताना जुन १९७५ ते मार्च १९७७ या दरम्यानची आणिबाणी आणि त्यामुळे नागरिकांच्या मुलभुत हक्कावर आलेली गदा खेदाचा संदर्भ देतात कॉंग्रेसच्या १३९ वर्षांच्या इतिहासातील हा एक वाईटसा अध्याय आहे पण त्याबाबत इंदिरा गांधींनी माफी मागितली आणि आणिबाणीची पुनरावृत्ती होणार नाही अशी शपत घेतली. ही माफी जनतेने स्विकारली आणि १९८० मध्ये कॉंग्रेसला प्रचंड बहुमताने सत्तेवर आणले. घटनेच्या कलम ३६८ मध्ये संसदेस घटनादुरुस्ती करण्याचा अधिकार प्रदान करण्यात आला आहे. हा अधिकार म्हणजे कोणत्याही देशाच्या राज्यघटनेतील आवश्यक अशी ताकद आहे. कारण कोणताही देश उलथापालथीतुन जाऊ शकतो कोणत्याही देशास नवनवे धोके आणि संधींचा सामना करावा लागतो. कोणत्याही खटल्याची सुनावणी करणारे न्यायमुर्ती सतत संविधानाचा अर्थ लावत असतात व पुर्नव्याख्या करुन तो जिवंत दस्तऐवज बनविला.

भारतीय राज्यघटनेची पहिली घटनादुरुस्ती कायदा १९५१ हा अत्यंत महत्त्वाचा कायदा होता. त्यातून सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या नागरिकांच्या प्रगतीसाठी आणि अनु. जाती व अनु. जमाती साठी घटनात्मक आरक्षणाच्या हक्कांचे संरक्षण करण्यात आले. ही पहिली दुरुस्ती नसती तर आरक्षणाची संपूर्ण इमारत उभारती आली नसती. पहिल्या दुरुस्तीच्या माध्यमातून कलम ३१ (अ) आणि कलम ३१ (ब) याचा समावेश केला गेला होता त्यामुळे जुलमी सरंजामशाही, जमिनदारी व्यवस्थेचे उच्चाटन करण्याचा मार्ग मोकळा झाला. त्याचबरोबर लाखो शेतकरी व शेतमजूरांची सुटका केली गेली. तसेच जमिनसुधारणा आणि जमिन वितरण सुलभ केले. पहिल्या घटनादुरुस्तीच्या माध्यमातून सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांच्या कोणताही व्यापार, उद्योग, व्यवसाय, सेवा यातून नागरिकांना पूर्ण किंवा अंशतः काढण्यासाठी कायदेशिर पाया घातला गेला.

संविधानाच्या ४०व्या घटनादुरुस्ती कायदा १९७६ अन्वये संविधानात अनेक बदल केले गेले. पण बरीच टिकाही झाली तथापी यात दोन बदल केले. यात कलम ३९ (अ) चा समावेश या बदलाने समान न्याय मिळावा यासाठी संबंधीतांना राज्य यंत्रणेने विनामूल्य कायदेशीर मदत देणे कायदेशीर रित्या बंधनकारक झाले आणि दुसरा म्हणजे कलम ४८ (अ). यान्वये राज्य यंत्रणेला पर्यावरण संरक्षण आणि सुधारणा करणे तसेच जंगल व वन्यजिवांचे संरक्षण करणे बंधनकारक झाले. संविधानाच्या दहाव्या अनुसुचित दुरुस्ती करुन संविधान ५०वी दुरुस्ती कायदा १९८५ करण्यात आला. व पक्षांतरबंदी कायदा ज्यांना आयाराम-गयारामांना सामोरे जावे लागत आहे. या कायदयाला निवडून आलेल्या आमदारास धूर्तपणाच्या किंवा सभापतीच्या संगनमताच्या अथवा न्यायालयाच्या गोंधळलेल्या निकालाचा अंदाज आला नाही आता यानंतर पुन्हा दहाव्या अनुसुचित बदल झाला तर ठरविलेले उद्दिष्ट साध्य करता येईल.

# संविधान कामगिरी आढावा.

संविधानाचा सुवर्णमहोत्सव साजरा केला जात असताना राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या सरकारने फेब्रुवारी २००० मध्ये संविधानाच्या कामगिरीचा आढावा घेण्यासाठी एक राष्ट्रीय आयोग न्याय. एम. एन. व्यंकटचलैय्या सह ११ सदस्यीय आयोगाने २००२ साली दिर्घ अहवाल सादर केला. १९५० ते २००० या काळातील कामगिरीचा आढावा घेताना मुख्य ११ बाबी विषयी अभ्यास कर-ण्याचा उद्देश आयोगाने स्पष्ट केला.

१) संसदीय लोकशाहीसाठी संस्थाना बळकटी देणे प्रयत्न.
२) निवडणूक सुधारणा.
३) मूलभूत हक्कामध्ये बदल.
४) राज्यसंस्थेसाठीच्या मार्गदर्शक तत्वाची अंमलबजावणी
५) मूलभूत कर्तव्याची परिणामकारकता.
६) केंद्र-राज्य संबंधात सुधारणा.
७) पंचायतराज व्यवस्थेतून आलेले विकेंद्रीकरण.
८) समाज आर्थिक बदलांच्या आणि संविधानाच्या अंतर्गत विकासाच्या वेग.
९) साक्षरता वाद, रोजगार निर्मिती, सामाजीक सुरक्षा वाद, गरिबी निर्मुलन.
१०) वित्तीय आणि आर्थिक कायदयाचे नियंत्रण, सार्वजनिक जीवनमानाच्या दर्जा.
११) प्रशासकीय व्यवस्था आणि सार्वजनिक जीवनमानाच्या दर्जा.

५० वर्षातील सर्वकष कामगिरीचा आढावा घेऊन या अहवालात संविधान यशापयशाची चर्चा केली होती. संविधानातील ७३ व्या आणि ७४ व्या घटनादुरुस्ती मधून लोकशाहीचा आवाका विस्तारला असल्याची या अहवालात नोंदविले होते. यातून राजकीय विकेंद्रीकरणास वेग आला. यासोबतच सामाजिक आर्थिक पायाभूत सुविधामध्ये मोठा विकास आला. यातील बाब

आहे आयुर्मान बाबत. भारताचे १९५० साली सरासरी आयुर्मान होते ३२ वर्षे तिथपासून २००० सालापर्यंत आयुर्मान वाढत जाऊन ६३ वर्षे पर्यंत पोहोचले. याची नोंद घेतानाच निवडणूक प्रक्रिया खर्चिक व गुन्हेगारी स्वरूपाची होत असल्याबाबत आयोगाने चिंता व्यक्त केलेली होती. बंधुता हे मूल्य रूजविण्यात देश अपयशी ठरत असल्याची टिका अहवालात केली आहे. तेव्हा देशात एकी होती पन्नास वर्षात लोक अधिक प्रमाणात विभागले गेलेत. आयोगाने २४९ शिफारशी केल्या त्यापैकी तब्बल ५८ घटनादुरुस्त्या होत्या. कायदेशिर योजनेच्या अनुषंगाने १०५ सुचना होत्या. माध्यमांना स्वातंत्र्याचा हक्क, वर्षातील किमान ८० दिवस रोजगाराचा हक्क, कायदेशिर मदतीचा हक्क असे काही बदल मुलभुत हक्कात सदर आयोगाने सुचविले. मार्गदर्शक तत्वात दरपाच वर्षांनी राष्ट्रीय शैक्षणिक आयोगाची स्थापना करण्याची तरतूद असावी. समाजातील एकोपा वाढावा यासाठी आंतरधर्मीय आयोग स्थापन करावा अशी सुचना अहवालात केली होती. मुलभुत कर्तव्ये परिणामकारक रित्या पार पाडली जावीत यासाठी वर्मा समितीच्या शिफारशी (१९९९) गंभीरपणे आमलात आणाव्यात. संसदेचे व राज्यविधिमंडळाच्या सदस्यांचे विशेषाधिकार स्पष्ट केले जावेत, प्रशासकीय कार्यकारी पध्दतीत बदल केले जावेत असे अनेक निर्णायक ठरणारे बदल आयोगाने सुचविले होते.

माधव गोडबोले यांनी इकॉनॉमिक अँड पॉलिटिकल विकली मधील संशोधनपर लेखात आयोगाच्या या अहवालाची साकल्याने चर्चा केली. अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने काही कारवाई केली नाही व पाऊलही उचलले नाही. मुख्यत: या आयोगाच्या अतिशय मूलभुत अहवालावर संसदेत आणि एकुण सार्वजनिक चर्चाविश्वात गंभीर मंथन झाले नाही. संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षात तरी हे गंभीर विचारमंथन होण्याची आवश्यकता आहे.

संविधानातील सर्वात दूरगामी सुधारणा म्हणजे संवि-
धान ७३ वी घटना दुरुस्ती कायदा १९९२ आणि ७४वी
घटना दुरुस्ती कायदा १९९२ यामुळे स्थानिक स्वराज्य
संस्था आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांची
तरतूद केली आहे. आणि लोकशाही आणखी मजबूत
केली. या बदलाने अनु. जाती व अनु. जमाती मधील
लाखो महिलांना तसेच इतर सदस्यांना राजकारणाच्या
मुख्य प्रवाहात आणले. आणि लोकशाहीतील सत्तेचा
वापर करू लागले. एवढ्या मोठ्या प्रमाणातील सत्तांतराचे
आणि सत्तेच्या पुनर्वाटपाचे उदाहरण इतिहासात सापडत नाही

दोन्ही सभागृहातील चर्चा दुर्दैवाने एकमेकांवर दोषा-
रोप करणारी होती. तिने राज्यघटनेच्या ७५ वर्षांच्या वाट-
चालीतील एकमेव अस्वीकारार्ह गोष्टीवर लक्ष केंद्रीत केले.
ही खरोखरच गंभीर बाब होती. एक देश एक निवडणूक सह
भाजपने केलेले इतर बदल लोकशाहीस तसेच आणि संघ-
राज्यास कमकुवत करतील असा धोका आहे. तथापी
संविधानाचा मजबूत कणा आणि तेवढाच मजबूत पुरोगामी
आत्म्याचाच अखेर विजयी होईल.

# श्याम बेनेगल यांचे निधन.

हिंदी चित्रपट सृष्टीतील चित्रपट निर्देशक, पटकथा लेखक तसेच चित्रपट निर्माते श्याम बेनेगल यांचे वयाच्या ९०व्या वर्षी मुंबई येथे वृद्धापकाळाने निधन शिवाय किडनी रोग.

नाव :- श्यामसुंदर श्रीधर बेनेगल

जन्मस्थळ - तिरुमलगिरी हैद्राबाद (तेलंगणा)

जन्मतारीख - १४ डिसेंबर १९३४ रोजी

पत्नी - निरा बेनेगल

जाती - कोंकणी भाषिक चित्रपूर सारस्वत ब्राम्हण.

व्यवसाय - फिल्म निर्देशक पटकथा लेखक निर्माते दिग्दर्शक

मृत्यु :- २३ डिसेंबर २०२४ रोजी मुंबई येथे वयाच्या ९० व्या वर्षी आले वॉकहार्ट हॉस्पिटलमध्ये.

- त्यांना १८ राष्ट्रीय फिल्म पुरस्कार, एक फिल्मफेअर पुरस्कार व एक नंदी पुरस्काराचे मानकरी.
- वडिलांचा कल सर्वात जास्त फोटोग्राफीकडे होता.

शिक्षण - उस्मानिया विद्यापिठातून एम.ए. अर्थशास्त्र पदवी संपादन केली. येथे त्यांनी हैदराबाद फिल्म सोसायटीची स्थापना केली.

- गुरुदत्त यांचे कुटुंब आणि बेनेगल यांचे कुटुंब म्हणजे दत्त बेनेगल चचेरे भाई आहेत.

-१९५९ - मुंबई स्थित विज्ञापण एजन्सी लिंटास ॲडव्हरटायझिंग संस्थेत कॉपीरायटर म्हणून काम.

१९६२ - गुजराती भाषेत त्यांनी पहिली डॉक्युमेंट्री बनविली - गंगा के दरवाजे पर.

१९६३ - ए.एस.पी. (विज्ञापन, बिक्री प्रचार) नामक आणखी वेगळी संस्था सुरु केली. त्यांनी ९०० पेक्षा जास्त वृत्तचित्र व जाहिरातीची निर्मिती

१९६६ ते ७३ - पुणे येथील 'भारतीय फिल्म आणि टेलीव्हिजन संस्था' मध्ये अध्यापनाचे काम

१९६६ ते १९७३ - भारतीय चित्रपट आणि दूरसंचार संस्था पुणे संस्थेच दोन वेळा अध्यक्षपद

१९७० ते १९७३ व १९८१ ते १९९२ - या काळात त्यांनी वृत्तचित्राची निर्मिती करणे सुरु केले अ चाईल्ड ऑफ दि स्ट्रिट नावाने वृत्तचित्राची निर्मिती १९६७.

१९७०-७२ - होमी जे भाभा फेलोशिप प्रदान करण्यात आली. त्यानंतर चिल्ड्रन्स टेलीव्हिजन वर्कशॉप न्युयार्क आणि नंतर बोस्टन मधील WGBH टिव्ही मध्ये काम

सन्मान व पुरस्कार :-

१९७५ - अंकुर चित्रपटासाठी २० वे राष्ट्रीय फिल्म पुर.
१९७६ - निशांत ——— " ——— २१ वे ——— " ———
१९७७ - मंथन ——— " ——— २२ वे ——— " ———
१९७८ - भूमिका ——— " ——— २३ वे ——— " ———
१९७९ - जुनून ——— " ——— २४ वे ——— " ———
१९८२ आरोहन ——— " ——— २७ वे ——— " ———
२००५ - नेताजी सुभाषचंद्र बोस. ५० वे ——— " ———
२००९ - बहुत बडिया अब्बा - ५४ वे ——— " ———

१९९३ - 'सूरज का सातवा घोडा' सर्वश्रेष्ठ चित्रपट.
१९९५ - मम्मो हिंदीमधील ——— " ———
१९९६ - दि मेकींग ऑफ दि महात्मा ——— " ——— फातिमा मीर चे पुस्तक
१९९७ - सरदारी बेगम सर्वश्रेष्ठ उर्दु चित्रपट.
१९९९ - समर, हरीभरी ——— " ——— हिंदी ——— " ———
२००१ - जुबेदा. ——— " ———
२००५ - नेताजी सुभाषचंद्र बोस दि फॉरगॉटन हिरो राष्ट्रीय एकता व सर्वश्रेष्ठ चित्रपट नरगिस दत्त पुरस्कार प्रदान करण्यात आला.

१९७४- बार्लिन आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामध्ये
गोल्डन बर्लिन बियर सन्मान अंकुर साठी.
१९७९- मास्को आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव
१९८१- कलयुग - गोल्डन पुरस्कार
१९९८- सरदारी बेगम - गोल्डन सेंटजॉर्ज पुर.
१९७०- होमी भाभा फेलोशिप
१९७६- पद्मश्री
१९८९- सोव्हियतलॅंड नेहरु पुरस्कार.
१९९१- पद्मभूषण
२०१२- डि. लिट. कोलकाता विद्यापिठ मानद डॉक्टरेट
२०१३- ए. एन. आर. राष्ट्रीय पुरस्कार
२०१६- डिलिट आईटीएम विद्यापिठ ग्वाल्हेर (MP)
२००५- दादासाहेब फाळके पुरस्कार . ३५ वा .
२०१३- कलामहर्षी बाबूराव पेंटर जीवनगौरव पुरस्कार .
२०१८- चित्रपती व्ही शांताराम जीवनगौरव पुरस्कार .
२००६-२०१२ राज्यसभेवर खासदार .
- आयफा जीवनगौरव पुरस्कार .
अंतीम चित्रपट :- मुजीब दि मेकींग ऑफ अ नेशन (२०२३)
पहिला चित्रपट - १९७४. अंकुर (श्याम बेनेगल दिग्दर्शित)
अभिनय शबाना आझमी, अनंत नाग .
पंडीत नेहरूंच्या डिस्कव्हरी ऑफ इंडिया या पुस्तकावर
आधारीत १९८८ साली भारत एक खोज . टिव्ही मालिका .
१९८०-८६- राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळाचे संचालक .
२ मार्च २०२४- संविधान मालिकेची निर्मिती .

# देशाच्या वनक्षेत्रात २५% वाढ.

भारताच्या एकुण वनक्षेत्र आणि वृक्षक्षेत्रात वाढ आलेली असल्याचे अहवालात नमूद केले असून देशातील जंगल आणि झाडाखालील क्षेत्र २०२१ च्या तुलनेत २०२३ मध्ये १४४५ चौरस कि.मी.ने वाढले असल्याचे भारतीय वनस्थिती अहवाल २०२३ मध्ये नमूद करण्यात आले आहे. त्याचवेळी पश्चिम आणि पूर्व घाटातील एकुण वनक्षेत्रामध्ये ५८.२२ चौरस किमी घट आली असून शनिवार दि २१ डिसेंबर २०२४ रोजी प्रसिध्द झालेल्या अहवालातील माहितीनुसार २०२१ पासून २०२३ पर्यंत २५.१७% नी वाढ आली असून सन २०२१ मध्ये भारताचे एकुण वनक्षेत्र ७ लाख १३ हजार ७८९ चौ.किमी होते ते २०२३ मध्ये ७ लाख १५ हजार ३४३ चौ.कि.मी इतके आले. हे क्षेत्रफळ भारताच्या एकुण भौगोलिक क्षेत्राच्या २१.७६ टक्के इतके आहे असे अहवालात नमूद करण्यात आले आहे. या कालावधीत भारतात वृक्षाखालील क्षेत्र १२८९ चौ.कि.मी ने तर वनक्षेत्र १५६ चौ.कि.मी ने वाढलेले आढळून येते. यात बांबूखालील क्षेत्राचाही समावेश करण्यात आल्याची माहिती भारतीय वन सर्वेक्षण संस्थेचे महासंचालक अनुप सिंह यांनी सांगितले.

वनक्षेत्र वाढण्याबरोबरच कार्बन शोषून घेण्याची क्षमता (कार्बन सिंक) वाढविण्यातही यश मिळविले आहे. २००५ च्या तुलनेत २०२३ मध्ये भारतातील २.२५ अब्ज टन कार्बन अधिक शोषला गेला असे आयएसएफआर मध्ये नमूद करण्यात आले आहे. पॅरिस करारात आखून दिलेली ध्येये साध्य करण्यासाठी राष्ट्रीय निर्धारित योगदानाचा भाग म्हणून भारताने वन आणि वनक्षेत्र वाढवून २०३० पर्यंत कार्बनचे शोषण २.५ ते ३ अब्ज टॉनपर्यंत वाढविण्यासाठी कटिबध्दता दर्शविली आहे. याचवेळी सन २०२१ च्या कार्बन साठ्याच्या तुलनेत सन २०२३ मध्ये ८१.५ % वाढ आल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

कार्बनसाठा म्हणजे जमीन, झाडांची मुळे आणि जमिनीवरील जीववस्तुमानात (बायोमास) साठविलेले कार्बनचे प्रमाण आकडेवारीत सांगायचे तर हे प्रमाण २०२३ मध्ये ७२८.५५ कोटी टन इतके होते ते २०३० पर्यंत ३१.७१ अब्ज टन इतके वाढविण्याची क्षमता आहे. छत्तीसगढ, यूपी ओडिशा आणि राजस्थान मध्ये सर्वाधिक वनक्षेत्र व वृक्षक्षेत्र वाढलेले आहे.

भारतीय वन सर्वेक्षणानुसार एक हेक्टर किंवा त्यापेक्षा जास्त क्षेत्र असलेल्या झाडाच्या सावलीची घनता १०% पेक्षा जास्त असलेल्या जमिनीला वनक्षेत्र मानले जाते. त्या जमिनीचा मालकीप्रकार किंवा कायदेशीर स्थिती काय आहे हे विचारात घेतले जात नाही. यामध्ये शहरी आणि ग्रामिण भागातील नैसर्गिक जंगलाबरोबरच मानवाने वाढवलेली जंगले बाग आणि झाडाखालील जमिनीचे भाग यांचाही समावेश होतो.

# बहिणींचे आर्थिक सबलीकरण.

राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी त्यांच्या आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करण्यासाठी आणि कुटुंबातील व बाहेरील निर्णय घेण्याच्या प्रक्रियेतील त्यांची भूमिका अधिक मजबूत करण्यासाठी महाराष्ट्र राज्याची लाडकी बहिण योजना जून २०२४ मध्ये सुरू झाली त्या मार्फत राज्यातील २१ ते ६५ वर्षे वयोगटातील पात्र महिलांच्या खात्यात दरमहा १५०० रु. थेट जमा होवू लागले. ही रक्कम २१०० रुपये इतकी वाढविली जाईल असेही शासन सांगत होते. कोणत्याही योजनेचा शासनाचा हेतू सकारात्मक असतो. परंतु त्या योजनेचा लाभार्थींना नक्की तसाच लाभ होतो का हे पाहणेही आवश्यक आहे. त्यासाठी सरकार काय करते व आपण काय करतो हे पाहणेही गरजेचे आहे. लाडकी बहिण योजनेतून आलेल्या पैशातील काही भाग बँकेतच फिक्स्ड डिपॉझिट। रिकरिंग डिपॉझिट मध्ये परस्पर जमा करण्याच्या सुचना तिने बँकेला देणे. पोस्ट ऑफीस बचत खात्यात सुरक्षीत आणि छोट्या रकमेत बचत करण्याची सोय असते. महिला बचत गटात सामूहिक बचत आणि छोट्या छोट्या कर्जाची सोय असते महीला जेव्हा बचत गटाच्या सदस्य असतात. तेव्हा त्यांना एकमेकींची साथ असतेच शिवाय कमी दराने ही (व्याजदराने) कर्ज मिळते. शिवाय आणखीही काही विशेष योजना गुंतवणुकीचे पर्याय आहेत.

## अटल पेन्शन योजना :-

एखादया ३० वर्षे वयाच्या स्त्रीला साठीनंतर ५००० रुपये दरमहा पेन्शन हवे असेल तर आतापासून अंदाजे दरमहा ५८० रुपये या योजनेत तिला गुंतवावे लागतील. तेव्हा तीला वयाच्या ६० व्या वर्षी १००० ते ५००० रु. पेन्शन मिळण्याचा हा पर्याय आहे. (पात्रता निकष त्याचे/तिचे बँकेमध्ये बचत खाते किंवा पोस्ट ऑफीस बचत खाते असावे. वय किमान १८ वर्षे ते ४० वर्षे असावे. या योजनेत किमान २० वर्षे पैसे भरणे गरजेचे आहे. योजना धारकांच्या साठीनंतर

मृत्यु झाल्यास आणि तेव्हा जोडीदार हयात असल्यास ती पेन्शन जोडीदारास सुरु राहते. जोडीदाराचाही मृत्यु झाल्यास वारसास एकरकमी साडेआठ लाख रु. मिळतात.

पब्लीक प्रॉव्हिडंट फंड:-

याात कोणीही व्यक्ती एकाच वेळी किंवा वेगवेगळ्या हप्त्यात पैसे जमा करु शकते. महिन्याला फक्त १०० रुपये देऊन खाते उघडता येते एका वर्षात कमाल १२ हप्त्यात पैसे भरता येतात. प्रत्येक आर्थिक वर्षासाठी किमान ५००रु आणि कमाल दिड लाख रुपये गुंतवणूक करता येते. उदा. यामध्ये दरमहा ५०० रुपये भरल्यानंतर ७.१%. व्याजदराने १५ वर्षानंतर साधारणत: १६०००० रुपये मिळतात शिवाय जमा रकमेच्या २५%. कर्जही मिळते.

महिला उद्योगिनी योजना:-

या योजनेच्या माध्यमातुन लघु व्यावसायीक क्षेत्रातील व्यावसायिक किरकोळ विक्रेते उत्पादक व स्वयंरोजगार करु इच्छिणाऱ्या महिलांना व्यावसायासाठी कमाल तीन लाख रुपयापर्यंत कर्ज मिळु शकते.

स्वर्णिमा योजना:-

सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयाकडून मागासवर्गीय महिला उद्योजकासाठी ही योजना राबविण्यात येते या योजनेच्या माध्यमातुन महिलांना उद्योगासाठी दोन लाखापर्यंत कर्ज मिळु शकते.

उद्योजक धोरण योजना:-

या योजनेतून महिलांना स्वत:च्या व्यवसाय सुरु करण्यासाठी २० लाखापासून ते १ कोटी रुपयांपर्यंत कर्ज मिळु शकते.

महिला समृद्धी कर्ज योजना:-

या योजनेच्या माध्यमातुन महिलांना स्वत:चा उद्योग व्यवसाय सुरु करण्यासाठी चार टक्के व्याजदराने पाच लाख रुपये ते २० लाख रुपयांपर्यंत कर्ज मिळते परतफेड कालावधी तीन वर्षाचा असतो.

- महिला सन्मान बचत पत्र योजना :- 1/4/23

महिला किंवा मुलीच्या (अल्पवयीन मुलांसह) नावे वार्षिक चक्रवाढ तिमाही 7.5% निश्चित व्याजदराने दोन वर्षासाठी कमाल दोन लाखापर्यंत ठेवीची सुविधा आहे.

महाराष्ट्र विधवा पेन्शन योजना :- 2008

या योजनेतून विधवा महिलांना दर महिन्याला एक हजार रुपये पेन्शन राज्यशासनाकडून मिळते.

सुकन्या समृद्धी योजना :- 2015

बेटी पढाओ बेटी बचाओ योजनेअंतर्गत सुकन्या समृद्धी योजनेची सुरुवात करण्यात आली. मुलीचे भविष्य सुरक्षीत करण्यासाठी सर्वात महत्वपूर्ण मार्ग आहे. मुलींच्या उच्च शिक्षणासाठी निधी साठविण्याची सोय यात आहे

लेक लाडकी योजना :-

पिवळ्या आणि केशरी रेशनकार्ड धारक कुटुंबात मुलींचा जन्म झाल्यावर पाच हजार रुपये पहिल्यात गेल्यावर सहा हजार रुपये याशिवाय सहावीत सात हजार रुपये अकरावीत आठ हजार रुपये आणि अठरा वर्षे पूर्ण झाले की 75000 रुपये असा लाभ मिळतो.

यासोबत प्रधानमंत्री मातृ वंदना योजना, माझी कन्या भाग्यश्री योजना, जननी सुरक्षा योजना इत्यादी योजना आहेत. याशिवाय बचत आणि गुंतवणुकीसाठी राष्ट्रीय बचत पत्रिका, म्युच्युअल फंड, प्रधानमंत्री बचत सुरक्षा योजना, प्रधानमंत्री जीवनज्योती योजना इत्यादी योजना आहेत.

लाडकी बहिण योजनेतून मिळणारे किमान 500 रुपये तरी वरिलपैकी एका तरी योजनेमध्ये गुंतविले जातात. सदर गुंतविल्यानंतरही एक हजार रुपये शिल्लक राहतील, तेच भांडवल म्हणून वापरता येतील. एकेकटीने किंवा काहीजणींनी एकत्र येऊन कमी भांडवलात काही घरगुती उद्योग सुरु करता येतील. घरगुती अन्नपदार्थ बनवून विकता येतात क्लाऊड किचन / छोटीशी खानावळ / कॅफे सुरु करणे. शिवणकाम कपडे

अल्टीरेशन बिझनेस, कापडावर भरतकाम, घरच्या घरी गोडेतेल, घरी बनविलेली औषधी उत्पादने शेतीसाठी वापरली जाणारी नैसर्गिक खते इत्यादी विक्री करता येते. याशिवाय हाताने बनविलेले साबण, सुगंधी मेणबत्या, हस्तकला वस्तू इत्यादी तयार करून विकता येतात. ग्रामिण भागात गोमय उत्पादने प्रशिक्षण घेऊन व्यवसाय सुरू करू शकतात. पेशंट केअर, बागकाम, माळीकाम, इलेक्ट्रिशियन प्लंबींग आदी व्यवसाय कमी भांडवलात सुरु करता येतील. यासाठी प्रशिक्षणासाठी महिलांना एककाचे पैसे मिळू लागले आहेत. यासाठी अर्ज प्रक्रिया पूर्ण करावी लागेल.

स्त्रियांकडे नियोजन कौशल्य आर्थिक व्यवस्थापन नेटवर्किंग कौशल्य सेवा कौशल्य कमी अधिक प्रमाणात असतातच. सोबत काही तांत्रिक कौशल्ये शिकून घेतली तर स्त्रिया अधिक सबळ होतील.

# पुणे विमानतळास संत तुकारामांचे नाव.

लोहगाव येथील आंतरराष्ट्रीय विमान तळाचे नाव जगद्गुरु संत तुकाराम महाराज आंतरराष्ट्रीय विमान तळ लोहगाव पुणे असे करण्याच्या ठरावास (सरकारी) विधानसभेत मंजुरी देण्यात आली. दोन्ही सभागृहांची मान्यता मिळाल्यानंतर नामकरणाची शिफारस केंद्रास सादर केली जाईल. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी फेरनामकरणाच्या ठराव मांडला त्यास मंजुरी देण्यात आली आहे. केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी या नामकरणासाठी पुढाकार घेतला. त्यांनी चार महिन्यापूर्वी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणविस व अजित पवार यांची भेट घेऊन चर्चा केली होती. पुणे विमानतळ असलेल्या लोहगाव येथे तुकाराम महाराज उर्फ संत तुकाराम बोल्होबा अंबिले यांचे आजोळ होते. त्यांचे बालपण याच ठिकाणी गेले होते. त्यामुळे गावकरी व वारकरी यांच्या मागणीनुसार हा प्रस्ताव राज्यसरकार कडे सादर केला होता.

## चॅम्पियन ऑफ दि अर्थ - माधवराव गाडगीळ.

जेष्ठ पर्यावरण तज्ञ माधवराव गाडगीळ यांना संयुक्त राष्ट्रसंघ पर्यावरण कार्यक्रमाच्या वतीने देण्यात येणारा चॅम्पियन ऑफ दि अर्थ हा अतिशय प्रतिष्ठेचा समजला जाणारा पुरस्कार जाहीर झाला असून जगभरातील सुमारे सहा लोकांना हा पुरस्कार जाहीर झाला असून त्यापैकी माधवराव गाडगीळ हे एक आहेत. संयुक्त राष्ट्रांचा हा सर्वोच्च पर्यावरण पुरस्कार आहे. सदर पुरस्कार सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रातील तसेच नागरी समाजातील उल्लेखनिय व्यक्तिंच्या सन्मान

म्हणून दिला जातो. अर्थात जगभरातील पर्यावरण संरक्षणासाठी काम करणाऱ्या, हवामान बदलाच्या संकटांना शाश्वत मार्गाने तोंड देता येईल असे उपाय सुचविणाऱ्या संशोधक, कार्यकर्ते, शास्त्रज्ञ, संस्था, पर्यावरणतज्ञ यांना सदर सन्मान प्रदान केला जातो. २००५ पासून हा पुरस्कार दिला जात असून आत्तापर्यंत अनेक व्यक्ती व संस्थांना तो प्रदान करण्यात आला आहे. आत्तापर्यंत भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यु निलिव्हरचे सी.ई.ओ. पॉल पोलमन रवांडाचे अध्यक्ष पॉल कागामे महासागर संशोधक आणि संवर्धनवादी सिल्विया अर्ले तसेच नॅशनल जिओग्राफीक सोसायटी यासह अनेकांना प्रदान करण्यात आला आहे. गाडगीळ यांना त्यांनी पश्चिम घाटावर जे प्रामाणिक संशोधन करुन अहवाल सादर केला त्याबाबत दिला आहे.

## माधवराव गाडगीळ :-

माधवराव गाडगीळ हे जगातील प्रसिद्ध निसर्गशास्त्रज्ञापैकी एक आहेत. त्यांनी वनस्पती, पाणी, पशु, पक्षी निसर्ग आणि मानवाचे संबंध निसर्गात मानवी हस्तक्षेप याबाबत अभ्यास करुन महत्वपूर्ण संशोधन केले. मानवी हस्तक्षेपावरही त्यांनी आवाज उठवला आहे. त्यांना वसुंधरेचे रक्षक / संरक्षक देखील म्हटले जाते. त्यांनी अनेक दशके संशोधक आणि सामाजिक कार्याद्वारे पर्यावरण संरक्षणासाठी प्रयत्न केले आहेत. माधवराव गाडगीळांचे वडिल अर्थतज्ञ होते. ते गोखले इन्स्टिट्यूटचे संस्थापक सदस्य आहेत. मुख्य म्हणजे नैसर्गिक स्त्रोताचे जतन संवर्धन रक्षण यावरही माधवरावांचा प्रभाव होता. गाडगीळ बंगळुरु येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स येथे प्राध्यापक होते. येथे पर्यावरण विज्ञान केंद्राची स्थापना केल्यावर गाडगीळ येथे १९८६ मध्ये भारतातील पहिले

बायोस्फिअर रिझर्व्ह, निलगिरी बायोस्फिअर रिझर्व्ह यांच्या स्थापनेचे श्रेय जाते. जे आता भारतातील सर्वात मोठे संरक्षीत क्षेत्र आहे. उपेक्षीत समुदायाचे संरक्षण करणे व जंगले आणि पर्यावरण पाणायक प्रदेशातील पर्यावरण संवर्धनास प्रोत्साहन देणे. गाडगीळ यांनी शेतकरी, मासेमारी समुदाय, धोरणकर्ते म्हणून काम केले आहे. गाडगीळ यांना भारतामध्ये नागरी सन्मान पद्मश्री आणि पद्मभूषण पुरस्कार यासोबतच त्यांना टायलर पारितोषिक आणि व्होल्वो पर्यावरण देण्यात आला आहे. पश्चिम घाटच्या पर्यावरण दृष्ट्या संवेदनशिल प्रदेशावर हवामान बदल, विकास क्रियाकलाप व लोकसंख्येच्या परिणाम यांचे मुल्यांकन व विश्लेषण करण्यासाठी २०१० मध्ये माधवराव गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली 'वेस्टर्न घाट इकॉलॉजी एक्सपर्ट' समिती नेमण्यात आली. व सन २०११ ला अहवाल सादर केला. ज्यात संपुर्ण पश्चिम घाट पर्यावरणीय दृष्ट्या संवेदनशिल क्षेत्र म्हणून घोषीत करण्याची शिफारस केली होती व खाणकाम, उत्खनन, नविन औष्णिक ऊर्जा प्रकल्प तसेच अक्षय ऊर्जा प्रकल्पावर बंदी घालण्यात यावी अशी मागणी करण्यात आली होती. या अहवालाने स्थानिक समुदाय उद्योग व राज्यसरकार यांच्यामध्ये चिंतेचे वातावरण पसरले असून याचा परिणाम लोकांच्या जीवनमानावर होऊ शकतो कार्यरत गटानुसार ५९९४० चौ.कि.मी क्षेत्राचा ३७% भाग पर्यावरणीय संवेदनाशिल होता. मार्च २०१४ पासून केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने संवेदनाशिल घोषीत करण्यासाठी पाच मसुदा अधिसुचना जारी करण्यात आलेली आहे.

# खोबरेल तेल जेवणासाठीच - न्यायालय

पॅकबंद खोबरेल तेल हे खादयतेल समजावे की केसाला लावायचे तेल यावरुन गेली १५ वर्षे सुरु असलेल्या वादात सर्वोच्च न्यायालयाने नुकताच निर्णय दिला आहे. या तेलाचा वापर दोन्ही कारणांनी होत असून ते खादयतेल समजावे असा सर्वोच्च न्यायालयानेच दिला आहे त्यामुळे आता खोबरेल तेलावर केशतेलास लागु असलेल्या १८% ऐवजी खादयतेलावर ५% दराने वस्तु व सेवाकर आकारण्यात येईल.

मदनलाल ॲग्रो इंटस्ट्रिज ही कंपनी शांती या ब्रॅडच्या १००% खोबरेल तेलाची २ लिटरच्या डब्यामध्ये विक्री करीत असताना सन २००९ मध्ये त्यांना उत्पादन शुल्क विभागाची नोटिस आली. हे खोबरेलतेल केसांना लावणेचे तेल असून त्यानुसार सौदर्य प्रसाधन म्हणून वापर होत असल्याने त्या गटाच्या दरानुसार करआकारणी करण्याचे विभागाने ठरविले. उत्पादनशुल्क विभागाने यादीतील १५१३ क्रमांकाच्या गटात समाविष्ठ केल्यास ते खादयतेल ठरते. तर क्रमांक ३३०५ गटात समावेश केल्यास ते केशतेल ठरते या निर्णयामुळे खोबरेल तेलाचे उत्पादन धास्तावले आणि पॅराशूट ब्रॅन्डचे उत्पादन मेरिको इंटस्ट्रिजचे उत्पादन शुल्क व सेवाकर अपिलीय न्यायालयाकडे धाव घेतली. न्यायाधिकरणाने खोबरेलतेल खादयतेल ठरविले. नंतर महसूल विभागाने न्यायाधिकरणाच्या निर्णयास आव्हान दिल्यानंतर सहा वर्षापुर्वी हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले. तेथे दोन न्यायाधीशांच्या विभाजीत निर्णय घेण्यात आला त्यामुळे हे प्रकरण त्रिसदस्यीय खंडपिठाकडे गेले. या प्रकरणात करांची रक्कम तसेच दंड आणि व्याज मिळून सुमारे १५९ कोटी रुपये इतकी वसूली अपेक्षित होती.

सरन्यायाधीश संजीव खन्ना तसेच न्या संजयकुमार आणि न्याय. आर. महादेवन यांच्या खंडपिठापुढे दोन महिन्या. पुर्वी या विषयावरील सुणावणी पुर्ण झाली आणि राखून ठेव. लेला निकाल दोन दिवसापुर्वी देण्यात आली. त्यानुसार न्याया लयाने या तेलास केशतेल म्हणून वर्गीकृत करण्यास नकार

देऊन खोबरेल तेल उत्पादकांची बाजू उचलून धरली. लहान पॅकमध्ये विक्री होणाऱ्या खोबरेल तेलाचा वापर खाद्यतेल म्हणून होतो. तसेच केसांना लावण्यासाठीही त्याचा वापर केला जातो. त्यामुळे फक्त केशतेलाच्या गटात समाविष्ठ करण्यासाठी हा पुरेसा आधार ठरु शकत नाही. या पार्श्वभूमीवर उत्पादनशुल्क विभागाने आपल्या यादीत खोबरेल तेलाचा खाद्य तेलाच्या गटातच समावेश व्हावा असा आदेश न्यायालयाने दिला. मात्र त्या हे तेल लहान बॉटलमध्ये पॅक करुन त्यावर केशतेल असे लेबल लावले, तर त्यावर १८%.कर आकारण्यात येईल असेही खंडपिठाने नमुद केले आहे.

केरळसह दक्षिणेकडील अनेक राज्यात खोबरेल तेल हेजच्या जेवनातील प्रमुख घटक आहे. फोडणी देणे, तळणे यासाठी खोबरेल तेलाचा वापर केला जातो. यासह या तेला ला अनेक आरोग्यदायी गुणधर्म असल्याने विविध उद्देशांनी त्याचा देशभरात वापर केला जातो. यावर केशतेल म्हणून १८% जीएसटी आकारणी आल्यास याच्या दरात मोठ्या प्रमाणात वाढ होईल. त्यामुळे खोबरेल तेल उत्पादक, सरकार यांच्या विरोध होता; आता त्यांना दिलासा मिळाला असेल. तसेच खोबरेल तेल केसांना लावायलाही मोठ्या प्रमाणात वापरले जाते आणि ते ५मिली ते २ लिटरच्या पॅकमध्ये याची विक्री केली जाते. या सर्व कंपन्यांना न्यायालयाच्या निर्णयामुळे दिलासा मिळाला असून या तेलाचे दर आटोक्यात राहतील असे उत्पादक कंपन्यांना वाटते. दुसरीकडे या तेलावरील जीएसटी १८%.वरुन ५%.वर आल्यामुळे सरकारच्या करसंकलनात घट होणार आहे

# दयेच्या अर्जातील त्रुटी.

दयेची याचिका फेटाळून सात वर्षांनंतरही फाशीच्या शिक्षा अमलबजावणीस अवास्तव व अनावश्यक उशिर झाल्याने आरोपीच्या घटनात्मक अधिकाराचे उल्लंघन होत आहे आणि असा उशिर झाल्याने त्याच्यावर अमानुष परिणाम होतो असे न्यायमुर्ती अभय ओक, अमानुल्ला, ऑगस्टीन जॉर्ज मासिह यांच्या खंडपिठाने निकाल दिला. पुण्यातील हिंजवडी येथे एका कंपनीमधील महिला कर्मचाऱ्यावर सामुहीक बलात्कार करुन तिचा खून करणारा कॅबचालक व त्याचा साथीदार यांना मुंबई उच्च न्यायालयाने फाशीच्या शिक्षेचे रुपांतर ३५ वर्षे जन्मठेपेत बदलण्याच्या निर्णय सर्वोच्च न्यायालयाने कायम ठेवला. २ वर्षांपुर्वी राजीव गांधी यांच्या मारेकऱ्यांना सर्वोच्च न्यायालयाने माफी दिली होती. तसेच नवी दिल्ली मधील निर्भया बलात्कार प्रकरणातील आरोपींना सात वर्षांनंतरही फाशीची शिक्षा झाली नव्हती. याची दयायाचिका राष्ट्रपतीकडे केली होती. हैदराबाद बलात्कार, बदलापूर लैंगिक छळ प्रकरणातील आरोपींच्या एन्काऊटर झाल्यावर सामान्य जनतेने स्वागत केले. गुन्हेगाराकडून सादर होणाऱ्या दयायाचिका हा गेल्या काही वर्षांपासून न्यायालयीन विलंब व वादाचा विषय बनला आहे. राज्यघटनेच्या कलम ७२ अन्वये राष्ट्रपतींना तर कलम १६१ अन्वये राज्यपालांना शिक्षा माफीचे, शिक्षा कमी अथवा सौम्य करणेचे अधिकार आहेत आणि त्यावर कायदेमंडळाने शिक्कामोर्तब केलेले आहे. काही वेळा खऱ्या गोष्टी न्यायालयासमोर येवु न शकल्याने किंवा नंतर उजेडात आल्यास त्याच दयेस। दयेच्या अधिकाराची गरज आहे. कारण फाशी एकदा दिल्यावर ती कालत्रयी रद्द करता येत नाही. (मेरी जंग) अशा शब्दात सर्वोच्च न्यायालयानेच केहर सिंग विरुद्ध पंजाब राज्य या खटल्यातील निकालात या अधिकाराचे समर्थन केलेले आहे. दयेचा अर्ज कोणी किती वेळा करावा आणि कुठल्या क्रमवारीत दयेचा अर्ज निकाली काढावा याबाबत स्पष्ट तरतूद नाही याचा फायदा गुन्हेगार किंवा त्याच्या वतीने घेतला जाऊ शकतो हे निर्भया प्रकरणात बघायला मिळाले. न्यायालयात जाऊन दाद

हक्क प्रत्येकास आहे (कलम २२, कलम ३२) त्यामुळे फाशी बाबत सर्वोच्च न्यायालयात एकामागून एक पुनर्विचार अर्ज क्युरेटिव्ह पिटीशन्स दाखल करायच्या आणि प्रकरण भिजत ठेवायचे असा प्रकार होताना दिसतो.

सन १९८७ मधील सर्वोच्च न्यायालयाच्या के.पी. मोहम्मद विरुध्द भारत सरकार या याचिकेवर निकाल देताना दयेच्या अर्जावर तीन महिन्यात निकाल दयावा' मात्र आजही याची अंमलबजावणी होताना दिसत नाही. उलट दयाअर्जावर निकाल दयायचा झाल्यास ते गुन्हेगारांच्या घटनात्मक अधिकारांचे उल्लंघन होते असे सर्वोच्च न्यायालयाचे निकाल आहे. याच धर्तीवर सन १९८८ मध्ये सर्वोच्च न्यायालयाचा पाच सदस्यीय खंडपिठाने त्रिवेणीबेन विरुध्द गुजरात सरकार याच याचिकेवर निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की दयेच्या अर्जावर तीन महिन्यात निकाल दयावा पण आजही त्याची अंमलबजावणी होताना दिसत नाही उलट याचा फायदा आरोपीस होताना दिसत आहे. उशिराबाबत राष्ट्रपतीवर खापर फोडले जाते. पण राज्यघटनेप्रमाणे राष्ट्रपती केंद्रीय मंत्रीमंडळाच्या सल्यानेच काम करतात.

सर्वोच्च न्यायालयाने एपरु सुधाकरण (२००६) यांच्या याचिकेवर निर्णय देताना स्पष्ट नमूद केले आहे की जातपात धर्म, राजकीय निष्ठा या बाबी दयेचा अर्ज निकाली काढणे बाबत पूर्णपणे गैरलागू आहेत आणि सदर अर्ज निकाली काढताना गुन्हेगाराबरोबरच पिडीत व्यक्ती आणि समाज यांचाही विचार करणे महत्वाचे व क्रमप्राप्त आहे. कारण सदर प्रकरणात आरोपी काँग्रेसचा कार्यकर्ता असल्याने राज्यपालांनी दयेचा अर्ज मंजूर केलेला असतो. भारतीय न्यायिक सुरक्षा संहितेच्या कलम ३७३ ते ३७८, (पूर्वीची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३२, ४३३ व ४३३ (अ)) प्रमाणे राज्य व केंद्र सरकारला गुन्हेगारांची शिक्षा माफ किंवा कमी करण्याचा

अधिकार आहे मात्र राज्यसरकारला हा अधिकार जर वापरायचा असेल तर त्यास केंद्रसरकारच्या परवानगी-ची आवश्यकता असते. भारताचे माजी पंतप्रधान दिवंगत राजीव गांधी यांच्या मारेकऱ्याबाबत या तरतुदींचा वापर अधिक प्रमाणात केलेला आढळतो यासाठी काही अपवाद आहेत. उदा. जन्मठेपेची शिक्षा दिली असेल आणि त्याच गुन्ह्यात फाशीची शिक्षा देता येत असेल तर ती कमी करुन जन्मठेपेची दिली जाते. अशा वेळी गुन्हेगार जोपर्यंत १४ वर्षे सजा भोगत नाही तोपर्यंत त्याची शिक्षा कमी करता येत नाही. सोनिया गांधीनी राजीव गांधी हत्या प्रकरणातील आरोपींना माफ केले हा त्यांच्या मनाचा मोठेपणा पण ते न्यायालयासाठी बंधनकारक नाही. आणि तसा अधिकार कोणासच नसतो.

राजीवगांधी हत्याकांडातील आरोपींना सोडताना त्यांची तुरुंगातील वर्तणूक चांगली होती त्यांनी पदव्या घेतल्या पुस्तके लिहली असे निरिक्षण न्यायमुर्ती भुषण गवई व बी. व्ही. नागरत्न खंडपिठाने नोंदविले याचा धोकादायक पायंडा पडु शकतो. कारण हजारो फाशीतील उच्चशिक्षित कैदी आज तुरुंगात खितपत आहेत त्यांना सोडायचे का? या प्रकारात पिडीत व त्यांचे कुटुंब यांचा विचार होणे गरजेचे आहे. याबाबत न्यायालयाचे उलट-सुलट निकाल रोखण्या-साठी दयाअर्जातील त्रुटी दूर व्हायला हव्यात शिवाय या साठी केंद्राने ठोस पाऊल उचलत अर्ज कोण किती वेळा करु शकतो, आलेला अर्ज किती वेळात निकाली काढायचा याबाबत स्पष्ट तरतुदी करणे अपेक्षीत आहे शिवाय जबरी शिक्षेची तरतुदही करण्यात यावी.

# तबलावादक झाकीर हुसेन यांचे निधन.

तबलावादनाला राजाश्रय आणि लोकाश्रय मिळवून देण्यासाठी उभे आयुष्य वेचणारे जागतीक ख्यातीचे तबलावादक उस्ताद झाकीर अलारखाँ हुसेन (वय ७३) यांचे रविवार दि १५ डिसेंबर २०२४ रोजी सॅनफ्रान्सिस्को याठिकाणी फुफ्फुसाच्या संसर्ग असलेल्या इडिओपॅथीक पल्मनरी फायब्रोसिस या आजाराने दुःखद निधन आले. (भारतीय वेळेनुसार सोमवारी साडेपाच वाजता पहाटे निधन अशी माहिती पत्नी ॲंटोनिया मिनेकोला यांनी दिली.

थोडक्यात जीवनवृत्तांत :-

नाव :- उस्ताद झाकीर अल्लारखाँ हुसेन.

जन्म :- ९ मार्च १९५१ रोजी मुंबई येथे.

शिक्षण :- प्राथमिक माध्यमिक शिक्षण सेंट मिशेल हाय. स्कुल माहिम मुंबई येथे झाला.

पदवी :- सेंट झेवियर्स महाविद्यालय मुंबई येथून.

वडिल :- अल्लारखाँ (रख कुरेशी)

१९६३ - वयाच्या बाराव्या वर्षी पहिला व्यावसायीक तबलावादनाचा कार्यक्रम केला.

१९७० - झाकीर हुसेन यांनी आपल्या तबलावादनाच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीस सुरुवात केली.

१९७० - तबलावादनाचे १५० पेक्षा जास्त कार्यक्रम त्यांनी भारतासह विविध देशात सादर केले

१९७० - सामुहिक तबलावादनासाठी विख्यात सरोदवादक आशिष खान यासोबत शाक्तिगट स्थापन केला.

१९७५ :- इंग्रज गिटारवादक जॉन मॅक्लॉफलिन तसेच व्हायोलीनवादक एल शंकर यांचेसोबत शाक्तिगट

१९९६ - अटलांटा येथील उन्हाळी ऑलपिकच्या उद्घाटन ची संगितरचना त्यांनी केली. गुरु शिष्य परंपरेस ते महत्व देत असत. त्यांनी उस्ताद अली अकबर खाँ पं. बिरजुमहाराज, पं. रविशंकर, पं. शिवकुमार शर्मा

यांच्यासोबत साथसंगत दिली.
२००५-०६ - स्टॅनफोर्ड विद्यापिठात भारतीय शास्त्रीय संगिताचे प्राध्यापक म्हणून काम पाहिले. तसेच सन २००७ मध्ये त्यांनी अभ्यागत प्राध्यापक म्हणुन काम
२००७ भारतीय स्वातंत्र्यास ६० वर्षे पुर्ण आल्यानंतर सदर कार्यक्रमात केंद्रसरकार विशेष संगीत रचनेत भाग
१९८८- भारत सरकारच्या नागरी सन्मान पद्मश्री.
१९९१- संगित नाटक अकादमी पुरस्कार.
१९९० - इंडो-अमेरीकन ॲवार्ड सन्मान.
१९९९- नॅशनल हेरीटेज फेलोशिप अमेरिका.
२००२- पद्मभूषण भारत सरकारच्या नागरी सन्मान
२००६- मध्यप्रदेशच्या सरकारच्या कालीदास सन्मान.
२००९- ग्रॅमी ॲवार्ड
२०१२- कोनारक नाट्यमंडप कर्नाटक ओदिशा यांचेतर्फे जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात
२०२३- पद्मविभूषण भारत सरकारच्या नागरी सन्मान.
१९७८- इटालीयन-अमेरीकन कथक नृत्यांगना आंतोनिआ मिनेकोला यांच्याशी विवाह केला. त्यांना दोन मुली अनिशा कुरेशा, इसाबेला कुरेशी
- झाकीर हुसेन हे बील लॉसवेस-च्या जागतीक संगित सुपरग्रुप तबला बीट सायन्स-चे संस्थापक सदस्य असून जगाच्या कानाकोपऱ्यात प्रतिष्ठा मिळवून दिली. अगदी वयाच्या सत्तरीतही ते कार्यक्रमाचे आयोजन करीत होते.
२०१७- पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात त्यांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.
- वयाच्या १२ व्या वर्षी वडिलांसोबत एका कॉन्सर्टमध्ये पं रविशंकर, अली अकबर खान, बिस्मिल्ला खाँ यांच्यासोबत स्टेजवर कार्यक्रम करताना मिळालेले पाच रुपये त्यांचे साठी खास होते.

⇒ त्यांनी विविध चित्रपटातून तबलावादनाबरोबरच अभिनयाचीही आवड जोपासली. यामध्ये सन १९८३ साली हिट ॲंड डस्ट सिनेमात भूमिका साकारली त्यात शशी कपूर यांनी मुख्य भूमिका साकारली होती.
१९८८- दि परफेक्ट मर्डर
१९९२- मिस बॅटोज चिल्डर्स
१९९८- 'साज'- या चित्रपटातही त्यांनी भूमिका केली.

⇒ समकालीन जागतीक अल्बम संगित श्रेणीमधील ग्लोबल ड्रम प्रोजेक्ट साठी त्यांना सन २००९ मध्ये ५१ व्या ग्रॅमी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले खरे तर त्यांचे सातवेळा ग्रॅमी पुरस्कारासाठी नामांकन करण्यात आले होते पण त्यापैकी चारवेळा ग्रॅमी सन्मान जिंकला होता.

⇒ झाकीर यांनी अनेक हिंदी चित्रपटांना संगीत दिले. सई परांजपे यांच्या साज मधील क्या तुमने ये कह दिया आणि फिर भोर भई ही अविट गाणी व मंटो फॉर रियल, मिस्टर ॲंड मिसेस अय्यर, परझानियां आदी चित्रपटात पार्श्वसंगित दिले.

⇒ झाकीर हूसेन यांनी भारतीय व पाश्च्यात्य संगितात वेळोवेळी वेगळेवेगळे प्रयोग केले. शास्त्रीय रागावर आधारीत असलेले त्याचे अल्बम विशेष प्रसिद्ध आहेत. १९८७- मकिंग म्युझिक राग १९९२- रोलींग थंडर १९९५- शक्ती

⇒ २५ नोव्हेंबर २०१८- उस्ताद झाकीर हूसेन याना पु.ल. देशपांडे पुरस्काराने जेष्ठ दिग्दर्शक राजदत्त यांचे हस्ते गौरविण्यात आले.

⇒ २५ जानेवारी १९९५- सूर सिंगार संसद या संस्थेच्या स्नेहसंम्मेलनात तत्कालीन राज्यपालाच्या पत्नी सौ. लारा चेरीयन यांच्या हस्ते सुवर्णपदक प्रदान.

⇒ टाटा ताज चहाची जाहीरात झाकीर हूसेन यांनी केली होती 'वाह! ताज'

# ग्लोबल इनोव्हेशन इंडेक्स २०२४

जागतिक बौद्धिक संपदा संघटना सप्टेंबर २०२४ मध्ये प्रकाशित केलेल्या ग्लोबल इनोव्हेशन इंडेक्स २०२४ मध्ये भारताने १३३ जागतीक अर्थव्यवस्थामध्ये ३९ वे स्थान मिळविले. सन २०२३ मध्ये भारत १३२ अर्थ व्यवस्थामध्ये ४० व्या क्रमांकावर होता.

अव्वल कामगिरीचे देश :-

1) स्विझर्लंड
2) स्वीडन
3) युनायटेड स्टेटस
4) सिंगापूर
5) युनायटेड किंगडम

क्रमवारीत सर्वात वेगवान सुधारणा करणाऱ्या देशात चीन तुर्किये भारत व्हिएतनाम फिलिपिन्स यांचा क्रमांक लागतो. विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात कलस्टर रँकिंगमध्ये भारताचे चौथे स्थान देखिल मिळविले होते. मुंबई दिल्ली बेंगळूरु चेन्नई यासारखी प्रमुख शहरे जगातील १०० एसटी कलस्टर्स मध्ये सुचिबद्ध आहेत. जी संशोधन विकास आणि तांत्रीक प्रगतीचे केंद्र आहेत.

निर्देशांक बाबत

अर्थव्यवस्थेच्या इनोव्हेशन इको सिस्टीमच्या कामगिरीचे मूल्यमापन करण्यासाठी जागतिक बौद्धिक संपदा संघटना द्वारे दरवर्षी हा निर्देशांक प्रकाशित केला जातो.

• संस्था मानवी भांडवल व संशोधन पायाभुत सुविधा पत, गुंतवणूक लिंकेज यांचा समावेश असलेल्या निकषांवर आधारीत नवकल्पना मोजते. ज्ञानाची निर्मिती, शोषण व प्रसार व सर्जनशील आऊटपूट या निकषावर आधारीत तो इनोव्हेशन मोजतो.

जागतिक बौद्धीक संपदा संघटना

- ही संस्था बौद्धिक संपदा सेवा धोरण माहिती तसेच सहकार्यासाठी जागतीक मंच म्हणून काम करते.

स्थापना - १४ जुलै १९६७ मुख्यालय - जिनिव्हा (स्विझर्लंड)

एकूण सदस्य - १९३ - प्रत्येकाच्या फायदयासाठी नवकल्पना आणि सर्जनशीलता वाढविणारी संतुलीत व प्रभावी आंतरराष्ट्रीय बौद्धिक संपदा प्रणाली विकसीत करणे हे संस्थेचे उद्दिष्ट आहे.

# भारतीय अर्थव्यवस्था वास्तव व आभास .

परराष्ट्रमंत्री एस जयशंकर आणि इलेक्ट्रॉनिक्स माहिती तंत्रज्ञानमंत्री आश्विनी वैष्णव हे दोघेही शहरी सुशिक्षित आणि मृदूभाषी आहेत. जयशंकर प्रशासकीय सेवेतून नंतर खासगी सेवेत आणि नंतर संसद सदस्य झाले आहेत ते अर्थशास्त्रात पारंगत आहेत तसेच आश्विनी वैष्णव हेही व्हार्टन बिझनेस स्कूलचे पदवीधर असून अर्थशास्त्राची जाण असणारे आहेत. जयशंकर यांच्या मते आज आपण जेथे व्यापार ८०० अब्ज अमेरिकन डॉलर आहे तशी चार ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था आहोत पण खरे पाहता भारतीय अर्थव्यवस्था अद्याप चार ट्रिलियन अमेरिकन डॉलरची बनलेली नाही. आणि आपले उद्दिष्ट आहे ते अर्थव्यवस्था पाच ट्रिलियन अमेरिकन डॉलर बनविण्याचे. या दिशेने जातानाच आपण आता धापा टाकत आहोत. अर्थमंत्री आणि मुख्य आर्थिक सल्लागारांनी गेल्या सहा वर्षांत तीनदा आपले उद्दिष्ट बदलले आहे. व्यापाराच्या बाबतीत सांगायचे तर २०२३-२४ च्या अखेरीस बदलले आपली व्यापारी मालाची निर्यात ४३७ अब्ज अमेरिकन डॉलर्स होती आणि आयात ६७७ अब्ज अमेरिकन डॉलर्स होती. भारतातील थेट परकीय गुंतवणूक २०२१-२२ मध्ये ८४.८५ बिलीयन अमेरिकन डॉलर्स वरुन २०२३-२४ मध्ये ७०.९५ बिलीयन्स अमेरिकन डॉलर्स झाली आहे. लोकांपर्यंत अर्थव्यवस्थेचे फायदे पोहोचविण्याची आपली क्षमता यावर जयशंकर यांनी भाष्य केले. कोविडदरम्यान भारतात शोधण्यात आलेली स्वदेशी लस कोव्हॅक्सिन जीची परिणामकारकता ८०% होती दुसऱ्या कोविशिल्ड या लसीची परिणामकारकता होती ९०% आणि या लसीस ऑक्सफर्ड-ॲस्ट्राझेनेकाने मान्यता दिली होती. लोकांना दिल्या गेलेल्या २०० कोटी लसीपैकी १६० कोटी कोविशील्डच्याच होत्या. देशाचा विकासदर सातत्याने ६ ते ८% दरम्यान आहे

भारतीय विकासप्रक्रियेचे चार स्थंब आहेत यामध्ये प्रामुख्याने भांडवली गुंतवणूक, उत्पादन, सर्वसमावेशक वाढ आणि सरलीकरण यांचा समावेश होतो. आपण जर आकडेवारीवर नजर टाकली तर भारताच्या सकल उत्पादन वाढीचा दर (राष्ट्रीय उत्पादन वाढीचा दर) गेल्या सहा वर्षात सरासरी ४.९९% आहे पण यामध्ये कोविड समावेश वर्षाचाही आहे. केंद्र सरकारच्या सार्वजनिक उपक्रमाद्वारे होणारा भांडवली खर्च २०१९-२० मधील सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या ४.७% वरुन सन २०२३-२४ मध्ये (मोदींची दुसरी कारकिर्द) ३.८% वर तो घसरला आहे. सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या टक्केवारीच्या दृष्टीने उत्पादनही घसरले आहे. २०१५ मध्ये ते १५.०७% होते तेच सन २०१९ मध्ये १३.४६% वर घसरलेय तर २०२३ मध्ये १२.८४% वर आले आहे. सर्वसमावेशक विकास हा वादाचा मुद्दा आहे. कोणत्याही चार्टर्ड अकाउंटंटला कंपनी सेक्रेटरीला किंवा कायदेशीर व्यावसायिकांना विचारल्यास प्राप्तीकर, जीएसटी, कंपनी कायदा, आरबीआय नियम सेबीचे नियम इत्यादी संबंधीच्या कायद्यात अशी नियमांची आणि नियमनांची भरीव वाढ होऊन गुंतागुंत वाढली आहे. १९९१-च्या उदारीकरणानंतर सन १९९७ आशियायी आर्थिक संकट, २००८ आंतरराष्ट्रीय आर्थिक संकट २०१६ चे निश्चलीकरण आणि सन २०२० च्या कोविडच्या काळात अर्थव्यवस्थेस धक्के बसले पण यानंतरही सरकारे अगोदरच्या सरकारच्या खांद्यावर हात ठेवत उभी राहिली. पण मोदी सरकार मात्र यापेक्षा वेगळे समजते. १९६६ मध्ये सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाची स्थापना करण्यात आली. व प्रचंड क्षमताही निर्माण केली. जैविक उत्पादनात प्रचंड अनुभव मिळाला व कोविडची साथ आली. तेव्हा ॲस्ट्राझेनेकाचे तंत्रज्ञान आत्मसात करणेची तयारी झाली होती. त्यामुळे ते जगातील सर्वात जास्त लस उत्पादन करणाऱ्यापैकी एक ठरले. बहुचर्चीत

बहुप्रशंसित जॅम ध्या म्हणजे जनधन आधार मोबाईल शून्य शिल्लक बचत खात्याचे बीज रिझर्व्ह बँकेचे दोन गवर्नर डॉ एस रंगराजन (१९९२-९७) आणि बिमल जालान (१९९७-२००३) यांनी पेरले आणि लाखो ख्याती उघडण्यात आली. पहिला आधार क्रमांक २९ सप्टेंबर २०१० रोजी युआयडीएआय (युनिक आयडेंटीफिकेशन ॲथॉरिटी ऑफ इंडिया) यांच्या मार्गदर्शनाखाली जारी करण्यात आला होता. (प्रमुख नंदन निलेकेनी) ३१ जुलै १९९५ रोजी पहिला कॉल केल्यावर मोबाईल क्रांतीची सुरुवात आली. RBI बुलेटीन पाहीले तर सदर बाबी अगदी स्पष्टपणे समोर येतात.

## महाराष्ट्राच्या ऱ्हासाची सात ऐतिहासिक कारणे.

इस १३१७ पर्यंत देवगिरीचे यादव घराणे सर्वात मोठे साम्राज्य होते ज्याचे मूळ नाव सेऊन होते या यादव घराण्याचे साम्राज्य नर्मदा नदी ते तुंगभद्रा नदीपर्यंत पसरले होते. म्हणजेच यादवांचे राज्य महाराष्ट्र, उत्तर कर्नाटक आणि मध्यप्रदेशातील काही भागात पसरलेले होते. सेऊन घराणे हे मूळ द्वारावती / द्वारका आणि त्यांची राजधानी चंद्रादित्यपुर / नाशिक जिल्ह्यात होते नंतर मात्र वारंवार होणाऱ्या हल्ल्यांनी राजधानी देवगिरी (संभाजीनगर / औरंगाबाद) येथे हलविली.

### १) देवगिरी गमावले :-

इस १२७१ मध्ये राजा रामचंद्र म्हणजे रामदेवराय गादीवर आला व महाराष्ट्राची भरभराट आली. ज्ञानेश्वरी भावार्थदिपिका अमृतानुभव याच काळातील. ज्ञानेश्वरी मध्ये पसायदानानंतर याच राजा रामचंद्राचा स्तुतीपर उल्लेख आढळतो. इस १२९६ मध्ये अल्लाउद्दीन खिलजी याने मोजक्या ८००० सैन्यासह देवगिरीवर हल्ला केला

व स्वकीयांच्या फितुरीमुळे रामदेवरायास पराभवास सामोरे जावे लागले. परिणामी सोने, मोती, हिरे, माणिके पाचूसह मौल्यवान रत्ने चांदी अशी खंडणी देऊन रामदेवरायास खिलजीचे मांडलीक बनून रहावे लागले. याच काळात आठव्या शतकात स्थापन झालेल्या नाथपंथास ज्ञानेश्वरांनी ज्ञाननाथ पंथाच्या उग्रतेमुळे जवळजवळ संपुष्टात आणले व इस १२९६ मध्ये आळंदी येथे इंद्रायणी नदीकाठी ज्ञानेश्वरांनी संजिवन समाधी घेतली. १३ व्या शतकापासून वारकरी संप्रदाय ही महाराष्ट्राची अखंड परंपरा झाली. पण वारकरी स्वभावाने शांत होते. परकीयांशी सामना करण्याची ताकद आणि मानसिकता त्यांच्यात होती नव्हती. याच काळात म्हणजे १३०७ आणि १३१८ मध्ये यादवांनी केलेले बंड खिलजीचा सरदार मलिक कापूरने मोडीत काढले आणि १३५ वर्षांचे यादवांचे साम्राज्य संपुष्टात आले हा पहिला महाराष्ट्रास फटका.

२) शिवाजी महाराजांचा मृत्यु:-

या घटनेनंतर तब्बल ३१२ वर्षांनी इस १६३० मध्ये पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील शिवनेरी किल्ल्यावर झाला. वयाच्या १६ व्या वर्षी १९ फेब्रुवारी १६४५ रोजी त्यांनी स्वराज्याची शपथ घेतली त्यानंतर २९ वर्षांनी ६ जून १६७४ रोजी रायगडावर राज्याभिषेक झाला. विविध किल्ले जिंकले व महाराज कोकणाकडे वळले व त्यांनी कल्याण जिंकले. १० नोव्हेंबर १६५९ रोजी प्रतापगडाच्या पायथ्याशी झालेल्या भेटी दरम्यान अफजलखानाचा वध केला. विजापुरी सैन्याचा पराभव करीत कोकण, कोल्हापूरकडे कुच करित पन्हाळा जिंकला. १६६३ शिवाजी महाराजांनी शाहिस्तेखानाच्या छावणीवर हल्ला केला. इस १६६४ मध्ये मुघलांचे व्यापारी केंद्र असणारे सुरत जिंकले. राज्याभिषेकानंतर मराठ्यांनी विजापुरी फोंडा कारवार कर्नाटक कोल्हापुर आदी भाग ताब्यात घेतला. सन १६८० मध्ये शिवाजी महाराजांचा मृत्यु झाला आणि हाच महाराष्ट्रास बसणारा दुसरा फटका मानला जातो.

### ३) पहिला बाजीराव मृत्यू :-

महाराजांच्या मृत्यूनंतर छत्रपती संभाजी महाराज गादीवर आले. पण त्यांना स्वकियांच्या बंडास सामोरे जावे लागले. रायगड पडणे हा स्वराज्यास बसलेला हादरा होता. आपल्या ९ वर्षांच्या कारकिर्दीत त्यांनी स्वराज्याच्या सीमा वाढविल्या पण १६८९ साली औरंगजेबाने संभाजी राजांची हत्या केली व स्वराज्यात अस्थिर्य माजले. याच सुमारास शाहू महाराजांच्या दरबारी पंतप्रधान असणाऱ्या बाळाजी विश्वनाथ भट पेशवा याच्या मृत्यूनंतर १७२० पहिला बाजीराव पेशवा बनला त्याने निजाम सिद्दी पोर्तुगिज यांच्याशी टक्कर देवून मराठा साम्राज्य स्थिर केले. १७४० मध्ये त्याचा मृत्यू रावेर येथे झाला तिसरा फटका

### ४) पानिपतचा पराभव :-

पाणीपतच्या तिसऱ्या युध्दाने मराठा साम्राज्याचा कणा पूर्णपणे खिळखिळा झाला. १७६० मध्ये मराठा सैन्य पाणिपतमध्ये पोहोचले नोव्हेंबर डिसेंबर जानेवारी या तीन महिने उत्तरेत कडाक्याची थंडी असते थंडीत मराठा सैन्य गारठून गेले. या युध्दात सूर्याची दिशा निर्णायक ठरली. मराठे पाणीपतहून दिल्लीस म्हणजे दक्षिणेस जात होते यामूळे दुपारनंतर सूर्य दक्षिणेकडे झुकून मराठा सैन्यानी विंचूरकरांच्या तोफरवान्यांच्या डोळ्यावर डोक्यावर तिरीप येवु लागली. त्यातच सैन्यास सरपण व पाणी मिळेना. गनिमीकावा न चालणार नसल्याने गोलाची लढाई करण्याचा निर्णय घेतला. पण याची सवय नसल्याने संकट राजपुत मराठे स्थिर राहिले मराठे पराभुत होवून परतले व दबदबा अचानक संपला. लाखो सैनिक मारले गेल्याने एक पिढी संपुन ताकत कमकुवत झाली हा चौथा फटका.

### ५) शनिवार वाड्यावर युनियन जॅक :-

इस १८०० च्या दशकांत मराठा साम्राज्य अनेक

तुकड्यात विभागले गेले होते पुण्याचे पेशवे ग्वाल्हेरचे शिंदे इंदोरचे होळकर बडोद्याचे गायकवाड आणि नागपूरचे भोसले अशा तुकड्यात विभागले गेलेले मराठा साम्राज्य तेव्हा अस्तित्वात होती. त्यापैकी ग्वाल्हेर, इंदौर बडोदा नागपूर यांच्याशी ब्रिटिशांनी सौजन्याचा करार केला होता इस १८१८ मध्ये पुण्यातील कोरेगाव भिमा या गावात भिमा नदीच्या काठावर ब्रिटिश व पेशवा गटातील ऐतिहासिक लढाईमध्ये पेशव्यांचे नेतृत्व दुसरा बाजीराव (सेनापती बापू गोखले) करीत होते इंग्रज आणि मराठा यामध्ये आलेली ही तिसरी लढाई होती. या पराभवाने पेशव्यांची राजवट संपली व मराठेशाहीचा ऱ्हास झाला शनिवार वाड्यावर युनियन जॅक फडकला महाराष्ट्राला बसलेला हा पाचवा फटका बसला.

## ६) १८५७ चा उठाव

या लढाईत ३९ वर्षांनी इस १८५७ मध्ये ब्रिटीशांचे जुलमी शासन, कंपनीच्या सैन्यातील एकाच पदावर असलेल्या ब्रिटिश व भारतीय सैनिकात केला जाणारा भेदभाव निळ अफु अशी पिके घेण्यासाठी सक्ती शेतकरी, कामगार यांचेकडून करवसुली अशा अनेक कारणांनी भारतातील सत्ताधारी, सैनिक कामगार, शेतकरी रयतेने एकत्र येत १८५७ चा उठाव केला. याच उठावात दुसरा बाजीराव पेशव्याचा दत्तकपुत्र नानासाहेब दुसरे यांनी सहभाग घेतला या उठावाचे नेतृत्व, अंमलबजावणी नियोजन कोण करित होते. याबाबत माहिती स्पष्ट नसली तरी इतिहासकारांनी या उठावाचे सुत्रधार म्हणून नानासाहेब पेशवे यांचे नाव अग्रस्थानी ठेवले होते हा उठाव ब्रिटीशांनी मोडून काढून महाराष्ट्रास सहावा फटका बसला व ब्रिटीशांनी सर्वत्र आपली सत्ता प्रस्थापित केली.

## ७) महात्मा गांधीची हत्या :-

३० जानेवारी १९४८ रोजी नथुराम गोडसे यांने महात्मा गांधी यांची बिलभिवन दिल्ली येथे हत्या केली. याप्रकरणी झालेल्या न्यायालयीन सुनावणीत [ जणांना दोषी ठरवून हत्येचा कट रचणाऱ्या गोडसे व नारायण आपटे या दोघांना १९४९ मध्ये फाशी देण्यात आली. मात्र गांधी

हत्तेनंतर मुंबईत दंगली उसळली पुणे, वाई, पाचगणी, सांगली कोल्हापूर येथे ब्राम्हणावर हल्ले करुन त्यांची घरे, दुकाने, शाळा शानभाग जिरण्या जाळण्यात आल्या. या हत्येनंतर महाराष्ट्रात ब्राम्हण आणि ब्राम्हणेत्तर अशी दुफळी निर्माण झाली आणि नंतर ती कायमस्वरुपी वाढतच गेली.

याशिवाय सावकारी करणाऱ्या लोभी ब्राम्हण सावकारांनी सुपिक असलेल्या पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना चढ्या व्याज दराने दिलेली कर्जे होय. त्यातील काही कर्जे ही चक्रवाढव्याजावर दिली गेली होती. व मुद्दल व्याज वसुली न झाल्याने ऋणकोंची जमिन जप्त होत होती. त्यामुळे शेतकऱ्यात असंतोष निर्माण झाला होता. त्याचा उद्रेक होऊन जाळपोळ झाली. आणि महाराष्ट्र अतिदुर्बल बनला.

१९६० मध्ये संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली. त्या वेळी कार्यरत असलेल्या यशवंतराव चव्हाण यांचेसारखे निष्कलंक धोरणी मुख्यमंत्री स. गो. बर्वे सारखे सनदी अधिकारी प्र. के. अत्रे सारखे चैतन्यमयी संपादक असेच पुण्यात्मे पुन्हा पुन्हा जन्मत नसतात पण पुन्हा त्या ताकदीचा माणस निर्माण होण्याची गरज आहे. पण आजच्या सरकार-कडे पाहिले तर महाराष्ट्राचे लिलिपुटीकरण आणि ऱ्हासाची शक्यता नाकारता येत नाही. हा आठवा फटका असेल.

## सीई-२० क्रायोजेनिक इंजिनाची यशस्वी चाचणी.

भारतीय अवकाश संशोधन संस्थेने सीई-२० क्रायोजेनिक इंजिनची महत्वाची चाचणी यशस्वीपणे पार पडली. याच चाचणीव्दारे रिस्टार्ट यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली. इस्त्रोने गुरुवारी दि १२ डिसेंबर २४ रोजी ही माहिती दिली. इस्त्रोने भविष्यातील मोहिमांना यामुळे बळ मिळणार आहे. देशी बनावटीच्या सी ई २० क्रायोजनिक इंजिनची निर्मिती लिक्विड प्रॉपल्शन सिस्टीम सेंटर ने केली आहे. हे इंजिन लॉंच व्हेईकल मार्क ३ चा (एल व्ही एम ३) वरचा टप्पा यशस्वीपणे कार्यान्वीत केला गेला आहे. नुकत्याच आलेल्या गगनयान मोहिमेत २० टनांच्या पातळीसाठीहे इंजिनने पात्रता सिद्ध केली होती तसेच २२ टनापर्यंत पातळीसाठीही सज्ज केले आहे. क्रायोजेनिक इंजिन रिस्टार्ट करणे ही गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. ही यंत्रणा कार्यान्वीत करण्याची करण्याची ही चाचणी इस्त्रोने पार पडली.

## डोनाल्ड ट्रम्प- 'टाईम पर्सन ऑफ दि इअर'

सुमारे सहा महिन्यापुर्वी मॅनहटन मधील न्यायालयाने एका गुन्ह्यात दोषी ठरविलेले डोनाल्ड ट्रम्प यांना टाईम्स पर्सन ऑफ दि इअरने सन्मानित करण्यात येणार. मॅनहटनमधील न्यायालयापासून काही अंतरावर न्युऑर्क भांडवली बाजारामध्ये सुरुवातीचा घंटानाद ते करणार आहेत. उद्योगपती राजकारणी डोनाल्ड ट्रम्प हे न्यूऑर्कमधील त्याचे प्रेम व क्लेश नातेसंबंधाचे प्रतिनिधीत्व करतात. चार वर्षापुर्वी पराभुत तर आता विजेते राष्ट्रपती/अध्यक्षपदाच्या निवडणुकीत ट्रम्प यांच्या योजनांनी माहिती असलेल्या अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार ट्रेडिंगची औपचारिक सुरुवात करण्यासाठी ट्रम्प बॉल स्ट्रीटवर जाण्याची शक्यता आहे. गुरुवारी १२ डिसेंबर २०२४ रोजी २०२४ पर्सन ऑफ दि इअर म्हणून घोषीत केल्याचे सांगितले. प्रथम अध्यक्षपदाची निवड णूक जिंकल्यानंतर ट्रम्प यांना २०१६ मध्ये टाईम पर्सन ऑफ दि इअर' ने सन्मानित करण्यात आले होते. अंतिम फेरीत कमला हॅरिस, एलॉन मस्क, बेंजामिन नेत्यानाहू, प्रिन्सेस ऑफ वेल्स केट याचा समावेश करण्यात आला होता.

# यून सुक येओल विरोधात महाभियोग.

यून येओल यांच्या विरोधात महाभियोग मंजूर करण्यात आला. यून येओल यांना अध्यक्षपदावरुन बडतर्फ करायचे की पुन्हा ते पुन्हा बहाल करायचे यावरुन कॉन्स्टीट्युशनल कोर्टाने १८० दिवसाच्या आत निर्णय घेणे आवश्यक आहे. त्यावेळी त्यांच्या विरोधात निकाल लागल्यास त्यांचा वारसदार निवडण्यासाठी ६० दिवसाच्या आत राष्ट्रीय निवडणूक घेणे बंधनकारक असेल. दक्षिण कोरीयाच्या नॅशनल ॲसेंब्ली या सर्वोच्च कायदेमंडळात शनिवार दि १४ डिसेंबर २४ रोजी अध्यक्ष यून सुक येओल यांच्या विरोधात महाभियोगाचा ठराव मंजूर झाला. पार्लमेंटच्या निर्णयानंतर यून येओल यांनी आपल्या विरोधातील या निर्णया विरोधात स कॉन्स्टीट्युशनल कोर्टाने आव्हान देणे निर्णय व्यक्त केला. दरम्यान त्यांच्या विरोधात महाभियोग मंजूर झाल्याचे वृत्त प्रसारित झाल्यानंतर नागरिकांनी सेऊलच्या रस्त्यावर उतरुन जल्लोष साजरा केला. नॅशनल ॲसेंब्ली मध्ये २०४ विरुद्ध ८५ अशा बहुमताने महाभियोग ठराव मंजूर झाल्यानंतर यून येओल यांचे सर्व अधिकार आणि कर्तव्ये स्थगित झाले आहेत. त्यांचे अधिकार व कर्तव्ये आता ते सत्तास्थनेत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या पंतप्रधान हान डक-सू यांच्याकडे देण्यात आलेले आहेत.

यून सुक येओल यांनी ३ डिसेंबर २०२४ रोजी अचानक मार्शल लॉ लागू करण्यात येवून देशात आणीबाणी लागू करण्यात आली होती. मात्र त्यानंतर काहीच तासांनी नॅशनल ॲसेंब्लीने मार्शल लॉ विरोधात मतदान केल्याने यून सुक येओल यांना आपला निर्णय मागे घ्यावा लागला होता. त्यांच्या विरोधात दि ७ डिसेंबर २०२४ रोजी यून सुक येओल यांच्या विरोधात महाभियोगाचा ठराव मंजुरीस

मांडण्यात आला होता. त्यावेळी यून सूक येओल यांच्या पिपल्स पॉवर पार्टीच्या बहुसंख्य सदस्यांनी मतदानावर बहिष्कार टाकला होता. मात्र नागरिकांच्या मनात यून सुक येओल यांच्या विरोधात रोष आणि संताप विचारात घेऊन तसेच त्यांच्या विरोधात होत असणारी निदर्शने पाहता पिपल्स पॉवर पार्टीच्या सदस्यांनी दुसऱ्यांदा मांडल्या जाणाऱ्या महाभियोगावर मतदानामध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला.

जन्म - १८ डिसेंबर १९६० ब्रोमून डोंग सेओंगबुक
वडिल - योन कि जुंग. (जन्म - नॉन्सन)

# जगजेता गुकेश.

भारताच्या १८ वर्षीय दोमाराजू गुकेश याने भारतीय बुद्धीबळ जगजेत्ताच्या लढतीत चीनच्या गतविजेत्या डिंग लिरेनवर ७.५ - ६.५ अशी मात करुन १८ वी जागतीक बुद्धीबळ विजेता ठरण्याचा मान मिळविला. काही महिन्यापुर्वी कॅडिडेटस स्पर्धा जिंकून आव्हानवीर होत बुद्धीबळ जगतास धक्का दिला होता. जागतीक बुद्धीबळ स्पर्धा जिंकणारा दोमाराजू गुकेश सर्वात लहान जगतिक विजेता ठरला आहे. सिंगापुरला आलेल्या या लढतीत सुरुवातीपासून अतिशय चुरस गुकेश आणि डिंग यांच्यात पहावयास मिळाली लढतीचा पहिला डाव जिंकून डिंगने जोरदार सुरुवात केली होती दुसरा डाव बरोबरीत सुटल्यावर तिसऱ्या डावात गुकेशने डिंग वर विजय मिळवत बरोबरी साधली. त्यानंतर ७ डाव बरोबरीमध्ये सुटले. दहाव्या डावाअखेर गुणसंख्या ५:५ होती तर ११ व्या डावात गुकेशने बाजी मारत ती ६:५ केली तर १२वा डिंगने जिंकत पुन्हा ६:६ अशी बरोबरी साधली. १३ व्या डावात गुकेशने वर्चस्व मिळविले होते पण त्याचे विजयात रुपांतरण करता आले नाही आणि डाव पुन्हा बरोबरीत सुटला शेवटचा १४ वा डाव गुकेशने जिंकत विजेतेपद पटकावले. हा डावही बरोबरीत सुटला असता तर टायब्रेकच्या अवलंब करावा लागला असता. काळ्या मोहऱ्यांनी खेळताना गुकेशने पूर्ण वर्चस्व पणाला लावले होते. शेवटी ५८ सालीनंतर क्लासिकल विजयावर शिक्कामोर्तब केले. २००६ पासून जगजेतेपदाच्या ११ पैकी ६ लढती टायब्रेकविना निकाली आल्या असून यामध्ये अशी कामगिरी चार वेळा विश्वनाथन आनंदने तर १ वेळा मॅग्नस कार्लसन यांनी केलेली असून आता ही कामगिरी करणारा दोमाराजू गुकेश सहावा ठरला आहे. विश्वनाथन आनंद (वय ५५ वर्षे) याचा बुधवारी वाढदिवस होता त्यास गुकेशने आपला विजय समर्पित केला सन २०१० मध्ये आनंद आणि बल्गेरीयाच्या टॅपालिन

टोपोलोव्ह याच्या लढतीचे स्मरण या निमित्ताने आले. यावेळी लढती १२ चालींच्या असत तेव्हा पहिल्याच डावात आनंद हरला व १२ व्या अंतीम लढतीत काळ्या मोहऱ्यांनिशी खेळताना आनंदने टोपोलोवचा पराभव केला यंदाही गुकेश पहिल्या डावात पराभूत झाला होता परंतु काळ्या मोहऱ्यांनिशी खेळताना १४ व्या डावात गुकेशने डिंगचा पराभव केला.

सर्वात लहान खेळाडू ठरण्याचा मानही आता गुकेश कडे जातो याआधी तो गॅरि कॅस्पारोव्हने वयाच्या २२व्या वर्षी अनातोली कार्पोव्हला पराभुत करत सर्वात लहान विजेता ठरला होता त्याचा विक्रम १८ वर्षीय गुकेशने आता आपल्या नावावर केला आहे.

गतवर्षी (२०२३) मध्ये चीनच्या डिंग लिरेन याने इयन नेपोम्नियाशी याचा पराभव करीत जगज्जेता ठरला होता. डोम्माराजू गुकेश याने वयाच्या १२व्या वर्षी ग्रॅंडमास्टर हा किताब जिंकत सर्वात लहान ग्रॅंडमास्टर किताब मिळविला शिवाय २७५० रेटींगवर पोहोचणारा सर्वात लहान खेळाडू सर्वात कमी वयात कॅंडिडेटस स्पर्धा जिंकण्याचा गुकेशला। ४५ व्या बुद्धीबळ ऑलंपियाड २०२४ मध्ये २ वैयक्तिक सुवर्णपदके तर एक टिम सुवर्णपदक जिंकले होते.

जन्म :- २९ मे २००६ रोजी चेन्नई तामिळनाडु येथे.
ग्रॅंडमास्टर - २०१९ ला हा किताब मिळाला.

# वन नेशन वन इलेक्शन अहवाल सादर.

'वन नेशन वन इलेक्शन' या विषयावरील उच्चस्तरीय समिती भारताचे माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आली होती समितीने 'एक देश एक निवडणूक' यासाठी जगातील विविध देशांचा अभ्यास केला. या उच्चस्तरीय समितीने दक्षिणआफ्रिका स्विडन बेल्जियम सह सात देशांच्या निवडणूक प्रक्रिया अभ्यासून भारतामध्ये लोकसभा व विधानसभा यांच्या निवडणूका एकाच वेळी घेण्याची शिफारस केली आहे जर्मनी जपान इंडोनेशीया फिलिपिन्स या देशामध्ये एकाच वेळी निवडणूका घेण्यात येतात. भारताचे माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद मार्च २०२४ मध्ये आपला अहवाल आपल्या उत्तराधिकारी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांना सादर करण्यात आला होता. य दक्षिणआफ्रिकेत नॅशनल ॲसेंब्ली आणि प्रांतीय विधीमंडळासाठी मतदारांनी एकाच वेळी मतदान केले जाते मात्र महा-पालीका निवडणूका पाच वर्षांचा कालावधी मध्ये प्रांतीक निवडणूकांपेक्षा वेगळ्या पध्दतीने घेतल्या जात असतात आगामी मे महिन्यात दक्षिण आफ्रिकेत सार्वत्रीक निवडणूका होणार असून प्रत्येक प्रांतासाठी नविन नॅशनल ॲसेंब्ली तसेच प्रांतीक विधीमंडळाची निवड केली जाणार आहे स्विडन मध्ये राजकीय पक्षांना त्यांच्या मतांच्या टक्केवारीच्या आधारे निवडून आलेल्या विधानसभेत विविध जागा जिंकल्या जातात/त्या दिल्या जातात असे समितीने स्पष्ट केले. उच्चस्तरीय समितीचे सदस्य श्री सुभाष सी कश्यप यांनी अविश्वास ठरावाच्या जर्मन मॉडेल चे समर्थन केले आहे जपानमध्ये प्रथम पंतप्रधानांची नियुक्ती होते त्यानंतर तेथील राजा त्यास मान्यता देतो जर्मनी आणि जपान मधील एकत्र निवडणूकीचे मॉडेल भारतासाठी फायदेशिर ठरू शकेल असे समितीचे मत असे सन २०१९ पासून इंडोनेशियाचे अध्यक्ष उपाध्यक्ष व दोन्ही राष्ट्रीय व प्रादेशिक विधानसंस्थांचे सदस्य एका दिवशी निवड

# जपान समलिंगी विवाहास नकार.

जपान सरकारने समलिंगी विवाहास मान्यता देणारे एक मान्यता विधेयक नामंजूर करताना घटनाबाह्य ठरविले. असून असा निकाल जपानी उच्च न्यायालयाने दिला आहे. त्यामुळे देशातील एलजीबीटीक्यू समुदायास दिलासा मिळाला असून समलिंगी विवाहास मान्यता देण्यासाठी सरकारवर दबाव वाढला आहे. दक्षिण जपानमधील फुकुओका उच्च न्यायालयाने हा निकाल दिला असून सन २०१९ पासून सदर विषयावर ९ याचिका दाखल केल्या होत्या. त्यापैकी ८ याचीकाचा निकाल एलजीबीटीक्यू समुदायाच्या बाजूने लागला आहे. जपानी राज्यघटनेने सर्व नागरीकांना कलम १३ अंतर्गत आनंदाचा मुलभुल अधिकार प्रदान केला आहे समलिंगी विवाहास मान्यता देण्यास नकार देणे म्हणजे या मुलभूत अधिकारांचे उल्लंघन आहे. असे निरिक्षण न्याय. ताकेशी ओकादानी निकालपत्रात सांगितले. समलिंगी विवाहांवर सध्या असलेल्या बंदीमुळे राज्यघटनेने दिलेल्या समता व्यक्तिगत प्रतिष्ठा, स्त्रिपुरुष गुणवत्ता या हमींचेही उल्लंघन होते. ती कायम ठेवण्यासाठी कोणतेच कारण न्यायालयास दिसत नाही. सन २०१९ पासून ३० समलिंगी जोडप्यांनी समलिंगी विवाहास मान्यता मिळावी यासाठी खटले दाखल केले आहेत. फुकुओका, कुआमोती या प्रांतातील तीन खटले जोडपी ताज्या खटल्यात वादी होती. याच विषयावरील आणखी दोन याचिका प्रलंबीत असून त्यावर मार्चमध्ये निकाल अपेक्षीत आहे यामध्ये जपान सरकारने मत नोंदविले आहे. जपानी विवाह नोंदणी कायदयानुसार समलिंगी विवाहास मान्यता नाही. समलिंगी विवाह नैसर्गिक पुनरुत्पादनाच्या तत्वाच्या विरोधात आहेत असे न्यायालय सांगते.

**निकालाचे राजकीय पडसाद :-**

शुक्रवार दि १३ डिसेंबर २०२४ चा निकाल जापान मधील सत्ताधारी कॉन्झर्वेटिव्ह लिबरल डेमॉक्रॅटिक पार्टीस मोठा धक्का मानला जात आहे. ऑक्टोबरमध्ये आलेल्या निवडणुकीत या पक्षाला अल्पमताचे सरकार स्थापण करावे लागले होते. आता सत्ताधारी पक्षास जनमत आणि विरोधी पक्षाच्या दबावामुळे आपली भूमिका आणखी मवाळ करावी लागणार आहे. त्यामुळे सध्याच्या या विधेयक आणि उच्च न्यायालयाचा निकाल या दोन्ही बाबतीत पुढे काय याची वाट पहावी लागणार आहे

# व्हिडीओगेमवर चीनमध्ये बंदी

ऑस्ट्रेलियाच्या संसदेने नोव्हेंबर २०२४ मध्ये १६ वर्षा-खालील मुलांच्या समाजमाध्यमांच्या वापरावर बंदी घालण्यासाठी एक ऐतिहासिक विधेयक मंजूर केले. त्यानंतर आता चीनमध्येही व्हिडीओ गेमच्या वापरावर निर्बंध लादण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. चीनमध्ये १८ वर्षाखालील मुलांना विशिष्ट दिवसात फक्त एक तास ऑनलाईन गेमिंगची परवानगी दिली असून त्याची अंमलबजावणीसाठी सदर प्रक्रिया सुरू झाली आहे. चीनमध्ये व्हिडीओ गेमचे प्रमाण मोठे आहे. टेन्सेंट सारख्या चीनी तंत्रज्ञान क्षेत्रातील भव्य जागतिक गेमींग अधिक वेग घेत आहे. तरीही मुले करीत असलेला व्हिडीओ गेमचा वापर चीनसाठी मोठा प्रश्न आहे. व्हिडीओ गेम व्यसनासारखा असून देशांची सांस्कृतिक आणि सामाजीक हानी होण्यास ते कारणीभूत ठरत असल्याचे चीनने म्हटले आहे. चीनमध्ये पालकांना मुलांच्या ऑनलाईन गेम खेळण्याविषयी वाटणारी काळजी हादेखील मुलांनी ऑनलाईन गेम खेळण्यावर कठोर निर्बंध लागू करण्याबाबतचा महत्वाचा मुद्दा आहे. चीनच्या या बंदीच्या धोरणाला पालकांनी मोठा पाठींबा दिला आहे. सन २०१९ मध्ये चीनने १८ वर्षापेक्षा कमी वयांच्या मुलांसाठी ऑनलाईन गेम खेळण्याची वेळ मर्यादीत केली. आठवड्यातून दररोज फक्त ९० मिनिटे किंवा आठवडाभरात तीनच तास हा गेम खेळता येतील असा कायदाच आणला आहे. शिवाय रात्री १० वाजल्यापासून सकाळी ८ वाजेपर्यंत ऑनलाईन गेम खेळण्यावर बंदीही घालण्यात आली आहे. २०२१ मध्ये यात एक दुरुस्ती करण्यात आली आणि शुक्रवार, शनिवार, रविवार आणि सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी ऑनलाईन गेम खेळण्याची वेळ फक्त रात्री ८ ते ९ पर्यंत मर्यादीत करण्यात आली आहे. गेमशी संबंधीत बंदीचे नियम पाळले जावेत यासाठी चीन विविध यंत्रणा राबविण्यावर भर देत आहे वयाची खात्री करणारी यंत्रणा काही गेममध्येही समाविष्ट करण्यात आली आहे. यात खेळाडूच्या वयाची खातर

जमा करण्यासाठी आपले खरे नाव आणि ओळखपत्र देण्याची विनंती करण्यात आली आहे. काही खेळामध्ये मुले अल्पवयीन असल्याची खात्री करण्यासाठी चेहऱ्याची ओळख करून घेणेही सुरु करण्यात आले आहे. यातून आता माहितीच्या गोपनियतेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

मोबाईल निर्मिती करणाऱ्यांनाही यातच समांतर असे मायनर मोड नावाचे ॲप्लीकेशन सादर केले आहे. विशिष्ट वेळ मोबाईल गेम खेळल्यानंतर समाज माध्यमांचा युजर्सचा वापर एकदम कमी होईल अशी सुविधा या ॲपमध्ये आहे. चीनने केलेल्या कठोर नियमानंतरही काही मुले यातून सुटकेचा उपाय शोधतातच एका सर्वेक्षणातून असेही दिसून आले आहे की ७७% पेक्षा जास्त अल्पवयीन मुलांनी आपल्याहून मोठ्या मुलांच्या मित्रांच्या नातेवाईकांच्या नावे खाती उघडली आहेत तसेच तपासयंत्रणेपासून खरे नाव लपविण्याचा प्रयत्न हा आहे.

चीनमध्ये या नियमातून अल्पवयीनांची सुटका करून देऊन खाते उघडण्यासाठी मदत करणारी बाजारपेठही चीनमध्ये आहे ती अशी खाती समाजमाध्यमावर उघडून या कमी वयाच्या मुलांना विकली जातात. मोठ्या वयांच्या लोकांना छायाचित्राचा वापर करून खरा चेहरा लपविण्याचा यशस्वी प्रयत्नही काही मुलांनी केलेले आढळले आहे यावरून तंत्रज्ञानावर आधारीत नियंत्रणाच्या मर्यादा लक्षात येऊ शकतात समाजमाध्यमावर खरी माहिती देण्यातून मुले सायबर क्राईमला बळी पडण्याची शक्यताही व्यक्त केली जात आहे

# ब्रिटनमध्ये दयामरणाचा अधिकार

ब्रिटन पार्लमेंट सदस्यांनी २९ नोव्हेंबर २०२४ रोजी दयामरण विधेयकाला प्राथमिक मंजूरी दिल्यामुळे सध्या हा विषय चर्चेत आला आहे. असाध्य आजारामुळे मरणासन्न अवस्थेत असलेल्या प्रौढ रुग्णांना दयामरणाचा अधिकार देणाऱ्या दयामरण विधेयकास (ॲसिस्टेड डाईंग बील) ब्रिटनच्या पार्लमेंट सदस्यांनी २९ नोव्हेंबर २०२४ रोजी प्राथमिक मंजूरी दिली. सत्ताधारी मजूर पक्षाचे सदस्य किम लीडबिटर यांनी हे विधेयक हाऊस ऑफ कॉमन्स मध्ये मांडले. दोन्ही बाजूंनी जोरदार चर्चा झाल्यावर अखेर हे विधेयक ३३० विरुद्ध २७५ मतांनी मंजूर करण्यात आले. या विधेयकाला तत्वतः मान्यता मिळाली असून आता हाऊस ऑफ लॉर्ड्स या वरिष्ठ सभागृहात ते मंजूरीसाठी ठेवण्यात येईल. तिथे मंजूरी मिळाल्यानंतर हा कायदा लागू केला जाईल. सध्या या विधेयकावर पार्लमेंटमध्ये विविधांगी अभ्यास केला जाणार असून काही तरतूदी नव्याने लागू होण्याची शक्यता आहे. हा कायदा १८ वर्षे पूर्ण झालेल्या प्रौढ रुग्णांसाठी लागू होणार आहे. प्रकृती चिंताजनक असलेल्या ज्यांचा मृत्यू डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार सहा महिन्यांच्या आत होऊ शकतो. अशा रुग्णास सन्मानाने दयामरणाचा अधिकार देण्यात येणार आहे. दयामरण ही संज्ञा एखादया रुग्णाला असाध्य आजारापासून उद्भवणाऱ्या शारिरीक वेदना टाळण्याच्या दयाळू हेतूने दिलेल्या मृत्यूसाठी वापरली जाते. रुग्ण असाध्य व दिर्घ आजाराने ग्रस्त असेल तर त्याला दयामरण दिले जाऊ शकते. डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार एखादया रुग्णाचा मृत्यू वर्षभराच्या कालावधीत होऊ शकतोय.

पण तो असाध्य वेदनांनी त्रस्त असेल तर त्याला दयामरण दिले जाऊ शकते. दयामरणाच्या कायदा हा तसा अनेक देशामध्ये लागू करण्यात आला आहे. मात्र त्याच्या तरतूदी वेगवेगळ्या आहेत. दयामरण कोणास दयावे याबाबत एकमत नाही काही देशात व्याधीग्रस्त रुग्ण शरिराचा अंत व्हावा म्हणून मृत्यूचा मार्ग मोकळा व्हावा असे मानतो व त्यावेळी त्यास दया-मरणाचा अधिकार देण्यात येतो. मात्र एखादा रुग्ण अशी दयामरणाची मागणी करु शकत नाही. त्यांच्या मेंदूची सारासार विचार करण्याची क्षमता संपलेलीच असते. अशा वेळी डॉक्टरांचा सल्ला आणि कुटूबियांचे मत विचारात घेऊन दयामरण दिले जाते. भारतात ही अरुणा शानभाग ला अपवादात्मक दयामरण दिले होते मरणासन्न व्यक्तीस ईच्छामरण दयावे की दयामरण हा वाद अनेक देशामध्ये आहे. ईच्छामरण व दयामरण यामध्ये मूलभूत फरक आहे. मात्र दोघांच्या व्याख्येत गोंधळ आहे. इच्छामरण मागणाऱ्या व्यक्तीची मान-सिक स्थिती वैदयकीय दृष्ट्या सक्षम व सदृढ असते स्वतःची जीवन संपविण्याची ईच्छा असल्याने येणारे मरण त्याला इच्छामरण असे म्हणतात. दयामरणाची कृती अशा व्यक्तीस संदर्भित करते जी बाब गंभीरपणे आजारी असणाऱ्या वैदयकीय व्यावसायिकाकडून प्राण-घातक औषधे घेतात. ज्याचे ते स्वत: व्यवस्थापन करतात. इच्छामरण ही दुख:पासून मुक्त होण्यासाठी एखाद्या व्यक्तीचे जीवन जाणूनबुजून संपविण्याची क्रिया आहे. ज्याद्वारे डॉक्टरांद्वारे प्राणघातक औषध दिले जाते ज्यामध्ये रुग्ण गंभीर रुग्ण आजारी नसू शकतात. रुग्णाला असह्य वेदना सहन कराव्या लागतात. पण तो या आजारातून तो बरा होऊ शकतो पण वेदना सहन न होऊ शकत असल्याने ते मृत्यूची

इच्छा व्यक्त करतात. काही वृद्ध वयोपरत्वे आजार सहन करु शकत नाही. अशा रुग्णांना इच्छामरण दिले जाते. इच्छामरणाचेही दोन प्रकार आहेत यात स्वैच्छिक इच्छामरण जिथे रुग्ण संम्मती देतो. रुग्ण बेशुद्ध अवस्थेत असेल तर डॉक्टर आणि कुटुंबिय यांच्या संम्मतीने मृत्यु दिला जाऊ शकतो.

दयामरणास कायदेशिर परवानगी देणारा पहिला देश आहे नेदरलॅडस. सन २००२ मध्ये दयामरणास नेदरलॅडसने परवानगी दिली. नेदरलॅडसच्या कायद्यानुसार असाह्य स्थितीतील असणाऱ्या रुग्णाला डॉक्टर औषधाची प्राणघातक मात्रा देऊ शकतात. या राष्ट्राने तर सहाय्यीत आत्महत्येस ही कायदेशीर मान्यता दिली आहे. बेल्जियम या देशानेही २००२ मध्ये या कायद्यास मंजुरी दिली. लक्झेम्बर्ग व स्पेन या देशामध्येही दयामरणास परवानगी आहे. अमेरिकेतही ५० पैकी ११ राज्यात वैद्यसहाय्यीत दयामरणास परवानगी आहे. कॅनडात इच्छामरण ज्याला तिथे मृत्युसाठी कायदेशिर मदत असे म्हटले जाते त्यास परवानगी आहे. ऑस्ट्रेलियातील काही राज्ये आणि न्युझिलंड मध्येही दयामरणास मान्यता आहे.

प्रसिद्ध मराठी अभिनेते अशोक सराफ यांना नटसम्राट बालगंधर्व जीवनगौरव पुरस्कार महाराष्ट्र राज्याचे सध्याचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांचे हस्ते सन्मानित करण्यात आले आहे.

अभिनेते सयाजी शिंदे, गायक शंकर महादेवन गायिका वैशाली सामंत यांना नटसम्राट बालगंधर्व गौरव पुरस्कार तसेच गायिका पिहू शर्मा तसेच गायक अंगद राज यांना नटसम्राट बालगंधर्व रायझिंग स्टार पुरस्कार प्रदान करण्यात आला. ज्येष्ठ गायक सुरेश वाडकर यांचाही विशेष सन्मान करण्यात आला. हा सोहळा विलेपार्ले येथे पार पडला.

बालगंधर्व स्मारक समितीचे संस्थापक खजिनदार दत्तात्रय माने व इंडियन टॅलेंट सन्मान फौंडेशन या संस्थेच्या माध्यमातून विविध क्षेत्रातील उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या लोकांचा सन्मान.

स्वप्निल बांदोडकर, सतिश प्रजापती, संतोष लिंबोरे रविकुमार सोलापूरे, श्रावणी खोत यांना कलारत्न पुरस्कार. पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांना रणझुंजार पुरस्कार.

प्रशासकीय सेवेत विनिता वेद सिंघल, अशोक काकडे सुधाकर शिंदे सतिश जाधव यांना सेवारत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला.

टेबल टेनिस असोसिएशनचे अध्यक्ष प्रविण लुंकड यांना क्रिडारत्न पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

# ईशान्य देशातील पेच व भारत.

भारताच्या पुर्व सिमेवर मॅनमार बांग्लादेश ही महत्वाची राष्ट्रे आहेत.
गुंतागुंतीचे प्रश्न अतिशय गुंतागुंतीचे आहेत. मॅनमारमध्ये अनेक
वांशिक गट आणि जमाती राहतात ज्यांचे त्यांच्या भागावर मोठे
नियंत्रण आहे मात्र अर्ध्या मॅनमारवर लष्कराचे नियंत्रण दिसतेय.
उर्वरीत प्रदेशात आंग स्यांग स्यू की यांच्या नेतृत्वाखालील
नॅशनल लिग फॉर डेमोक्रसी यांशिवाय शीन करेन रोहिंग्या व
वांशिक जमातीचे प्राबल्य आहे. बांग्लादेशातील नोबेल सन्मान
विजेते अर्थशास्त्रज्ञ मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखालील
सरकार अस्तित्वात आल्यापासून भारतविरोधी बांग्लादेश नॅश-
नल पार्टी आणि जमात ए इस्लामीचा प्रभाव वाढत आहे.
बांगलादेश आणि मॅनमार देशातून सेव्हन सिस्टर्स मधील
काही फुटीरतावादी संघटनांना मदत मिळत आहे. यावर नियं-
त्रण ठेवण्यासाठी भारताने काही वेळा लष्करी सत्तेस पाठींबा
देण्याची भूमिका घेतली आहे. मॅनमार व बांग्लादेश संदर्भात
धोरणे ठरविताना तेथे चीनचा प्रभाव वाढणार नाही यांची
दक्षता घेणे महत्वाचे आहे. बांग्लादेशबाबत भारत परिचित
असला तरी तो मॅनमारबाबत मात्र नाही. दोन्ही देश ब्रिटीश
ईस्ट इंडिया कंपणीचे भाग होते १ एप्रिल १९३७ ला ब्रम्हदेश
भारतापासून वेगळा करण्यात आला तसेच १४ ऑगस्ट १९४७
पाकीस्तान तर ४ जानेवारी १९४८ रोजी मॅनमारला स्वातंत्र्य
मिळून देण्यात नोबेल विजेत्या आंग स्यांग स्यू की यांचे
वडील आंग स्यांग यांच्यावर क्रांतीकारी विचारांचा प्रभाव होता
पण त्याआधी १९ जुलै १९४७ ला त्यांची हत्या झाली. मॅनमार
मध्ये लोकशाही राबविण्याचे थोडे फार प्रयत्न केले गेले आहेत
पण आंग स्यांग स्यू की यांची लोकप्रियता मान्य करणे येथील
लष्करास पचणारे नव्हते. नोव्हेंबर २०२० अखेरीस मॅनमारात
सार्वत्रीक निवडणूक झाली. यात एन. एल. डी. चा विजयी झाला
१ फेब्रुवारी २०२१ पासून नविन सत्राची सुरुवात होणार होती
पण याआधीच निवडून आलेल्या खासदारांची धरपकड करून
लष्कराने सत्ता संपुर्ण काबीज केली. नंतर स्यू की यांना २७
वर्षांची तुरुंगवासाची शिक्षा होठावली व ७९ वर्षीय स्यू की
यांना नंतर नजरकैदेत ठेवण्यात आले.

पत्रकार अविनाश पालीवाल नी नियर ईस्ट मध्ये भारत बांगलादेश मॅनमार यांच्या राजकीय उकल संरक्षण क्षेत्र नजरेसमोर ठेवून करणे गरजेचे आहे. ईशान्य भारतातील फुटीरतावाद्यांना चीन, मॅनमार, बांगलादेशातून शस्त्रास्त्र पुरवठा होणार नाही हे पाहणे महत्वाचे आहे. पाकीस्तान-ची आय.एस.आय देखिल या भागात सक्रिय आहे. १९७१ च्या आधी लेव्हाच्या पुर्व पाकीस्तानातून ईशान्य भारतामधील फुटीरतावादी संघटनांना पाकीस्तानच्य मदत करीत असे. मॅनमार स्वातंत्र्य आंदोलनात आंग सांग यांच्याप्रमाणेच यू.नु यांचीही महत्वाची भूमिका होती १९६२ मध्ये विन या लष्करी अधिकाऱ्याने बंड करुन यू.नु यांना सत्तेतून हटवून सत्ता काबीज केली याविळी विन सरकारला मान्यता देणारा भारत जगातील देश होता. एरीक गोन्सालेझ नावाच्या तरुण राजनैतिक अधिकारी रेंगून येथील भारतीय उच्चायुक्तालयात कार्यरत होता त्याचे मते मॅनमार बराच काळ सैनिकी प्रशासन राहील पण चीन यांनी भारतास मदत केली नाही. तरीही भारतीय जवान ब्रम्हदेशात जाऊन नागा फुटीरतावादींनी करेन वांशिक जमातीच्या करेन इंडिपेन्डट ऑर्गनायझेशनची मदत केली आणि त्यांचे वर्चस्व असलेल्या भागात राहून भारतविरोधी कारवाया करु लागले नी वेन यांनी ब्रम्हदेशातील भारतीयांच्या आयात निर्यात व अन्य व्यवसायांचे राष्ट्रीयकरण केले. १९६३ नंतर येथील जवळजवळ ३ लाख भारतीयांना ब्रम्हदेश सोडण्यास भाग पाडले गेले किंवा त्यांना पकडण्यात आले. डिसेंबर १९६४ इंदिरा गांधी रंगूनला गेल्याने विन भारतात आले आणि चांगले राजनैतिक संबंध प्रस्तापित झाले १९६५ च्या युध्दात ब्रम्हदेश तटस्थ राहीला पण काश्मिरमध्ये पाकिस्ताननेच युध्दाची सुरुवात केली असे मात्र स्पष्ठ शब्दात सांगितले मणिपुर आजही अशांत आहे. मादक पदार्थांच्या व्यापारात सक्रिय असलेल्या काही मैतेई व कुकी लोकांना गेल्या सप्टेंबर-आक्टोबर २०२३ मध्ये एम आय.ए ने ताब्यात घेतले. आणि मॅनमार येथे असणाऱ्या क्रांतिकारी संघटनांचे मणिपुरमध्ये वांशिक हिंसाचार करण्याचे षडःयंत्र असल्याचा दावा केला. ॲक्ट इस्ट पॉलिसीच्या दृष्टीने मुक्त संचार धोरण महत्वाचे असून त्यावर जानेवारीत बंदी घालण्यात आली. आता दोन देशादरम्यान कुंपन घालण्याचा निर्णय घेण्यात आला आहे तर भारत-मॅनमार सिमेजवळ राहणाऱ्यांना पुर्वीप्रमाणे व्हिसा शिवाय इतराच्या प्रदेशात १६ किमी पर्यंत जाता येणार नाही. मॅनमारच्या सहाय्याने (विशेषत: लष्कराने) मॅनमारच्या आश्रयात असलेल्या

पिपल्स लिबरेशन आर्मी ऑफ मणिपुरच्या अपयोग भारत विरोधी, केल्याचा दावा केला जात आहे. पी.व्ही. नरसिंहराव पंतप्रधान असताना त्यांनी पूर्वेकडील देशाचे महत्त्व लक्षात घेऊन लूक ईस्ट पॉलिसी चालू केली तर नरेंद्र मोदी सत्येत आले व ॲक्ट ईस्ट पॉलिसी हाती घेतली. नागालॅंडच्या फुटीरतावाद्यांचा विचार करता सर्वात अगोदर नाव येते ते अंगामी झापु फिझो यांचे. १९५२ मध्ये त्यांनी बेकायदा जनमत घेतले. त्यानंतर फिझो ब्रम्हदेशात पळून गेले. तिथून जिनेव्हास जाऊन संयुक्त राष्ट्रात नागाच्या स्वातंत्र्यावर पाठिंबा मिळविणे हेच फिझोची योजना होती. भारतीय गुप्तहेर फिझोवर लक्ष ठेवून होते. ब्रम्हदेशाने फिझोंना पकडले त्यानंतर जून १९५३ मध्ये त्यांना मुक्त केले. १९५५ नंतर नागा आंदोलनास मोठ्या प्रमाणात हिंसक वळण लागले. नागा नॅशनल कौन्सिलवर टि सारवरी सारख्या मवाळ नेत्यांचा प्रभाव होता, तर फिझो कट्टर विचाराचे होते. १८ जानेवारी १९५६ रोजी फिझो समर्थकांनी टि. सारवरी यांची हत्या केली. डिसेंबर १९५८ मध्ये फिझो ढाक्क्यातून लंडनला गेले. आता भारताच्या नॅशनलिस्ट कौन्सिल ऑफ नागालॅंड (आय. एम) आणि खपलांग गटाशी युद्ध विराम आहे.

१९६५ च्या भारत पाक युद्धानंतर पाकिस्तानचे सर्वेसर्वा अयुब खान यांनी मिझो नॅशनल फ्रंटचे प्रमुख लालडेंगा यांना मदत करण्यास सुरुवात केली. आसामच्या लुसाई हिल येथे स्वतंत्र मिझोरमसाठी लालडेंगा यांनी आंदोलन सुरू केले होते शिलॉंग येथील पाक सहाय्यक उच्चायुक्तालय फ्रंटने जुलै १९६२ मध्ये संपर्क केला होता. भारताने आधीच सहाय्यक उच्चायुक्तालय बंद करण्याचा निर्णय घेतला होता, पण असे केल्यास पुर्व पाकिस्तान मधील भारतीय उपउच्चायुक्तालय बंद करेल ही भारतासाठी चिंतेची बाब होती. लालडेंगा १९६३ मध्ये (नोव्हेंबर) ढाक्का येथे गेले व त्यांना पाकीस्तानकडून आर्थिक व शस्त्रास्त्र यांची मदत ह्वी होती लालडेंगांना ३ रिव्हाल्व्हर व काही रुपये देण्यात आले. ते भारतात आल्यावर त्यांना पकडण्यात आले. चांगल्या वर्तनाची हमी दिल्यावर त्यांना फेब्रुवारी १९६४ मध्ये सोडण्यात आले. १ मार्च १९६६ रोजी लालडेंगा यांनी मिझोरामच्या स्वातंत्र्याची घोषणा केली, व सरकारी इमारतीवर हल्ले सुरु केले ते आंदोलन चिरडून पुढे लालडेंगा आणि त्यांचे कुटुंबिय यांना ढाक्क्यास पाठविण्यात आले. २८ मार्च १९६७ लालडेंगा ढाक्का चीन उपायुक्तलयात गेले

चीनने त्यांना मदतीचे आश्वासन दिले सप्टेंबर १९६८ लालडेंगा पेकींग (सध्याचे बिजींगला) गेले. तसेच आक्टोबर १९७० ला लालडेंगा पुन्हा चीनला रवाना झाले होते.

१९७५ मध्ये बांगलादेशात झिया उर रेहमान सत्तेत आले व ते ब्रम्हदेशातील रोहिंग्यांना शस्त्रपुरवठा करतील असा अंदाज भारताचा होता पण स्थानिक परिस्थितीमुळे झियांना तसे करता आले नाही. पण १९७८ मध्ये जेव्हा हजारोंच्या संख्येने रोहिंग्या बांगलादेशात आले तेव्हा त्यांना ब्रम्हदेशात परत घेतले नाही तर युध्द करु अशी धमकी झियांनी दिली होती. १९७८ मध्ये बांगलादेश ब्रम्हदेश यांच्यातील करारामुळे झिया यांच्या महत्वकांक्षेबद्दलचर भारताची चिंता वाढली. झियांची १९८१ ला हत्या झाली त्यानंतर सत्तेत आलेल्यांनी फुटला करण्यात येणाऱ्या मदतीत कपात केली लालडेंगा आणि राजीव गांधी यांच्यात ३० जून १९८६ ला मिझोराम शांतता करार झाला २१ ऑगस्ट १९८६ ला लालडेंगा यांचा निवडणुकीत विजय झाला आणि ते मुख्यमंत्री बनले.

बांगलादेशाच्या पंतप्रधान शेख हसिना यांना विद्यार्थी आंदोलनामुळे ५ ऑगस्ट २०२४ रोजी देश सोडावा लागला व त्या तात्पुरत्या भारतात आहेत असे परराष्ट्रमंत्री जयशंकर यांनी संसदेत सांगितले. त्यांना अजूनतरी ब्रिटन अथवा अन्य देशांनी आश्रय देण्याचे घोषित केलेले नाही. २००९ बांगलादेश रायफल्सने केलेल्या बंडाची आणि भारताने मदतीसाठी केलेल्या तयारीची सविस्तर माहिती लक्षात घेता तेव्हाही शेख हसिना पंतप्रधान होत्या २६ फेब्रुवारी २००९ च्या सायंकाळी पॅराशूट रेजिमेंटच्या कमल दिपसिंग संधु यांना तयार राहण्याचा आदेश देण्यात आला होता. पाच सहा विमाने आली आणि परत तयार राहण्याची सूचना आली. त्यामुळे गंभीर परिस्थितीचा अंदाज संधु यांना होता. पुढील अडीच तासात पश्चिम बंगालच्या कलाईकुंडा विमानतळावर हजारो पॅराशुटर्स जमा झाले. बांगलादेश रायफल्सने बंड केले होते व ते अधिकारी आणि त्यांचे कुटुंबीय यांची हत्या करु लागले होते. शेख हसिना पंतप्रधान म्हणून नुकत्याच निवडून आल्या होत्या आणि त्या संरक्षण मंत्रीही होत्या. संधु यांनी जवानांना सांगितले की पंतप्रधान शेख हसिना यांनी भारताची मदत मागितलेली आहे म्हणून पुढील आदेशाची वाट पाहत आहोत. शिवाय ढाक्का येथे जेव्हा आपण पोहोचेल तेव्हा काय करायचे याची रुपरेषा बनवलेय

ढाक्का येथील भारतीय राजनैतिक अधिकाऱ्यांची भारत सरकारला चिंता होती शेख हसिनांनी प्रणव मुखर्जींना फोन करुन मदत मागितली होती. तर मुखर्जींनी मदतीचे आश्वासन दिले होते. परराष्ट्रमंत्री शिवशंकर मेनन यांनी त्वरीत अमेरिका, ब्रिटन, जपान चीन यांच्या राजदूतांशी संपर्क साधून त्वरीत मदत शेख हासिना यांना करण्यास सांगितले. कलाईकुंडा जोरहाट आगरताळा विमानतळावर देखिल पॅराट्रूपर्सना बोलविण्यात आले होते. आदेश आला की भारतीय जवान बांगलादेशात घुसतील असा निर्णय घेण्यात आला होता. ढाक्का, तेजगाव या ठिकाणचे विमानतळ काबीज करुन शेख हासिनांना सुरक्षित बाहेर काढण्याची योजना आखण्यात आली होती. परंतु तो आदेश आला नाही कारण त्याची आवश्यकता भासलीच नाही. बांगला रायफलच्या २०० जवानांची धरपकड करण्यात आली आणि बांगला रायफल्स नंतर बंद करण्यात आले तेव्हा भारताची नजर बांगलादेशाच्या घडामोडीवर बारकाईने ठेवलेली होती.

भारताने २००१ ते २००६ पर्यंत सत्तेत असलेल्या BNP आणि जमातच्या अनुभव घेतला होता बंद करणाऱ्यांच्या विचारसरणीबाबत देशास (भारतास) चिंता होती. बीपीएन जमातच्या राजवटीत जमातच्या अनेक लोकांची भरती ही सैन्यात करण्यात आली. पाकीस्तान त्याचा उपयोग करित होता. बांगलादेशातून ईशान्य भारतातील फुटीरतावाद्यांना मोठा शस्त्रपुरवठा होत होता. १ एप्रिल २००४ रोजी शस्त्रास्त्राने भरलेले १० ट्रक पकडण्यात आलेले होते. ईशान्य भारतात ही शस्त्रे व्यवस्थीत पोहोचतील याकडे ढाक्का येथील एका सुरक्षित घरातून युनायटेड लिबरेशन फ्रंट ऑफ आसाम इंडिपेंडन्टचे प्रमुख परेश बरुआ बारकाईने पाहत होते. भारताची पुर्वसिमा किती संवेदनाशील आहे यावरुन स्पष्ट होते. लष्कर सरस; लष्कर सत्ता सोडत नाहीत. महम्मद युनुस कट्टरतावादी नाहीत पण धार्मिक राजकीय संघटनांना आता महत्व मिळत आहे. १० राष्ट्राच्या आसियानशी भारताचे चांगले संबंध आहेत. आसियान राष्ट्रे व चीनमध्ये सक्रिय चायनातरुन तणाव आहे त्यासाठी भारताने शेजारी देशाना अधिक महत्व देणे अत्यावश्यक आहे.

# पंतप्रधान सूर्यघर योजना २०७५.

केंद्रसरकारने पंतप्रधान सूर्यघर योजना २०७५ लागू करताना त्याचा फायदा खेडी, वाड्या वस्त्या, छोटी घरे यांना होईल असा अंदाज होता पण तो साफ चुकला. गौतम अदानींना अमेरिकन सिक्युरिटीज एक्स्चेंज कमिशन-ची नोटीस आली कारवाई होईल की नाही यापेक्षा भारताच्या सौरऊर्जा क्षेत्राचं आता काय होणार या प्रकल्पास अदानी अफेअरने खो बसू शकते अशी चर्चाही आता सुरु झाली. ती भारतावर ऊगवणारा सूर्यही अदानी समूह आंदन म्हणून वापरतोय. गत दोन वर्षांपासून हा अदानी समूह हरीत ऊर्जा क्षेत्राचा तारणहार बनलाय. वास्तविक हा समूह तर कोळसा खाण उद्योग क्षेत्रात आहे तसेच पारंपारिक ऊर्जा निर्मिती क्षेत्रात आघाडीवर आहे. म्हणजे पर्यावरणास घातक अशा उद्योगात आघाडीवर असणारा हा उद्योग आता पर्यावरण स्नेही उद्योगात आघाडी घेतोय म्हणजे दारुविक्री करणाऱ्याने व्यसनमुक्तीचे धडे देणे होय. अर्थात वाल्याचा वाल्मीकी होतोय

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ७५००० कोटी रुपयांची प्रधानमंत्री सूर्यघर मुफ्त बिजली योजना जाहीर केली. सदर योजनेनुसार ज्या वसाहती, सोसायट्या दोन किलोवॅट पर्यंत सौरऊर्जा निर्मिती यंत्र बसवतील त्यांना त्याच्या खर्चाच्या ६०% इतकी केंद्रीय मदत दिली जाते. त्यापुढे दोन ते तीन किलोवॅट ऊर्जा बनवतील इतका प्रकल्प सुरु झाला तर ४०% केंद्रीय मदत मिळते. जी घरं असं करतील त्यांना महिन्याला ३०० युनिट पर्यंत मोफत वीज दिली जाते. नंतर ही ऊर्जा राज्याच्या वीजजाळ्यात सोडली जात असल्याने त्याचा फायदा इतर लोकांनाही होणार आहे. त्यामुळे तो करून देणाऱ्यास काही वीज मोफत देणं गैर नाही.

भारतातील सुमारे १ कोटी घरावर हे सौरऊर्जा निर्मिती पत्रे बसवले जातील अशी अपेक्षा आहे. केंद्राने मोठ्या धडाक्यात ही योजना चालू केल्याने मोठ्या आवाजाने प्रसारही मोठा झाला - पंतप्रधानांच्या हाती योजना असल्याने आवाजाइतकाच वेगही या योजनेच्या प्रसार प्रचार यांना आला. ही योजना ग्राहक केंद्री आहे म्हणजे ग्राहकाने केंद्राच्या वेबपोर्टल वर अर्ज करायचा मग त्याची छाननी होणार नंतर कामाचा आदेश निघणार आणि मग अर्थसहाय्य मिळणार आहे.

ग्रामीण, शहरे भागाबरोबरच खेडेगावांनीही प्रतिसाद दयावा इतक कडकडीत ऊन असतंय. तेथील छोटी छोटी घरे, वाड्या वस्त्या यांना फायदा होणार असा केंद्राचा हिशोब होता. पण ही योजना अपयशी होतेय कारण लोकानुययी योजनांच्या एक भाग म्हणून सर्वच राज्य सरकारांनी सुमारे 300 युनिट पर्यंत मोफत वीज दयायचा निर्णय घेतला आहे. तर मग कशाला फुकटची डोकेदुखी आणि ती केली तरी मोफत वीज मिळणार 300-च युनिट. यात भारतीय जनता पक्षही पुढे आहे म्हणजे राज्य सरकारच्या या मोफत रेवड्यामुळे पंतप्रधान मोदींच्या या योजनेस खीळ बसताना दिसतेय. पण हा एकच तोटा राज्यांच्या मोफत योजनेने होतोय असे नाही या सौरछत योजनेअंतर्गत घराघरावर सौरपट्यातून वीज निर्मिती होणार होती व घरावरील अतिरिक्त वीज स्थानिक वीज जाळ्यामध्ये सोडली जाण अपेक्षीत होतं. ही अशी वीज तयार होणारी इतर लोकांना पुरविता यावी असं करुन विजेबाबत आत्मनिर्भर होण या आत्मनिर्भरतेत गौतम अदानी यांचा मोठा वाटा आहे. तर सौरपत्रे बनविण्यात मक्तेदारी आहे ती चीनची. ही मक्तेदारी अदानींना मोडायची आहे हे अभिमानास्पद असले तरी एसईसी ने अदानींना पकडल व अटक वॉरंट काढलं. तशी जी वीज राज्यांना गौतम अदानी देतात ती खूप महाग आहे.

पंतप्रधान सूर्यघर योजना :-

भारत सरकारने योजनेस मंजूरी दिली. २९ फेब्रु, २०२४

सन २०२६-२७ पर्यंत सदर योजनेचा खर्च - ७५०२१ कोटी रु

योजनेअंतर्गत मोफत मिळणारी वीज. ३०० युनिटपर्यंत

याशिवाय घरावर सौरपॅनलसाठी सबसिडी - ४० ते ६०%

सर्वात जास्त योजनेअंतर्गत विज निर्मिती. उत्तरप्रदेश.

योजनेत महाराष्ट्रात आघाडीवरील जिल्हा - नागपूर

पॅनलवर मिळणारी सबसिडी रक्कम ७८००० रु. पर्यंत -

२.७५ किलोवॅटच्या पॅनलवर सबसिडी - ७३५०० रुपये.

तर याचा खर्च येतो १,३०,०००/-

गौतम अदाणी यांच्या योजनेवर अमेरीकन सरकारने तर पाणी सोडले. आता सगळे अदाणींचे प्रकल्प लटकतील असे पयावरण प्रेमींना वाटतेय. याचा दुहेरी फटका आहे. एक म्हणजे प्रचंड आकाराचे सौरऊर्जा प्रकल्प बंद पडणार आणि दुसरीकडे पंतप्रधानांची घराघरावर सौरपत्रे बसविण्याची योजना बोंबलणार. तसे भारतात हीचीरवरी सुरुवात सन २०१५ मध्ये सुरु झाली असून डिसेंबर २०२३ पर्यंत या योजनेतून फक्त ११.०८ गिगॅवॅट इतकी वीज तयार केली या वर्षात ऑक्टोबर २०२४ पर्यंत हीच क्षमता १४ गिगा-वॅटवर गेली असली तरी अपेक्षीत ध्येय होते ४० गिगावॅट इतके.

या १४ गिगावॅट विजेपैकी ८०% वीज ही औद्योगिक आणि व्यापारी अस्थापणामधून तयार होताना दिसतेय म्हणजेच घरावरील सौर विजेच काय हा मोठा प्रश्न आहे. आजपर्यंत आपल्या घरावर अशी सौरकौल बसविणाऱ्या ग्राहकांची संख्या फक्त सहा लाख इतकी आहे. सुरुवा-तीस याच्च दरम्यान उद्दिष्ठ ठरविण्यात आलं होत ते १ कोटी घरावर सौरकौले बसविण्याचे. म्हणजेच अजून खूप लांबचा पल्ला गाठायचा आहे असे मानावे लागेल.

# कौटूंबिक हिंसाचार जगात दररोज १४० हत्या

जगभरातील महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. महिलांना सर्वाधिक धोका कुटूंबियांसह त्यांच्या जोडीदाराकडून होत असल्याचे संयुक्त राष्ट्राच्या अहवालामध्ये म्हटले आहे. गेल्या वर्षी जगभरात दररोज १४० महिलांची हत्या नातेवाईक अथवा प्रियकराकडून करण्यात आल्याचे या अहवालात नमूद केले आहे. सन २०२३ मध्ये ५११०० महिलांची हत्या करण्यात आली. यामध्ये विवाहितांसह तरुणींचा समावेश आहे. कुटूंबातील लोकांसह मित्र व प्रियकरासह या हत्या घडवून आणल्या आहेत. लिंगभेदातूनही मुलींवर हल्ले होत आहेत. सर्वच देशात मुलींना / महिलांना यावरुन हिंसाचारास सामोरे जावे लागत आहे. परिवारातील सदस्यांकडूनच महिलांच्या जिवास सर्वात जास्त धोका आहे असे अहवाल सांगतो. संयुक्त राष्ट्राच्या अमली पदार्थ आणि गुन्हे विभागानेही हा अहवाल प्रसिध्द करण्यात आला आहे. महिलांवरील अत्याचार निर्मूलन दिनानिमित्त हा अहवाल जारी केला आहे. विविध देशातील महिलांवरील हिंसाचाराच्या डेटा घेऊनच हा अहवाल तयार करण्यात आला आहे. कौटूंबिक हिंसाचाराच्या सर्वात जास्त घटना अफ्रिकेत घडल्या आहेत. गेल्या वर्षी या देशात २१००० महिलांच्या हत्या झालेल्या आहेत. अमेरिका, ओसिनिया, युरोपमध्येही महिलांच्या हत्या होण्याचे प्रमाण जास्त आहेत. आशियायी देशामध्ये महिलावरील अत्याचाराचे प्रमाण कमी होत आहे.

# सौरऊर्जा निर्मितीत २६०.७५ मेगावॅटची भर.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना राज्यात सर्वात जास्त प्रतिसाद नागपूर जिल्ह्यात असून या योजनेतून महाराष्ट्रभर ६५००० पेक्षा जास्त विज निर्मिती संच कार्यान्वीत झालेले असून त्यामुळे राज्यातील सौरऊर्जा निर्मिती क्षमता आता २६०.७५ मेगावॅटने वाढलेली दिसून येते. २८ नोव्हेंबर २०२४ पर्यंत राज्यातील ६५७६० नागरीकांच्या घरी सौरऊर्जा निर्मिती संच कार्यान्वित झाले आहेत. या संचामुळे राज्याची वीजनिर्मितीची क्षमता २६०.७५ मेगावॅटने वाढली आहे. या योजनेमुळे विजवापरावरील खर्चात मोठी घट आली आहे. याबरोबरच औष्णिक वीज वरील पडणारा ताण कमी झाला आहे.

सर्वाधिक वीज निर्मिती संच नागपूर जिल्ह्यामध्ये असून त्याची क्षमता १०७७७ संच कार्यान्वित झाल्याने येथील वीजनिर्मिती क्षमता आता ४३.९३ मेगावॅटनी वाढली आहे यामध्ये शहरी भागातील ९५११ संच व क्षमता (३९.०७ मेगावॅट तसेच ग्रामिण भागातील १२५६ संचाच्या ४.८६ मे वॅट) समावेश आहे.

- जळगाव जिल्ह्यात ५७७६ संच कार्यान्वित झाले असल्याने तेथील वीज निर्मिती क्षमता २१.३५ मेगावॅट, तृतीय स्थानी अमरावती जिल्ह्याचा क्रमांक लागतो. यात ४०७३ संच कार्यान्वित झाल्याने तेथील क्षमता आता १७.२६ मेगावॅट क्षमता वाढली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ४०७२ संच कार्यान्वित असून तेथील क्षमता १७.०४ मेगावॅट तीच नाशिक जिल्ह्यामध्ये ४३८७ संच कार्यान्वित आल्याने तेथील क्षमता १५.९४ मेगावॅटनी वाढली आहे. शासन आणि महावितरणाच्या सुक्ष्म नियोजनातून राज्यात सूर्यघर योजनेस चांगला प्रतिसाद मिळत आहे. या योजनेस आणखी गती देण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

# आशा काळे यांना गदिमा पुरस्कार

ग. दि. माडगूळकर प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणारा सन २०२४ सालासाठीचा गदिमा पुरस्कार ज्येष्ठ मराठी अभिनेत्या आशा काळे यांना जाहीर करण्यात आला. आधुनिक महाराष्ट्राचे वाल्मीकी ग. दि. माडगूळकर यांच्या स्मृती दिनानिमित्त १४ डिसेंबर रोजी टिळक स्मारक मंदिर येथे सायंकाळी ५ वाजता ज्येष्ठ नाटककार श्रीनिवास भणगे यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहेत.

गदिमा प्रतिष्ठानचे विश्वस्त कार्यकारी- आनंद माडगूळकर

गदिमा प्रतिष्ठानचे विश्वस्त- प्रा. प्रकाश भोंडे.

- विद्याताई माडगूळकर स्मृती गृहिणी सखी सचिव पुरस्कार विजेत्या अभिनेत्री प्रिया बेर्डे.
- प्रसिद्ध कथा पटकथा संवादलेखक आणि गीतकार क्षितीज पटवर्धन यांना चैत्रबन पुरस्कार तर
- विद्या प्रज्ञा पुरस्कार सुप्रसिद्ध गायिका मनिषा निश्चल यांना १४ डिसेंबर २४ रोजी प्रदान होणार.

आशा रामकृष्ण काळे लग्नानंतर गौरी माधव नाईक किंवा

जन्म दिनांक- २३ नोव्हेंबर १९४८ रोजी गडहिंग्लज कोल्हापूर.

पहिले व्यावसायिक नाटक- सीमेवरुन परत जा.

पहिला चित्रपट:- लाखाची माती (दादा कोंडके सोबत)

चित्रपट निर्माते माधव पांडुरंग नाईक मृत्यू सप्टे. २०२३

सन २००८ साली गोवा येथे झालेल्या ६व्या गोमंतक महिला साहित्य सम्मेलनाचे उद्घाटन आशा काळे यांचे हस्ते झाले.

सन्मान व पुरस्कार:-

२००८- रंगत संगत प्रतिष्ठान आणि साहील प्रतिष्ठानचा माणूस पुरस्कार

२००८- ठाणे महापालिकेचा गंगा जमुना पुरस्कार.

- महाराष्ट्र शासनाचा व्ही शांताराम जीवनगौरव पुर.

२०११ - भारती विद्यापिठाचा जीवनसाधना पुरस्कार.

२०१५- संस्कृती कलादर्पण पुरस्कार. (२८ एप्रिल २०१५).

२०१५ - पट्टे बापूराव प्रतिष्ठानच्या शाहीर पट्टे बापूराव पुरस्कार जाहीर (१८ डिसेंबर २०१५).

२०१६ - अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचा जीवन गौरव पुरस्कार (दि १४ जुलै २०१६).

आशा काळे यांचे चित्रपट :-

१९८५ - अर्धांगी
१९७० - अशी रंगली रात्र
१९७९ - अष्टविनायक
१९८८ - आई पाहिजे
१९७९ आयत्या बिळावर नागोबा
१९७१ - कुंकवाचा करंडा
१९८४ - कुलस्वामिनी अंबाबाई
१९८१ - कैवारी
१९७० - गणाचे घुंगरू हरविले
१९८१ - गनिमी कावा
१९७५ - घर गंगेच्या काठी
१९८२ - चांदणे शिंपीत जा
१९६१ - चूडा तुझा सावित्रीचा
१९८४ - चोराच्या मनात चांदणे
१९७५ - ज्योतिबाचा नवस
१९६९ - सांबडी माती
१९८३ थोरली जाऊ
१९८३ देवता
१९६६ पुत्रवती
१९८८ बायकोचा भाऊ
१९८८ बेदिवान भी या संसारी
१९९१ बंधन
१९६७ बाळा गाऊ कशी अंगाई
१९८४ माहेरची माणसे
१९९० सासरची पुण्याई
१९६९ सतीचे वाण
१९८० संसार
१९६८ सासुरवाशीण
१९७६ हिरवळ सावल्यांचा
१९८० हिच खरी दौलत.

आशा काळे यांची नाटके :-

१) एक रूप अनेक रंग २) एखादी तरी स्मितरेषा ३ गहिरे रंग ४ गुंतता हृदय हे ५) घर श्रीमंताचं ६) देव दिनाघरी धावला ७) नल दमयंती ८) पाऊलखुणा ९) फक्त एकच कारण १०) बेईमान ११) महाराणी पद्मीणी १२) मुंबईची माणसं १३) लहानपण देगा देवा १४) वर्षाव १५) वाऱ्यात मिसळले पाणी १६) विषवृक्षाची छाया १७) वाहतो मी दुर्वांची जुडी १८) वेगळं व्हायचय मला १९) साटलोट २०) सीमेवरुन परत जा २१) संगीत सौभद्र २२ घर श्रीमंतांचे.

दूरचित्रवाणी मालिका :-

१) इंद्रधनू २) महाराणी पद्मीणी

# वन नेशन वन सबस्क्रिप्शन योजना.

## योजना नेमकी कशासाठी :-

जागतिक पातळीवरील विविध संशोधन नियतकालीके उपलब्ध करुन देण्यासाठी केंद्र सरकारने वन नेशन वन सबस्क्रिप्शन ही योजना सादर केली आहे. याअंतर्गत डिजिटल आणि सुलभ पद्दतीने पात्र असलेल्या प्रत्येकास या संशोधन पत्रिकांचा वापर करता येणार आहे. केंद्रसरकारने तीन वर्षांपूर्वीच ही योजना प्रस्तावित करण्यात आली आहे. १ एप्रिल २०२३ पासून या योजनेची अंमलबजावणी करण्याचे नियोजन करण्यात आले होते. मात्र यास विलंब आला आहे. आता केंद्रीय मंत्रीमंडळाच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत योजनेस मान्यता देण्यात आली आहे.

## संशोधनपत्रिका कशा उपलब्द होतात ?

जगभरात चालणाऱ्या संशोधनाची माहिती शास्त्रज्ञ संशोधक विद्यार्थ्यांना संशोधन पत्रिकेद्वारे मिळते संशोधक शास्त्रज्ञांनी केलेल्या संशोधनाचे शोधनिबंध संशोधन-पत्रिकेत प्रस्थापित झाल्यानंर प्रमाणित होतात. संशोधनाची गुणवत्ता आणि महत्त्व संशोधन पत्रिका किती प्रतिष्ठेची यावर अवलंबून असते. जगभरात कोणकोणत्या विषयात व काय संशोधन झाले आहे, कोणते संशोधन सुरु आहे, याचे निष्कर्ष काय आहेत हे शास्त्रज्ञ, प्राध्यापक, विद्यार्थी यांना संशोधनपत्रिकेत प्रसिद्ध झालेल्या संशोधनपर लेख, शोधनिबंधातून समजते. सध्यास्थितीत प्रत्येक संस्थेला स्वतंत्रपणे संशोधन पत्रिकांसाठी शुल्क भरावे लागते. एका संशोधनपत्रि-केसाठी सुमारे एक लाख ते पन्नास लाख रुपयापर्यंतचा खर्च करावा लागतो. एका संस्थेकडून वेगवेगळ्या विद्याशाखा-साठी वेगवेगळ्या संशोधनपत्रिका घेतल्या जात असतात. स्वाभाविकपणे एका संस्थेला कोट्यावधी रुपये संशोधन पत्रिकांवर खर्च करावा लागतो. त्यामुळे देशभरामधील संस्था विचारात घेतल्यास संशोधन पत्रिकांच्या उपलब्धतेवर फार मोठा खर्च होतो.

## योजना कशा प्रकारे राबविली जाईल :-

वन नेशन वन सबस्क्रिप्शन सुविधा देशभरातील उच्च शिक्षण संस्था आणि संशोधन प्रयोगशाळांना उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट सरकारने निश्चित केले आहे. त्यासाठी केंद्रीय उच्च शिक्षण विभाग संकेतस्थळाची निर्मिती करण्यात आली आहे. या संकेतस्थळाद्वारे उच्च शिक्षण संस्था, संशोधन संस्थांना विविध क्षेत्रातील संशोधन पत्रिका उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. वन नेशन वन सबस्क्रिप्शन या योजनेअंतर्गत ३० प्रमुख आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिका समाविष्ट करण्यात आल्या आहेत. तसेच १३००० ई-संशोधन पत्रिकांचाही वापर करता येणार आहे. या प्रक्रियेवर अनुसंधान नॅशनल रिसर्च फाउंडेशन कडून देखभाल केली जाणार आहे. विकसीत भारत २०२७ राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० व अनुसंधान नॅशनल रिसर्च फाउंडेशन यांच्या उद्दिष्टांना अनुसरून ही योजना तयार करण्यात आली आहे. वन नेशन वन सबस्क्रिप्शन या योजनेत केंद्रसरकार कडूनच उच्च शिक्षण संस्था, संशोधन संस्थांना केंद्रीय पद्धतीने संशोधन पत्रिका उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. त्यामुळे संस्थांना स्वतंत्रपणे शुल्क भरण्याची गरज राहणार नाही. हा भार केंद्र सरकार उचलणार असल्याने मोठा खर्च

## फायदा कोणाला ?

यासाठी ६००० कोटी रुपयांची तरतूद केलेली असून हा निधी २०२५, २०२६, २०२७ अशा पुढील तीन वर्षांसाठी उपलब्ध असणार आहे. म्हणजे सरासरी २००० कोटी रु. एका वर्षासाठी उपलब्ध होणार आहेत. संशोधकांना अद्ययावत संशोधनाची माहिती मिळविणे, अभ्यास करणे शक्य होणार आहे. केंद्रसरकार, राज्यसरकार केंद्र सरकारच्या संशोधन व विकास संस्थांच्या व्यवस्थापनाअंतर्गत सर्व उच्च शिक्षण संस्थांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या आंतरविद्यापीठ स्वायत्त केंद्र असलेल्या इन्फर्मेशन अँड लायब्ररी नेटवर्क या केंद्रीय संस्थेकडून समन्वयाद्वारे या योजनेसाठी राष्ट्रीय सदस्यत्व दिले आहे. केंद्रीय उच्चशिक्षण मंत्रालयाच्या अखत्यारीतील उच्च शिक्षण संस्था, संशोधन व विकास संस्था कडून या सुविधेची उपलब्धता व अधिकाधिक वापर करण्यासाठी प्रचार करण्यात येणार. यात राज्यसरकारच्या संस्था नसतील पण त्यांनाही यात येण्याची मुभा राहील याबाबत जागृती होणार.

# ऑस्ट्रेलियात मुलांना समाजमाध्यमबंदी.

ऑस्ट्रेलिया मध्ये १६ वर्षाखालील मुलांना समाजमाध्यमे वापरण्यावर बंदी घालणारा कायदा गुरूवार दि २८ नोव्हेंबर २०२४ रोजी मंजूर करण्यात आला असून हा कायदा फेसबुक, स्नॅपचॅट, इन्स्टाग्राम सारख्या सर्व प्रसारमाध्यमासाठी लागू करण्यात आला असून नियमभंग केल्यास कंपन्यांना ३२ दशलक्ष अमेरिकन डॉलर इतक्या दंडाची तरतूद करण्यात आलेली आहे. मुलांना समाजमाध्यमावर बंदी घालणारा ऑस्ट्रेलिया हा जगातील पहिलाच देश ठरला आहे. समाजमाध्यम किमान वयोमर्यादा विधेयक २०२४ ऑस्ट्रेलियन सिनेटमध्ये बहुमताने ३४ विरुद्ध १९ मतांनी जिंकत मंजूर करण्यात आलेले आहे कनिष्ठ सभागृहात म्हणजे हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हज मध्येही बुधवार दि २७ नोव्हेंबर २०२४ रोजी १०२ विरुद्ध १३ अशा घवघवीत मताधिक्याने मंजूर करण्यात आले. नविन कायद्यानुसार १६ वर्षाखालील मुलांना टिकटॉक, फेसबुक, स्नॅपचॅट, रेडिट, एक्स (ट्विटर), इन्स्टाग्राम या समाजमाध्यमावर खाती उघडण्यासाठी बंदी असेल. याची अंमलबजावणी करण्यासाठी कंपन्यांना एक वर्षाचा कालावधी देण्यात आला असून त्यानंतर मात्र मोठ्या रकमेचा दंड कंपन्यांना भरावा लागेल. नविन कायद्यावर ऑस्ट्रेलियात मतमतांतरे आहेत. बाल हक्क संघटनांनी कायद्यास विरोध केला असला तरी पालकांकडून मात्र या कठोर नियमाचे स्वागत केले आहे. ऑस्ट्रेलियात सन २०२५ला निवडणूका होणार असून पंतप्रधान अँथनी अल्बानिज यांच्या घटत चाललेल्या लोकप्रियतेस या कायद्यामुळे बळकटी मिळू शकते असे मानले जात आहे. मात्र याच वेळी बहुतांश अमेरिकन कंपन्यांना याचा फटका बसणार असल्यामुळे ऑस्ट्रेलिया अमेरिका संबंधामध्ये तणाव वाढण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

— आत्तापर्यंत अनियंत्रीत समाजमाध्यमामुळे लहान मुलांवर होणाऱ्या दुष्परिणामांची जगभरात केवळ चर्चा होत होती. फ्रान्ससह अमेरिकेतही काही राज्यामध्ये पालकांच्या परवानगीने समाजमाध्यमांत खाती उघडण्याची मुलांना परवानगी आहे.

- फ्लोरीडामध्ये १४ वर्षाखालील मुलांना संपूर्ण बंदी असणारा कायदा असला तरी त्याला न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे.

- ऑस्ट्रेलियाने गुरुवारी दि २८ नोव्हेंबर २०२४ रोजी केलेला कायदा हा सर्वात कडक असून तो अनेक देशांसाठी मार्गदर्शक ठरु शकतो असे मानले जात आहे.

## अण्वस्त्रवाहू के४ क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी.

भारतीय नौदलाने बुधवार दि २७ नोव्हेंबर २०२४ रोजी अण्वस्त्रवाहू बॅलेस्टिक क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी केली. यामुळे भारताची आण्विक प्रतिकारक्षमता व संरक्षण सिध्दता अधिक वाढली आहे. नौदलाच्या आय.एन.एस अरिघात या अणुऊर्जा संचलित पाणबुडीमधून हे क्षेपणास्त्र सोडण्यात आले. ते ३५०० कि.मी पर्यंतचा पल्ला पार करुन लक्षाचा वेध घेऊ शकते. ही चाचणी व्यापक आण्विक प्रतिकारक्षमता विकसीत करण्याच्या भारताच्या योजनेमधील मैलाचा दगड ठरणार आहे. शत्रूने अण्वस्त्र हल्ला केल्यास थोडासे हल्ल्यास प्रभावी उत्तर देण्यात अ येवू शकते. तसेच सागरी हद्दीच्या पलिकडेही देशांच्या सिमांचे संरक्षण करणे शक्य होणार आहे. घन इंधनावर चालणारे के.४ क्षेपणास्त्र अण्वस्त्रक्षम पाणबुडीवरुन सोडले जाणारे बॅलेस्टीक क्षेपणास्त्र (एस.एल.बी.एम) असून नौदलाला हेच अण्वस्त्रविरोधी प्रभावी अस्त्र उपलब्ध करुन देण्यासाठी याची रचना करण्यात आली आहे. ते ज्या आय.एन.एस अरिघात वरुन सोडण्यात आले ती भारताची दुसरी अणुऊर्जा संचलित बॅलेस्टिक क्षेपणास्त्र पाणबुडी (एसएसबीएन) आहे.

# ज्ञानव्यापी ते अजमेर दर्गा व सुप्रिम कोर्ट

गेल्या काही दिवसात मुस्लीम प्रार्थना स्थळाच्या जागेवर दावा करणाऱ्या याचिकांचे प्रमाण वाढले आहे. रामजन्म भूमी-बाबरी मास्जिद यातील न्यायालयाव्दारे सोडविण्यात आल्यानंतर हे प्रकार थांबण्याऐवजी वाढत आहेत. अजमेर मधील सुफी संत मोइनुदिद्न चिश्ती यांच्या दर्ग्याच्या खाली शिवमंदिर आहे असा दावा करणारी फिर्याद हिंदूसेना नामक संघटनेचे अध्यक्ष विष्णू गुप्ता यांनी पश्चिमी अजमेर दिवानी न्यायालयात सप्टेंबर २०२४ मध्ये दाखल केली होती. तर आता हा दर्गा संकटमोचक महादेव मंदिर घोषीत करावे आणि दर्ग्याची कोणत्याही प्रकारची नोंद असेल तर ती रद्द करावी. त्याचे सर्वेक्षण भारतीय पुरातत्व खात्या मार्फत करावी आणि हिंदूंना पूजा करण्याचा अधिकार देण्यात यावा अशी मागणी अर्जदार विष्णू गुप्ता यांनी केली आहे. ही फिर्याद त्यांनी हरबिलास सारडा यांनी १९११ मध्ये लिहलेल्या 'अजमेर: अ हिस्टॉरिकल & डिस्क्रिप्टीव्ह या एका पुस्तकातील संदर्भाधारे केली होती. या प्रकरणी सुणावणी २० डिसेंबर २०२४ ला होणार आहे. सदर दर्ग्याला दररोज हजारो हिंदू मुस्लिम व इतर धर्मिय भाविक भेट देतात. ख्वाजा मोइनुद्दिन चिश्ती हे सुफी संत आहे. मुघल बादशहा हुमायुने हा दर्गा बांधला होता. अकबर बादशहा दर वर्षी अजमेरची यात्रा करित असे. अकबरसह शहाजहॉन देखिल दर्गा संकुलामध्ये मशिदी बांधल्या होत्या. संभल मधील हिंसाचारानंतर अवघ्या चार दिवसात अजमेर न्यायालयाने नोटीसा बजावल्या आहेत. राजकीय फायदयासाठी आपण या देशास कुठे घेऊन जात आहोत. असा सवाल श्री कपिल सिब्बल यांनी केला आहे. तर अजमेर कुसादरम्यान पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्यासह इतर सर्व पंतप्रधानांनी अजमेरच्या दर्ग्यावर चादर चढविली आहे. एम.आय.एम चे नेते असादुद्दिन ओवेसी यांनी हे कधी थांबणार असा

प्रश्न केला असून यासंबंधी १९९१ च्या कायदा पाहणे आवश्यक आहे. प्रार्थनास्थळ विशेष तरतूदी कायदा १९९१ नुसार कोणत्याही प्रार्थना स्थळाचे धार्मिक स्वरुप हे १५ ऑगस्ट १९४७ या दिवशी जसे होते तसेच रहावे. बाबरी मशीद प्रकरणानंतर इतर मशिदी किंवा धार्मिक स्थळांना लक्ष करण्यास प्रतिबंध करण्यास तत्कालीन पंतप्रधान पी. व्ही. नरसींहराव यांच्या नेतृत्वाखालील सरकारने हा कायदा केला होता. त्या कायद्याचे काय झाले असा प्रश्न विचारला जातोय. सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील खंडपिठाने 2023 मध्ये वाराणसी मधील ज्ञानवापी मशिदीच्या वैज्ञानिक सर्वेक्षणास मंजूरी दिल्यानंतर याप्रकारच्या वादग्रस्त याचिका दाखल करणे कृतीस वेग आला असल्याची टिका केली जाते आहे. याप्रकरणी २० मे २०२२ रोजी सुप्रिम कोर्टाने असे निरीक्षण नोंदीविले होते की प्रार्थनास्थळ विशेष तरतूदी कायदा १९९१ अंतर्गत प्रार्थना स्थळांचे धार्मिक स्वरुप निश्चित करण्यास मनाई / विरोध नाही.

१४ डिसेंबर २०२३ रोजी अलाहाबाद उच्च न्यायालयाने मथुरेतील कृष्णजन्मभूमी मंदिराला लागून असलेल्या शाही ईदगाह मशिद परिसराचे न्यायालयाच्या देखरेखीखाली सर्वेक्षण करण्यास परवानगी दिली मात्र सर्वोच्च न्यायालयाचे सध्याचे सरन्यायाधिश संजिव खन्ना यांच्या नेतृत्वाखालील खंडपिठाने १६ जानेवारी २०२४ रोजी सर्वेक्षणास स्थगिती दिली. मध्यप्रदेशातील धार जिल्ह्यामधील ११ व्या शतकातील भोजशाळेच्या धार्मिक स्वरुपाच्या वादही सर्वोच्च न्यायालयात पोहोचला आहे. या वास्तूच्या सर्वेक्षणाच्या भर्वे स्थगितीस सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे. भारतीय सर्वेक्षण विभागाने २००३ मध्ये केलेल्या तडजोडीनुसार येथे दर मंगळवारी हिंदू पुजा करतात तेथे मुस्लिम नमाज पडतात असे आहे.

मुस्लिम शासकांनी किंवा आक्रमकांनी हिंदू मंदिरांची तोड-फोड करुन त्यावर मशिदी बांधल्याचा किंवा मंदिराचेच मशिदीत रुपांतर केल्याचा आरोप जसे केले जातात त्याच प्रमाणे मध्ययुगात हिंदू राजे सरदारांनी बौद्ध प्रार्थना स्थळांचे हिंदू मंदिरात रुपांतरण केले असेही आरोप होत असतात. इतिहासात किती मागे जायचे हे सामान्यपणे जनतेस पडलेला मोठा प्रश्न आहे. अजमेर वाद निर्माण करण्याचा प्रयत्न हा चिंताजनक वेदनादाई असल्याची प्रतिक्रिया उमटत जाईल. विशेषत: उत्तर भारतातील विविध ठिकाणी मुस्लीम प्रार्थनास्थळे हिंदू मंदिराच्या जागेवर उभी असल्याचे दावे केले जात आहेत. त्यामुळे धार्मिक दुही वाढण्याची भिती व्यक्त केली जात आहे. इतिहासातील घटनावरुन एकमेकांचा व्देश करुन सामाजिक व वैयक्तिक नुकसान करुन घेण्यासाठी आतापर्यंत सुरु असलेले सहअस्तित्व सहजिवन पुढे करुन सुरु करुन ठेवणे शहाणपणाचे आहे असा विवेकी विचार करणे गरजेचे पण त्याची दखल घेतली जाणे हेही महत्वाचे आहे.

## लोकसंख्या लाभांश वटविण्यासाठी तरी...

सरसंघचालक मोहन भागवत यांचे मते देशातील घटत जन्मदर ही चिंतेची बाब आहे. तो विशिष्ठ मर्यादेखाली राहिला तरी संबंधित लोकसमूहच नष्ट होऊ शकतो असा इशारा दिला थात त्यांनी कोठेही हिंदू या शब्दाचा वापर केलेला नाही. त्यांचे हे मत यामुळे संपूर्ण भारतासाठी आहे मत व्यक्त केले जात आहे हा फरक समजणे महत्वाचे आहे कारण गेल्या काही वर्षात हिंदूचे प्रमाण सातत्याने घटत आहे तर मुस्लिमांची संख्या अपाटयाने वाढत आहे. पुढील काही वर्षात हिंदू-पेक्षा मुस्लिमांची संख्या कशी वाढेल याची गणिते बांधली जात आहेत. पण यात तथ्य नसल्याचे प्यु रिसर्च सेंटरने सप्रमाण दाखवून दिले आहे तरीही व्यापक अर्थाने एक जन्मदर आणि त्या अनुषंगाने घटती लोकसंख्या हे आव्हान

ठरु लागले आहे. काही युरोपीय देश, जपान, चीन देशांनी याची गांभिर्याने दखल घेतली आहे. लोकसंख्येचा ऱ्हास होता वक्रआलेख लक्षात घेऊन चीनमध्ये एकच मूल धोरणास रितसर तिलांजली देण्यात आली स्विडनसारख्या स्कॅन्डेनेव्हियन देशात मूल आल्याबद्दल सरकारकडून बक्षीस दिले जाते. पण जपान युरोपिय देश चीन भारत यांच्यातील समस्यांचे स्वरुप भिन्न आहे. प्रगत देशामध्ये स्त्रियांना मू मिळणाऱ्या स्वातंत्र्यामुळे मुल जन्माला घालणे या मतास प्राधान्य देण्यात आले. एकीकडे नोकरी, छंद, व्यावसाय अशा अनेक क्षेत्रामध्ये स्वतःस सिध्द करण्याचे स्वातंत्र्य आणि दुसरीकडे मुल जन्माला घातल्यानंतर येणाऱ्या स्वाभाविक, शारीरिक सामाजिक जबाबदाऱ्यांचे जोखड यांच्यातील व्दंव्दात कित्येक स्त्रिया पहिल्या पर्यायास प्राधान्य देऊ लागल्या.

चीन व भारताच्या बाबतीत परिस्थिती वेगळी आहे. दोन्ही देशांनी स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या काही देशामध्ये दशकांमध्ये लोकसंख्या नियंत्रण धोरणाचा अवलंब केला. गुलामगिरीतून गरिबीचा वारसा मिळालेल्या भारत देशासाठी लोकसंख्या नियंत्रण हा मुद्दा सर्वांगिणपणे आर्थिक व सामाजिक दृष्टीने प्रगतीसाठी कळीचा मुद्दा आहे व होता. त्यामुळे ~~२०~~ १९५० मध्ये भारताचा जननदर प्रत्येक स्त्रीने जन्माला घातलेली सरासरी मुले सरासरी ६.७८ होती तो दर १९८० ला ४.८० वर आला तर लॅन्सेट पत्रानुसार सदर दर सन २०२१ मध्ये १.९० पर्यंत खाली आला तर सध्या तो १.२९ पर्यंत आला असून पुन्हा तो वर जाण्याची शक्यता नाही. लोकसंख्या शास्त्रानुसार २.१ च्या वर जननदर नसेल तर केवळ लोकसंख्येचा ऱ्हास होतो. असे नव्हे तर उत्पादक लोकसंख्येच्या ऱ्हासाची ती नांदी असते. लॅन्सेटच्या मते २०५० मध्ये दर पाच भारतीया-मध्ये एक जेष्ठ नागरीक असेल. या प्रचंड लोकसंख्ये-ची काळजी घेण्यासाठी कुश पुरेशी युवा लोकसंख्या उपलब्ध नसेल असे लॅन्सेट पत्राने नमुद केले आहे.

मध्यतरी चीन आणि नतर भारत ने आर्थिक विकास साधण्यासाठी लोकसंख्या लाभांश या संकल्पनेच्याच आधार घेतला गेला. म्हणजे अधिक लोकसंख्या हा बोजा न ठरता ते समृध्दीचे साधन ठरू शकते कारण त्यातून अधिक उत्पादक हात, अधिक कौशल्य अधिक कार्यशक्ती अधिक मागणी असा हा सरळ हिशोब होता. लोकसंख्या लाभांशाच्या वापर चीनने पुरेपूर करुन घेतला आताकुठे भारत या अवस्थेत पोहोचला आहे पण सर. संघचालक म्हणतात त्याप्रमाणे या समस्येवर सरळ आणि थेट उत्तर सापडत नाही. २.१ जननदर म्हणजेच पुर्णांकाच्या परिभाषेत तीन मुलांना जन्म घालाता असे मत, पण प्रत्यक्षात ते शक्य नाही. भविष्यात कधी तरी सरकारी पातळीवर धोरणात्मक बदल आला तरच हे शक्य आहे शिवाय भारत हा प्रगतशिल समाजाकडे वाटचाल करित असल्यामुळे मुले जन्माला घालण्याच्या निर्णयप्रक्रियेत महिलांच्ये स्थान प्राधान्याचे असेल. सध्या च्या किती महिला याकडे गांभिर्याने पाहतील हे सांगणे अशक्य

१९४७ पर्यंत भारतास विकसीत बनविण्याचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यमान सरकारने या गंभीर समस्येकडे पाहणे हेही आवश्यक ठरले. आता सत्तारुढ पक्षाच्या मातृसंघाने च्या प्रमुखानीच (राष्ट्रीय स्वयंसेवक संघ) या विषयास हात घातला आहे. या भविष्याकडे पाहताना लोकसंख्या लाभाशांचे अधिकाधिक लाभ पदरात पाडून घेण्याची जबाबदारी भारतीय जनता पार्टीनिर्मित सरकारची आहे

# सर्वाधीक यु ट्युब वापर भारतात.

भारतात सर्वात जास्त यु.ट्युबचा वापर केला जातो. जुलै २०२४ मधील आकडेवारी विचारात घेता तब्बल ४७ कोटी ६० लाख भारतीय यु ट्युबचा वापर करत असतात. सदर आकडा अमेरिकेच्या दुपटीपेक्षा जास्त आहे. अमेरिकेत यु.ट्युबचे सुमारे २३ कोटी ८० लाख वापरकर्ते आहेत. भारत हा यु.ट्युबचा सर्वात मोठा ग्राहक आणि उपभोक्ता असून सन २०२८ पर्यंत हा आकडा तब्बल ८३ कोटीपर्यंत वाढेल असा अंदाज वर्तविण्यात आला आहे. यावरुन किती यु.ट्युबर भारतीय किती वेळ खर्च करतील/करत असतील याचा अंदाज आणि विचार केलेलाच बरा. जगातील प्रमुख १० वापरकर्ते खालील प्रमाणे.

१) भारत - ४७ कोटी ६० लाख
२) अमेरीका - २३ कोटी ८० लाख
३) ब्राझील - १४ कोटी ७० लाख
४) इंडोनेशिया - १३ कोटी ९० लाख
५) मेक्सिको - ०८ कोटी ४० लाख
६) जपान - ०७ कोटी ९० लाख
७) पाकिस्तान - ०६ कोटी ६० लाख
८) जर्मनी - ०६ कोटी ६० लाख
९) व्हिएटनाम - ०६ कोटी ३० लाख
१०) फिलीपाईन्स - ०५ कोटी ८० लाख.

# लोकसभेत रेल्वे (सुधारणा) विधेयक सादर.

भारतीय रेल्वेचे खासगीकरण होण्याचा धोका असल्याची भीती विरोधकांनी लोकसभेत सादर केली व रेल्वेमंत्री आश्विनी वैष्णव यांनी लोकसभेत रेल्वे सुधारणा विधेयक सादर केले. यावरील चर्चेदरम्यान विरोधकांनी संभाव्य खासगीकरणाचे तोटे, जेष्ठ नागरीकांच्या सवलती; वंदे भारतचे तिकीटदर आदी मुद्दे उपस्थित केलेले आहेत. तर विधेयकांच्या मंजूरीनंतर रेल्वेची कार्यक्षमता वाढेल समाजवादी पक्षाचे खासदार नीरज मोर्य यांनी सदर विधेयक मांडण्यापूर्वी सर्वपक्षीय समितीकडे विचारविनिमयासाठी पाठवायला हवे होते असे सांगितले रेल्वे हीच कोट्यावधी जनतेची जीवनरेषा आहे. रेल्वेसाठी खासगीकरणाचा मार्ग निवडू नका असेही नीरज मोर्यांनी सुनावले. सदर विधेयक मंजूर झाल्यानंतर सरकार रेल्वेच्या खासगीकरणाचे मार्ग शोधेल असे कॉंग्रेसचे खासदार श्री मनोजकुमार यांनी मत व्यक्त केले. जेष्ठ नागरिकांना दिल्या जाणाऱ्या आणि कोरोना काळात बंद केलेल्या सवलती पुन्हा सुरु कराव्यात अशी मागणी तृणमूल कॉंग्रेसच्या खासदार बाप्पी हल्दर यांनी केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सामान्य श्रेणीच्या डब्यांना दिल्या जाणाऱ्या सेवामध्ये वाढ करण्यावर लक्ष केंद्रीत केलेले आहे असे रेल्वेमंत्री आश्विनी वैष्णव यांनी सांगितले.

वैष्णव यांचे मुद्दे :-

- संयुक्त पुरोगामी आघाडीच्या काळात दरवर्षी १७१ रेल्वे अपघात होत प्रमाण सन २०२३-२४ मध्ये हेच प्रमाण कमी होऊन ४० वर आलेले आहे.
- १० वर्षामध्ये रेल्वेसाठी तरतूदीत वाढ. सन २०१४ मध्ये २९००० कोटी रुपये असलेली तरतूद वाढवून आता २.५२ लाख कोटीवर गेली आहे.
- पूनर्विकास प्रकल्पाअंतर्गत १३०० नविन स्थानकांची पूनर्बांधणी करण्यात आली आहे.

## कायद्याची तरतूद :-

रेल्वे सुधारणा विधेयक २०२४ नुसार भारतीय रेल्वे बोर्ड कायदा १९०५ (लॉर्ड कर्झनच्या कालावधीत) च्या तरतुदी रेल्वे कायदा १९८९ मध्ये समाविष्ट करण्याचा प्रस्ताव आहे. त्यामुळे कायदेशीर चौकट अत्यंत सुलभ होईल आणि दोन कायद्याच्या संदर्भ घेण्याची गरज पूर्णपणे संपुष्टात आणता येईल.

## तिकीटावर हजारो कोटींचे अनुदान :-

भारतीय रेल्वेकडून दरवर्षी सर्व श्रेणीतील प्रवांशांना मिळून एकूण ५६९९३ कोटी रुपयांचे अनुदान दिले जाते अशी माहिती रेल्वेमंत्री आश्विनी वैष्णव यांनी दिली. त्यानुसार सुमारे ४६% सवलत दिले जाते.

# नविन कायदा व बॅंकांची सेवा ग्राहकाभिमुख.

लोकसभेत ३ डिसेंबर २०२४ रोजी आवाजी बहुमताने बॅंकिंग कायदे (सुधारणा) विधेयक २०२४ मंजूर झाले. बॅंक खातेधार गुंतवणूकदारांच्या हितांच्या अनेकांगी तरतूदींचा जरी सरकारचा दावा असला तरी त्यावरही टिका होत आहे. जुलैमध्ये अर्थसंकल्प मांडताना अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी सुतोवाच केलेले आणि त्यानुरुप ९ ऑगस्ट २४ रोजी संसदेत सादर केलेले बॅंकिंग कायदे (सुधारणा) विधेयक २०२४ हे मंगळवारी ३ डिसेंबर २०२४ लोकसभेने आवाजी बहुमताने मंजूर केले. दशकापूर्वी बुडीत कर्जाच्या भारामुळे पुरत्या खोपलेल्या बॅंकांनी अलिकडे चांगली सुदृढता कमावली आहे पण त्याचवेळी घसरत्या ठेवी आणि घटत्या कर्जाच्या समस्येने बॅंकांना घेरले आहे. देशातील घरगुती बचतीसाठी बॅंकठेवींचा वाटा हा दशकभरात ५५% वरुन ४० % वर घसरला आहे. नविन कायदयात बॅंकांना प्रशासनामध्ये व्यावसायिकता, बॅंक खातेदार, ग्राहकांना सुलभता, गुंतवणूकदारांचे हितरक्षण असा सर्वांगिन विचार केला गेला असल्याचे निर्मला सितारमन यांनी सांगितले.

ठेवीदारांना त्यांच्या ठेवीसाठी आणि सेफ्टी लॉकर मध्ये ठेवलेल्या वस्तूसाठी केवळ एका वस्तूचे नामनिर्देशन सध्या करता येते. नव्या कायदयान्वये या सुविधासाठी आता एकाच वेळी चार व्यक्तिंना त्यांची हिस्सेदारी ठरवून अथवा त्यांच्या मालकीचा अनुक्रम ठरवून नामनिर्देशन करण्याचा पर्याय असेल. जेणेकरुन गुंतागुंत कमी होऊन हक्कदार निश्चित केला जाऊ शकेल म्युच्यूअल फंड खात्यांच्या नामनिर्देशनात अशाच बहुविध नामनिर्देशनाची सुविधा उपलब्ध असून ती आता बॅंक खात्यांनाही लागु होईल. खात्यात हस्तांतरीत केल्याच्या तारखेपासून साल वर्षात दावा न केलेल्या लाभांश, समभाग, व्याज-

रक्कम असा कोणताही पैसा हा गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधीमध्ये हस्तांतरीत केला जाईल. अशी कायदयात तरतूद आहे. नविन बँकिंग कायदयात विदयमान पाच कायदयान्वये स्थापित व्यवस्थेत १९ प्रकारच्या सुधारणांचा अंतर्भाव आहे. हे पाच कायदे म्हणजे-

- भारतीय रिझर्व्ह बँक कायदा १९३४.
- बँकिंग नियमन कायदा १९४९
- भारतीय स्टेट बँक कायदा १९५५
- बँकिंग कंपनी (उपक्रम संपादन हस्तांतरण) कायदा १९७०
- बँकिंग कंपनी ( —— " —— —— " —— ) आधी. १९८०

या सुधारणांचे छक्क वैशिष्ठ सांगायचे तर बँकिंग नियमन कायदयातील लक्षणिय हितसंबंध ही संकल्पना पुनर्परिभाषीत केली गेली आहे. यातून बँक संचालका सह कोणाही व्यक्तीचे बँक भागधारणेतील स्वारस्याची कमाल मर्यादा सध्याच्या ५ लाखावरुन २ कोटी रुपये रुपयेपर्यंत वाढली आहे. २ कोटी रु. पेक्षा अधिक भागधारणा ही लक्षणिय हितसंबंध या कक्षेत येईल २०११ मधील ९७ व्या घटनादुरुस्तीशी सुसंगती साधताना सहकारी बँकामधील संचालकांचा कार्यकाल अध्यक्ष व पुर्णवेळ संचालक वगळता आठवर्षाविरुन दहा वर्षापर्यंत लांबविता येणार आहे. मध्यवर्ती सहकारी बँकांच्या संचालकाला राज्य सहकारी बँकेच्या संचालक मंडळावर काम करण्यास परवानगी देणारी आणखी एक दुरुस्ती आहे. वैधानिक लेखापरिक्षकासाठी मोबदला ठरविण्याचे स्वातंत्र्य आता बँकांनाच असेल. गेल्या आर्थिक वर्षात १.४० लाख कोटी रुपये निव्वळ नफा कमावलेल्या या बँकांच्या चालु आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहामाईमधील नफा ८५५२० कोटी रुपयांवर गेला आहे. याचे श्रेय रिझर्व्ह बँक, अर्थ मंत्रालय नियमक देखभाल यांना जाते.

# अन्नधान्याची महागाई कशी रोखणार?

ऑक्टोबर २०२४ मध्ये ग्राहक मुल्य निर्देशांकामध्ये ६.२ टक्के वाढ झाली. रिझर्व्ह बॅंकेच्या उद्दिष्ट निर्देशांकातील वाढ ४%. वर व दिर्घकाळासाठी स्थिर करणे आहे. खरेतर हेच उद्दिष्ट आता ४%. ऐवजी २%. करणे उचित ठरेल. कारण विकसीत देशातील मध्यवर्ती बँकाचे उद्दिष्ट २%. एवढे आहे. आज अमेरिका युरोपियन युनियन अशा प्रदेशात महागाई वाढविण्याचा दर कमी होऊन तेथील मध्यवर्ती बँका व्याजदरात कपात करु लागल्या असताना भारतात त्याच्या विरोधात प्रक्रिया सुरु होणे भारताच्या आर्थिक विकास प्रक्रियेच्या मार्गावरील एक दुचिन्ह ठरणार. निर्देशांक कोणत्या वस्तू किती स्वस्त व महाग झालेल्या आहेत हेही सांगतो. जसे की भाज्याच्या किमतीत ४६%. एवढी विक्रमी वाढ झाली आहे. धान्याच्या किमतीत सुमारे ९%. वाढ झाली आहे. खादयतेल १०%.नी महागले अर्थात ग्राहक मुल्य निर्देशांकात वाढ झाली. कृषी उत्पादने वग-ळता वस्तू व सेवा याच्या किमती स्थिर आहेत तरी काही किमती थोड्या कमी झाल्या आहेत. कोणत्याही वस्तूची किंमती वाढण्याचे कारण उत्पादनात घसरण आणि उत्पादन खर्चात वाढ यापैकीच असू शकते भारतासारख्या ३६५ दिवस लखलख सुर्यप्रकाशाचे नैस-र्गिक वरदान असणाऱ्या देशात कमी कृषी उत्पादने असणे किंवा कृषी क्षेत्राची कमी उपलब्धता असणे हेही आहे. यामुळे भारतात कृषी उत्पादनाचे भाव जास्त आहेत. परि-णामी देशातील गरीब लोकांना अशी उत्पादने घेणे ही परवडत नाही. आणि गरीब लोक कुपोषित राहतात. कृषी उत्पादनाचे वाढणारे भाव हे देशातील बहुसंख्य लोकांसाठी चिंतेचा विषय ठरतात. कारण भारत सरासरी ग्राहक हे त्याच्या एकुण खर्चातील ४६%. खर्च खाद्यान्नावर करित असल्याचे निदर्शनास येते. विकसीत देशात अशा खर्चाचे प्रमाण २०%. किंवा त्यापेक्षा कमी असल्याचे दिसते. विकसीत देशात याचा फार परिणाम होत नाही पण भारतास होतो. भारताचे प्रमुख आर्थिक सल्लागार श्री अनंत नागेश्वरन

रिझर्व्ह बॅंक मौद्रा धोरण समितीने कृषी उत्पादनामुळे वाढलेली महागाई विचारात घेऊ नये असे प्रतिपादन केले. मौद्रा धोरण समितीने केवळ कोअर महागाई दर वाढविण्याचा दर विचारात घेऊन व्याजाचा दर ठरवावा. यातील विचार करता जागतिक पातळीवर काय स्थिती यासंदर्भात आहे व भारतात आर्थिक निर्णय घेताना राज्यकर्ते गोरगरीब लोकांच्या जीवनावर अशा निर्णयाचा परिणाम होणार का.

भारतात कृषी उत्पादनाच्या दर्जा व उत्पादकता यावर अनिष्ट परिणाम सिंचनाची सुविधा उपलब्ध नसल्यानेच दिसते. जगातील लोकसंख्या १८% आणि गोड्या पाण्याचा पुरवठा केवळ ४% आहे. ही भारतातील कृषी क्षेत्राला भेडसावणारी प्रमुख समस्या असल्याचा डांगोरा पिटला जातो. परंतु या विषयासंदर्भात सुरिन्दर सूद यांच्या मते जागतिक पातळीवर पाण्याची समस्या विचारात घेता पाण्याची पातळी १८% नी जास्त आहे. समस्या ही आहे की आपण पावसाचे पाणी अडवत नाही. त्यामुळे पडणाऱ्या पावसाचे पाणी मौल्यवान माती घेऊन समुद्रास मिळते. याचा अनिष्ट परिणाम शेती उत्पादनावर होतो आणि महागाई वाढतेय. पावसाचे पाणी साठविण्याचे काम लोकांनी करायचे आहे अशा कामासाठी सरकार आर्थिक मदत देईल. सरकार धरणे, कालवे, उत्तर सिंचन शेतीसाठी उपलब्ध करेल सन २०१४ साली नरेंद्र मोदी यांनी सत्तेचे लगाम हाती घेतले व अन्न महामंडळाच्या गोदामातील धान्य खुल्या बाजारात विक्रीसाठी उपलब्ध करुन दिले जाईल. त्यामुळे ग्राहक मूल्य निर्देशांकात वाढ होण्याचा दर आधीच्या संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या कार्यकाळात जो १०% आला होता तो ४% वर आणला. आधीच्या सं.पु.आ. सरकारच्या कार्यकाळात शरद पवार यांनी दुष्काळातही अन्नधान्याची मोठी खरेदी करुन अन्न महामंडळाची गोदामे भरली असून ती उघड्या चौथऱ्यावर धान्य साठविले होते. धान्याचा असा साठा आज उपलब्ध नाही. आज सरकारला धान्य उत्पादनात व उत्पादकतेत वाढ करण्यासाठी प्रयत्न करावे लागतील

भारताच्या शेतमालाच्या उत्पादनात पुरेशी वाढ न आल्याने महागाई वाढते. हेच चित्र बदलावे लागेल. शेतमाल किमती वाढविण्यासाठी शरद जोशी सुमारे ४० वर्षांपूर्वी सक्रिय झाले होते. त्यानंतर डॉ. एम. एस. स्वामिनाथन आयोगाने कृषी उत्पादनाचे किमान आधारभाव एकूण उत्पादनखर्चाच्या दिडपट करावे अशी शिफारस सरकारला केली व डॉ. मनमोहन सिंग यांच्या संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारने तात्काळ गहू व तांदूळ या तृणधान्याच्या किमान आधार भावात सुमारे ३३% ची वाढ केल्याने महागाई वाढली. विरोधी पक्षाचे नेते संसदेत सरकारने महागाई नियंत्रीत करावी अशी मागणी करतात आणि संसदेच्या बाहेर पाऊल टाकताच सरकारने स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशीनुसार धान्याचे किमान आधार भाव एकूण उत्पादन खर्चाच्या सी२ च्या दीडपट करावेत अशी मागणी करतात. किमान आधारभावात वाढ आली की स्वाभाविकपणे महागाई वाढणार आहे. या वस्तुस्थितीकडे सर्व विरोधी पक्ष दुर्लक्ष करतात असा गोंधळ जगाच्या पाठीवर फक्त भारतात सुरु असेल. राजकीय पक्षाच्या या धोरणात बदल होण्याची शक्यता नाही.

भारतातील अर्थतज्ञ आणि विचारवंत या गोंधळात भर घालण्याचे काम करीत नाही यासाठी त्यांचे आभार मानायला हवेत. कारण भारतात एम. एस. स्वामिनाथन यांच्यासारख्या कृषी वैज्ञानिक महागाईस वाढविणारी शिफारस करतो त्याच्या या अचाट कामगिरीसाठी मोदी सरकार त्यांना भारतरत्न हा सर्वोच्च नागरी सन्मान दिला

भारतात भाववाढीच्या समस्येने गंभिर रुप धारण केले आहे. देशातील गोरगरीब लोकांना अर्धपोटी ठेवणाऱ्या पाशवी शक्ति विरोधात जनमत संघटीत होईल तो सुदिन आज दृष्टीपथात नाही ही दुर्दैवाची बाब आहे. एवढी एक गोष्ट वगळता बाकी सर्व ठिक आहे असे म्हणावे लागेल.

# स्वागताध्यक्ष शरद पवार.

सरहद संस्था आयोजीत अखील भारतीय साहित्य महामंडळाच्या ९८ व्या अखील भारतीय मराठी साहित्य सम्मेलनाच्या स्वागताध्यक्षपदी जेष्ठ नेते शरद पवार यांची नियुक्ती करण्यात येणार आली. सदर सम्मेलन २१, २२, २३ फेब्रुवारी २०२५ सदर काळात नवीदिल्ली येथे होणार आहे. दिल्ली ही देशाची राजधानी असल्यामुळे येथे होणारे साहित्य सम्मेलन सर्वसमावेशक व्हावे या भावनेतून या संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी अनुभवी, जेष्ठ व साहित्य रसिक व्यक्ती असावी असा संयोजक समितीने प्रयत्न केला. यातून स्वागताध्यक्षपद शरद पवार स्विकारावे अशी या संस्थेने मागणी केली व त्यांनी ती मान्य केली. दिल्लीत महाराष्ट्राची अस्मिता ज्या व्यक्तिभोवती केंद्रीत असते त्यातून सर्वात जेष्ठ नाव शरद पवार यांचे आहे. त्यांच्या अनुभवातून हे संमेलन अविस्मरणीय होईल व राजकारणाच्या पलिकडे जाऊन मराठी भाषा व संस्कृतीचा जागर करणारे ठरेल असा विश्वास सरहद संस्थेचे संजय नहार डॉ. शैलेश पगारीया, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे मिलींद जोशी आणि सुनीता राजे पवार तसेच संयोजन समितीचे डॉ. सतिश देसाई यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला. शरद पवार हे उत्तम वाचक व साहित्यप्रेमी असून महाराष्ट्र सांस्कृतिक व साहित्यीक चळवळीशी सुरुवातीपासुन जोडले गेले आहेत. त्यांनी २००४ औरंगाबाद, २००५ नाशिक, २०१३ चिपळूण, २०१४ सासवड या साहित्य सम्मेलनांचे उद्घाटन केले असून १९९० ला स्वागताध्यक्ष व्हावे असे ठरविले होते पण ते होऊ शकले नाहीत.

यापुर्वी १९५४ सालचे ३७ वे अखील भारतीय मराठी साहित्य सम्मेलन दिल्ली येथे झाले होते. याचे स्वागताध्यक्ष काकासाहेब गाडगीळ सम्मेलनाध्यक्ष होते तर्कतिर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, उद्घाटक- पंडीत नेहरु त्यानंतर ७० वर्षानंतर पुन्हा संमेलन दिल्लीत होत आहे.

# भारतीय नौदलामधील स्त्रीशक्ती.

ब्रिटीश राजवटीत भारतीय संरक्षण क्षेत्रात सैन्यदला-
मध्ये नर्सिंग विभाग सुरु झाला. पहिल्या व दुसऱ्या महा-
युद्धात नर्स म्हणून महिलांनीच काम पाहीले. त्यांची संख्या ३५०
होती. यामध्ये एस. एस कौला, नूर इनायत खान, कल्यानी सेन
यांनी विशेष कामगिरी बजावली. ब्रिटीशां विरोधी नेताजी सुभाष
चंद्र बोस यांच्या नेतृत्वाखालील आझाद हिंद फौजेमध्ये
राणी लक्ष्मीबाई रेजिमेंट ही स्त्रियांची रेजीमेंट | पलटण होती
यामध्ये लक्ष्मी स्वामिनाथन व जानकी देवधर या दोघी
सेनापती होत्या. १९५० च्या संरक्षण कायद्याप्रमाणे भार-
तीय सैन्यात भरती होण्यासाठी महिलांना मज्जाव होता
१ नोव्हेंबर १९५८ पासून सैन्यसंस्था हा भारतीय स्त्रिया-
साठीचा पहिला विभाग सुरु करण्यात आला. पदवीधर
स्त्रीयांना भारतीय स्त्रियांवर अधिकारी होण्यासाठी परवान
गी देण्याचा ऐतिहासिक निर्णय १९९२ साली तर त्याची
अंमलबजावणी १९९३ साली पाच वर्षासाठी करण्यात
आले असून ते कमी कालावधी सर्विसमध्ये करण्यात आले
यामध्ये तीन प्रकारे त्यात लोकसेवा आयोगामार्फत
लोकसेवा आयोगाशिवाय आणि लौकिक पद्धतीने अशा
प्रकारे केली जाते. २००८ साली सैन्यदलातील कायदा व शिक्षा
या विभागासाठी कायम स्वरुपाच्या अधिकारपदावर नियुक्ती
होऊ लागली. ही भरती जज ॲडव्होकेट जनरल आणि
आर्मी एज्युकेशनल कॉप्स या प्रवाहातच सुरु झाली.
एनडीए साठी फक्त मुलांनाच प्रवेश मिळत असे. मुली
येथे पात्र नव्हत्या 2020 याबाबत याचिका दाखल करण्यात
आली होती. सर्वोच्च न्यायालयाने २०२१ या शैक्षणिक
वर्षासाठी मुलींना प्रवेश देण्यास सुरुवात | परवानगी दिली
पहिली तुकडी २०२५ मध्ये प्रशिक्षण पुर्ण करेल. भारतीय
सेनेतील अधिकारी वर्गातील पुरुषांची संख्या १२ लाख

तर स्त्रियांची संख्या फक्त ६५०० इतकी आहे. गेल्या पाच वर्षांपासून स्त्रियांचा सहभाग आता वाढत आहे व आता भारतीय संरक्षण दलात (अहवालानुसार) भूदलात ३.८०% याशिवाय हवाई दलात १३.०९% व नौदलात ६% स्त्रियांचा सहभाग असल्याचे अहवाल सांगतो. सदर विभागात कमांडर ही रँक मिळविणाऱ्या डॉ. बार्बरा घोष या भारतीय नौदलातील पहिल्या महिला अधिकारी आहेत. त्या वैद्यकीय विभागात दाखल झाली होत्या. भारतीय सैन्य दलातील लेफ्टनंट जनरल हे दुसऱ्या क्रमांकाचे पद मिळविणाऱ्या आणि नौदलातील व्हाईस ॲडमिरल हे पद मिळविणाऱ्या पुनिता अरोरा या पहिल्या महिला. त्याअगोदर त्या पुण्यातील सशस्त्र सेना वैद्यकीय महाविद्यालय येथील पहिल्या महिला कमांडंट आणि सैन्यातील सेवेत अतिरिक्त महासंचालक होत्या. गरजेनुसार दल बदलण्याची संधी फक्त सशस्त्र सेना वैद्यकीय महाविद्यालयातच होते. पुनिता अरोरा यांचा लेफ्टनंट जनरल ते व्हाईस ॲडमिरल हा प्रवास थक्क करणारा होता. थ्री स्टार रँक मिळविणाऱ्या भारतीय सेनेतील महिला अधिकाऱ्यांपैकी एक आहेत. लेफ्टनंट कुमुदिनी त्यागी, सबलेफ्टनंट रिती सिंग यांची १७ जणांच्या तुकडीमध्ये नौदलात हवाई ऑब्झर्व्हर या पदी निवड झाली. त्या सर्वांना विंग्ज उपाधी देऊन गौरवण्यात आले. सबलेफ्टनंट शुभांगी स्वरुप या भारतीय नौदलाच्या पहिल्या महिला पायलट डॉरनियर २२८ या खास विमानाने टेहळणी करण्याची महत्त्वाची जबाबदारी यांचेवर होती. व्हाईस ॲडमिरल सर्जन आरती सरीन या तिसऱ्या व व्हाईस ॲडमिरल सर्जन शीला मथाई या थ्री स्टार रँक मिळविणाऱ्या चौथ्या महिला आहेत. लेफ्टनंट नवज्योत कौर यांना पहिल्या महिला शस्त्र रसद पुरवठा अधिकारी म्हणून मध्य हिंदी महासागरावर आय.एन.एस. कार्डीफ येथे तैनात केले. त्याचप्रमाणे लेफ्टनंट करिश्मा शिरवळे पहिल्या महिला

अधिकारी आहेत. त्यांची कॅम्पबेल उपसागरातील आय एन एस बाझ वर रसद पुरवठा अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती मुख्य सैन्यतळापासून दूर असलेल्या अंदमानच्या समुद्रातील दक्षिणेकडील हद्दीचा शेवटचा तळ आहे. कामोरता बेटावर असणाऱ्या अंदमान निकोबार कमांड या संयुक्त सेवांच्या अंतर्गत हे नौदल तळ कार्यरत असते. शत्रूवर टेहळणी करण्यासाठी दक्षिणेकडील याच भागात गोळीबार करण्याच्या नियमित सराव करावा लागतो लेफ्टनंट कमांडर प्रेरणा देवस्थळी या भारतीय नौदलाच्या युद्धनौकेच्या पहिल्या महिला अधिकारी बनल्या राणी पेठ जिल्ह्यातील अरक्कोनम येथील नौदल हवाई स्टेशन राजली येथे ७ जुन २०२४ रोजी पार पडलेल्या परेडमध्ये सबलेफ्टनंट अनामिका बी राजीव या भारतीय नौदला-च्या महिल्या हेलिकॉप्टर पायलट ठरल्या.

नौदलातील सहा महिलांनी नाविका सागर परिक्रमा ही जागतिक महासागर परिक्रमा २०१७-१८ या वर्षात केली. यामध्ये वर्तिका जोशी, स्वाती पाथ्रापल्ली, प्रतिभा जामवाल पायल गुप्ता, ऐश्वर्या बोडापत्ती, विजयादेवी शौरग्राकपम या सहा महिला लेफ्टनंट कमांडर सहभागी आल्या होत्या. या परिक्रमेची तयारी तीन वर्ष सुरु होती. २०१४ साली ५०० महिला अधिकाऱ्यामधून त्यांची निवड केली होती. या तीन अधिकाऱ्यांना खडतर प्रशिक्षण घ्यावे लागले. मूलभूत सैद्धातिक अभ्यासाचे प्रशिक्षण मुंबई व केरळ येथील विविध नौदल प्रशिक्षण केंद्रात देण्यात आले. २०१६ साली म्हादेई नावाच्या तारिणीवर प्रत्यक्ष अनुभवाचे प्रशिक्षण कॅप्टन दिलीप दोंदे यांनी एकट्यानेच अशी परिक्रमा केली होती त्यानंतर कॅप्टन अतुल सिन्हा यांच्या देखरेखीखाली गोवा ते दक्षिण आफ्रिकेतील केपटाऊन अशी २२००० सागरी मैलाची सफर पोरबंदर मुंबई कारवार मॉरिशस मार्गे ४३

दिवसात पुर्ण केली. सहा महिला लेफ्टनंट कमांडरची नाविकसागर ही परिक्रमा १० सप्टेंबर २०१७ रोजी सुरु झाली. २५४ दिवसात २२ हजार ६०० सागरी मैलांचा म्हणजेच ४०,००० कि.मी प्रवास केला. त्याच काळात ही लाशिणी ऑस्ट्रेलिया, न्युझिलंड, फॉकलंड दक्षिण आफ्रिका येथील पोर्टस दोन वेळा विषुववृत्त आणि ॲटलांटीक, पॅसिफिक हिंदी असे महासागर ओलांडून २१ मे २०१८ रोजी गोव्याला परत आली. या संपुर्ण प्रवासात अनेक नैसर्गिक तांत्रिक अडथळ्यांना सामोरे जावे लागले. यात पर्यावरण व हवामान यांच्या संदर्भातील नोंदी घेण्यात आल्या. ही मोहिम परमविशिष्ठसेवापदक व त्रिस्चकप्राप्त व्हाईस ॲडमिरल मनोहर आवटी यांच्या प्रेरणेने पार पडली. या महिला सुधास राष्ट्रपतींच्या हस्ते नारिशक्ती पुरस्काराने गौरवले. नॅशनल जिओग्राफीक व भारतीय नौदल यांच्या माहितीपट पट संयुक्त विद्यमाने बनवला.

दुसरी नाविकासागर परिक्रमा भारतीय नौदलाच्या लाशिणीने २४ नोव्हेंबर २०२४ रोजी ऑस्ट्रेलियाच्या फ्रेमेंटल येथून सुरु झाली. भारतीय नौदलाच्या दोन महिला अधिकाऱ्यासह लेफ्टनंट कमांडर दिलना के व रुपा ए ही परिक्रमा पार पडली आहे. गोवा येथे नौदल ॲडमिरल दिनेश त्रिपाटी यानी २ ऑक्टोबर २०२४ रोजी या परिक्रमेसाठी झेंडा दाखवला. यातील सहभागी महिला अधिकारी केवळ पवन ऊर्जेवर अवलंबून राहून इतर बाह्य सहाय्या शिवाय २१६०० सागरी मैल खडतर प्रवास करतील.

ही महिला मोहिम म्हणजे महिला सबलीकरण, आणि आत्मनिर्भरता या भारताच्या धोरणाचे उत्तम उदाहरण आहे.

# विजयशंकर यांचे निधन

केंद्रीय अन्वेषण विभागाचे (सी.बी.आय) माजी संचालक विजय शंकर यांचे दिर्घ आजारानंतर मंगळवारी ३ डिसेंबर २०२४ रोजी नवी दिल्ली येथे निधन झाले. त्यांना नोयडा येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांच्या अंतिम इच्छेनुसार त्यांचा मृतदेह एम्स रुग्णालयास दिला जाणार आहे. उत्तर प्रदेश केडरचे १९६९ च्या भारतीय पोलीस सेवेतील आधिकारी होते. विजयशंकर हे दि १२ डिसेंबर २००५ ते ३१ जुलै २००८ दरम्यान सीबीआयचे प्रमुख म्हणून काम पाहीले होते. त्यांच्या कार्यकाळात अनेक गुंतागुंतीचे विषय हाताळून केसचा निकाल लावला होता. विजय शंकर यांनी सीबीआय सन्चालक असताना आरुषी-हेमराज दुहेरी हत्याकांड याचा तपास केलेला होता. याशिवाय ते सीबीआयचे अतिरिक्त संचालक असताना त्यांच्याच देखरेखीखाली अबु सालेम आणि मोनिका बेदी यांचे पोर्तुगाल मधून प्रत्यार्पण केले होते. अब्दुल करिम तेलगीचा स्टॅम्प पेपर घोटाळा तपास करीत अटक केली होती. शंकर यांनी बीएसएफ (BSF) सिमा सुरक्षा दलाचे महानिरिक्षक म्हणूनही काम पाहीले होते. सीबीआयचे संचालक होण्यापुर्वी त्यांनी NDRF-नॅशनल डिझॅस्टर रिस्पॉन्स फोर्स तसेच नागरी संरक्षण तसेच होमगार्डचे प्रमुख म्हणूनही काम केले होते. सन १९९० च्या दशकात जेव्हा जम्मू काश्मिर मध्ये दहशतवादी कारवाया शिगेला पोहोचल्या होत्या तेव्हा विजयशंकर यांना तेथे तैनात करण्यात आले होते. परराष्ट्र मंत्रालयात असताना विजयशंकर यांनी मास्को मध्ये काम केले होते. याशिवाय युपी पोलीसात काम केले होते शंकर यांना राष्ट्रपती पदकही मिळाले होते.

# संजय मल्होत्रा RBI गवर्नर.

रिझर्व्ह बँकेच्या गवर्नरपदी महसूल सचिव संजय मल्होत्रा यांची नियुक्ती करुन सरकारने।केंद्राने या कळीच्या जबाबदारीसाठी आणखी एका नोकरशहावर विश्वास टाकला आहे. मावळते गवर्नर शक्तिकांत दास यांची सहा वर्षांची मुदत पुर्ण झाल्यानंतर मल्होत्रांनी पदाची सुत्रे स्विकारली आहेत. गेल्या 33 वर्षे केंद्र व राज्य यांच्या प्रशासनाच्या अनुभवासह गुणवत्ता व विश्वास ही संजय मल्होत्रा यांच्या कार्यकालाची वैशिष्ट्ये दिसतात. मुळ राजस्थानमधील संजय मल्होत्रा यांनी कानपूर आयआयटी मधून संगणक विभागाचे शिक्षण घेतलेय. संगणक अभियांत्रीकीचे शिक्षण घेत पुढे प्रिस्टन विद्यापिठामधून सार्वजनिक धोरणे या विषयात पदव्युत्तर शिक्षण पुर्ण केले. १९९० च्या भारतीय प्रशासकीय सेवेत रुजू होताना युपीएससीचे अव्वल स्थान पटकावले होते. ते राजस्थानात विविध विभागात सेवा बजावल्यानंतर सन 2020 केंद्रसरकार प्रतिनियुक्तीवर आले आणि कर्ज, कर संकलन माहिती तंत्रज्ञान खाण आदी क्षेत्रात काम केले. ग्रामिण विद्युतीकरण कंपनीचे अध्यक्ष, ऊर्जा विभागाचे अतिरिक्त सचिव, वस्तु व सेवा कर परिषदेचे सचिव, यासह महसूल सचिव अशी पदे भुषविली आहेत. अर्थमंत्री निर्मला सितारामन यांच्या अर्थसंकल्पविषयक चमूचे ते सदस्य होते आता त्यांच्याकडे रिझर्व्ह बँकेच्या गवर्नरपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यांना आता अनेक आव्हानांचा सामना करावा लागेल. नुकत्या तिमाहित देशाच्या अर्थव्यवस्थेचा वेग मंदावल्याच्या धर्तीवर केंद्रीय मंत्री व्याजदर घटविण्यावर चर्चा करित असून या त्यांच्या दबावास संजय मल्होत्रा यांना तोंड द्यावे लागेल दुसरीकडे महागाई आटोक्यात येण्याचे नाव घेत नसल्यामुळे व्याजदरास हात लावणे सहजसोपे नाही. त्यामुळे

विकास आणि चलणवाढ यांचे संतुलन नियामकांना साधावे लागेल. सोबत रोख रकमेची चणचण हे बँक क्षेत्रापुढील आव्हानही पेलावे लागेल. संजय मल्होत्रा यांच्या शब्दात स्थैर्य आणि धोरणसातत्य यांचा अवलंब हेच नव्या नियामकांचे सुत्र दिसते.

जन्म - १४ फेब्रुवारी १९६८.

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या २६ वे गवर्नर म्हणून निवड याशिवाय २५ वे गवर्नर होते श्री. शक्तीकांत दास. संजय मल्होत्रा यांचा जन्म बिकानेर राजस्थान येथे झाला. १ डिसेंबर २०२२ ते ११ डिसेंबर २०२४ या काळात भारताचे महसूल सचिव म्हणून कार्यरत होते. तसेच भारताचे वित्तीय सेवा सचिव म्हणून १ फेब्रुवारी २०२२ ३० नोव्हेंबर २०२२ काळात विवेक जोशी यांच्यानंतर कार्यरत होते. संजय मल्होत्रा १० डिसेंबर २०२४ रोजी शक्तिकांत दास यांचा कालावधी संपल्यानंतर कार्यभार स्विकारतील. संजय मल्होत्रा हे सरकारी कंपनी आर. ई. सी. लिमिटेड चे अध्यक्ष व एमडी राहिलेले आहेत ११ डिसेंबर २०२४ रोजी संजय मल्होत्रा कार्यभार स्विकारतील व त्यांचा कार्यकाल तीन वर्षांचा असणार आहे. आत्तापर्यंत आरबीआयचे २६ गवर्नर आलेले असून त्यापैकी १३ गवर्नर भारतीय प्रशासकीय सेवेतील (IA आहेत. सप्टेंबरच्या तिमाहीत भारताचा जी. डी. पी हा ५.४% वर आला असून त्याला सुधारणे हेच मुख्य ध्येय असणार आहे. डॉलरच्या तुलनेत रुपयापण सातत्याने कमजोर होत आहे त्याची सुधारणा करण्याच ध्येयपण असणार आहे कारण यातून मोठी महागाईवाढ होत आहे.

# हरीत पोलाद व्याख्या निश्चित

हरीत पोलादाची व्याख्या केंद्रसरकारने पर्यावरणानुकूल केली. उद्योगांना प्रतिटन तयार उत्पादनाकर कार्बनउत्सर्जन २.२ टन खाली आणण्यासाठी उपाययोजना करण्यास सांगितले. केंद्रीय पोलादमंत्री एच.डी. कुमारस्वामींनी उत्पादन प्रक्रियेदरम्यान उत्सर्जित होणाऱ्या कार्बनडॉयऑक्साईड च्या प्रमाणावर आधारीत उत्पादनाचा स्टार रेटींग होण्यासाठी मानकासह ग्रिनस्टिलवर वर्गिकरण जारी केले. पोलादउद्योग हा भारताच्या औद्योगिक विकासाचा कणा आहे व देश जसजसा पुढे जात आहे तसे बदल घडवून आणणे आवश्यक आहे. पोलाद उद्योगाचा जागतीक कार्बन डॉय ऑक्साईड उत्सर्जन वाटा सुमारे ७% आहे आणि पोलादाच्या सर्वात मोठा उत्पादक देश भारत दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे.

- पोलाद निर्मिती प्रकल्पातून तयार केलेल्या प्रतिटन पोलाद मध्ये २.२ टनापर्यंत कार्बनडॉयऑक्साईड उत्सर्जीत होत असेल तर ते पोलाद हरीत पोलाद म्हणून ओळखले जाते.
- एक टन तयार पोलादाच्या उत्पादनात १.६ टन कार्बन डॉयऑक्साईड किंवा त्यापेक्षा कमी उत्सर्जीत झाल्यास ते फाईव्ह स्टार ग्रिन रेटेड पोलाद मानले जाईल.
- १.६ ते २ टन उत्सर्जनासाठी त्या पोलादास चार स्टार रेटींग दिले जाईल तर २ ते २.२ टन उत्सर्जन पातळी असलेल्या उत्पादनास तीन स्टार रेटींग केली जाईल.
- हरीत पोलाद उत्पादनासाठी भंगारातील लोखंड व अक्षय ऊर्जा यासारख्या पर्यायी कच्च्या मालाचा वापर करणे आवश्यक आहे.

ऑक्टोबरमधील घटक निहाय वाढ ~~कमी~~ झाली :-

खनिजकर्म २०२४ - ०.९% तर २०२३ - १३.१%
वस्तुनिर्मीती —॥— ३.१% —॥— - १०.६%
वीजनिर्मीती —॥— २.० % —॥— २०.४%
यंत्रसामग्री —॥— ३.१ % —॥— २१.७%
ग्राहकोपयोगी नाशवंत वस्तु २०२४ - ५.९% तर २०२३ - १५.९%
बांधकाम उत्पादने २०२४ - ४% तर २०२३ - १२.६%
प्राथमिक वस्तू - २०२४ - २.६ —॥— ११.४%
आतर उत्पादने —॥— ३.७ —॥— ९.५%

# तिरुपती बालाजी लाडू प्रकरणी SIT टीम.

तिरुपती बालाजी लाडू प्रकरणामध्ये सर्वोच्च न्यायालयाने ऑक्टोबर २०२४ मध्ये सीबीआयच्या देखरेखीखाली विशेष तपास पथकाद्वारे एसआयटी चौकशी करण्याचे आदेश दिले होते. आंध्रप्रदेशाच्या मुख्यमंत्री एन चंद्राबाबू नायडू यांनी तिरुपती बालाजी लाडू बाबतचा प्रयोगशाळेचा अहवाल सार्वजनिक केल्यावर या वादास सुरुवात झाली. आधीच्या सरकारच्या या काळात लाडू बनविण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या तूप नमुन्यात गोमास चरबी आणि माशाच्या तेलांसह विदेशी फॅटस् वापरल्याचे आरोप या अहवालाच्या आधारे घेऊन करण्यात आले होते. हेच दाखविण्यासाठी सध्या काहीही तथ्ये नाहीत असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले. आणि नायडूंनी देवांना राजकारणापासून दूर ठेवायला हवे होते असे भाष्य केले आहे.

तिरुमला व्यंकटेश्वर (तिरुपती बालाजी) मंदिर हे आंध्रप्रदेशातील तिरुमला येथे तिरुमला टेकड्यातील सात टेकड्यापैकी एक असणाऱ्या (सप्तगिरी) वेंकट टेकडी वर वसलेले आहे. हा भगवान विष्णूच्या अवतार भगवान व्यंकटेश्वरास समर्पित आहे. पल्लव, चोल, विजयनगरच्या शासकासह विविध दाक्षिण भारतीय राजवंशाच्या महत्वपूर्ण योगदानासह मंदिरास समृद्ध इतिहास आहे येथे पारंपारिक दाक्षिणा भारतीय वास्तुकला दिसते यात एक उंच गोपूरम गेट असते गुंतागुंतीचे कोरीवकाम असून देवास केस दान करणे प्रथा आहे. ३०० वर्षांपेक्षा जास्त काळापासून तिरुपतीस लाडवाचा प्रसाद चढविला जातो. बेसन, साखर काजू, तूप वेलची मनुका वापरुन ते पोटस स्वयंपाक घरात बनवितात यासाठी दररोज १० टन गायीचे तूप वापरुन सुमारे तीन लाख लाडूंचे प्रसाद म्हणून वाटप केले जाते. तिरुपती लाडूला सन २००९ ला जी आय टॅग मिळाला होता. आंध्र सरकार तिरुपती मंदिर चालविणाऱ्या तिरुमला तिरुपती देवस्थानम चे प्रमुख नियंत्रीत व नियुक्त करत असते.

# जागतिक भूक निर्देशांक २०२४.

ऑक्टोबर २०२४ मध्ये प्रसिद्ध आलेल्या जागतिक भूक निर्देशांक २०२४ मध्ये भारताचा विचार करता १२७ देशांच्या यादीत १०५ व्या क्रमांकावर आहे.

ग्लोबल हंगर इंडेक्स २०२४ नुसार भारत २७.३ गुणासह गंभीर श्रेणीमध्ये येतो आहे.

सन २०२३ मध्ये भारत २८.७ गुणासह १२५ देशामध्ये १११ व्या क्रमांकावर आहे. म्हणजेच २०२३ च्या तुलनेत सन २०२४ मध्ये भारताच्या स्थितीमध्ये थोडी सुधारणा आली आहे असे दिसते.

- ग्लोबल हंगर इंडेक्स २०२४ नुसार जागतिक सरासरी गुण १८.३ आहेत.

भारताची विविध निर्देशांकानुसार स्थिती:-

- अतपोषण प्रमाण - १३.७%
- बाल खुरटेपणा प्रमाण - ३५.५%
- बाल कृषता प्रमाण - १८.७% जागतीक स्तरावर सर्वाधिक
- बालमृत्यूचे प्रमाण - २.९%

भारताचे शेजारी स्थान:-

चीन - 22, श्रीलंका - ५६ नेपाळ - ६८, म्यानमार - ७४ बांग्लादेश - ८४ पाकिस्तान १०९ अफगाणिस्तान ११६ व्या क्रमांकावर आहेत.

तळातील देश:-

सोमालीया - १२७ येमेन - १२६ चाड - १२५ मादागास्कर - १२४, डेमॉक्रॉटीक रिपब्लीक ऑफ कांगो १२३ व्या क्रमांकावर आहेत.

भारत पोषण ट्रॅकरनुसार बाल कृषता प्रमाण कमी म्हणजे केवळ ७.२% आहे. चारपैकी तीन जीएचआय निर्देशांक हे बालकांच्या आरोग्याशी संबंधीत आहेत.

ग्लोबल हंगर इंडेक्स ~~अनुसार~~ २००६ पासून ऑक्टोबर महिन्यात प्रकाशित केला जातो.

कन्सर्न वर्ल्डवाईड आणि वेल्थ हंगर लाईफ या संस्था संयुक्तपणे हा निर्देशांक प्रकाशित केला जातो. कारण जागतिक, प्रादेशिक, आणि देशपातळीवरील भूक सर्व-समावेशकपणे मोजणे आणि त्याचा मागोवा घेणे.

गणना चार निर्देशांकाच्या आधारे करण्यात येते ते-

1) अवपोषण :- अपर्याप्त उष्मांक प्राप्त लोकसंख्येचा वाटा

2) बाल कृषता :- ज्याचे वजन त्याच्या उंचीनुसार कमी आहे. अशा 5 वर्षाखालील बालकांचे प्रमाण. हे तिव्र अपोषण दारववते.

3) बाल खुरटेपणा :- ज्यांची उंची त्याच्या वयानुसार कमी आहे. अशा पाच वर्षाखालील बालकांचे प्रमाण. हे दीर्घकालीन अवषोषण दर्शविते.

4) बालमृत्यू :- पाच वर्षाखालील बालकाचा मृत्यू दर.

स्कोअरिंग :- चार निर्देशांकाच्या मूल्यावर आधारीत जीएचआय 100 पाईंट स्केलवर भूक निर्धारीत करते येथे 0 हा सर्वोत्तम संभाव्य स्कोअर आहे भूक नाही आणि 100 सर्वात मोठा वाईट आहे. प्रत्येक देशाचा जीएचआय स्कोअर कमी ते अत्यंत चिंताजनक अशा तिव्रतेनुसार वर्गिकृत केला जातो.

माहिती संकलन :- अन्न आणि कृषी संस्थेव्दारे कुपोषण डेटा प्रदान केला जातो. आणि बालमृत्यूचा डेटा युएन-इंटर एजन्सी ग्रुप फॉर चाईल्ड मॉटलिटी एस्टिमेशन कडून प्राप्त केला जातो.

युनिसेफ, वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन व जागतीक बॅंक याच्या संयुक्त डेटाबेस पासून बालकांची कृषता आणि खुरटेपणा संबंधी डेटा प्राप्त केला जातो.

# भारतीय राज्यातील सापेक्ष आर्थिक कामगिरी.

पंतप्रधान आर्थिक सल्लागार परिषदेने सप्टेंबर २०२४ मध्ये भारतीय राज्यांची सापेक्ष आर्थिक कामगिरी १९६० ६१ ते २०२३-२४ या शिर्षकाचा अहवाल प्रसिद्ध केला आहे.

- दाक्षिणेकडील राज्यांचा वाटा मार्च २०२४ पर्यंत ३०% इतका असून यात कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगणा, केरळ, तामिळनाडू राज्यांचा समावेश होतो. उदारीकरणानंतर तंत्रज्ञान आणि उद्योग यासारख्या क्षेत्रात लक्षणीय प्रगती सह दाक्षिणेकडील राज्यांच्या वाढीस वेग आला. पश्चिम बंगालचे जीडीपी मधील सन १९६०-६१ मधील १०.५% वरुन सन २०२४ मध्ये ५.६% पर्यंत कमी आले आहे. पश्चिम बंगालच्या दरडोई उत्पन्न १९६०-च्या राष्ट्रीय सरासरीच्या १२७.५ वरुन ८३.७% पर्यंत घसरत राजस्थान, ओडिशा राज्यांच्याही मागे गेले आहे.

महाराष्ट्र जीडीपी वाटा १५% वरुन १३.३% वर उतरला. गत ६० वर्षातील महाराष्ट्राच्या जीडीपीतील वाटा पाहता -

| | | | |
|---|---|---|---|
| १९६०-६१ | १२.५% | २०००-०१ | १४% |
| १९७०-७१ | ११.५% | २०१०-११ | १५.२% |
| १९८०-८१ | १४.२% | २०२०-२१ | १३.०% |
| १९९०-९१ | १४.६% | २०२३-२४ | १३.३% |

सन २०२३-२४ मध्ये सर्वाधिक ~~दरडोई उत्पन्न~~ GDP असणारी राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश (जीडीपी वाटा)

१) महाराष्ट्र - १३.३% ४) कर्नाटक - ८.२%

२) तामिळनाडू - ८.९% ५) गुजरात - ८.१%

३) उत्तरप्रदेश - ८.४% जीडीपी असणारी राज्ये.

सन २०२३-२४ मध्ये सर्वाधिक दरडोई उत्पन्न असणारी राज्ये वा केंद्रशासित प्रदेश (राष्ट्रीय सरासरी %)

१) सिक्कीम - ३१९.१% ४) तेलंगणा - १९३.६%

२) गोवा - २९०.७% ५) कर्नाटक -

३) दिल्ली - २५०.८% ६) गुजरात - १६०.७%

महाराष्ट्राची राष्ट्रीय सरासरी आहे १५०.७%.

सर्वात कमी राष्ट्रीय सरासरी - बिहार (३२.८०%) झारखंड (५७.२०%) उत्तरप्रदेश (५८.८०%) मनिपूर ६६% आसाम (७३.७०%)

# डॉ सुधीर रसाळना साहित्य अकादमी पुरस्कार.

जेष्ठ साहित्यिक सुधीर रसाळ तसेच हिंदी कवी गगन गिल, इंग्रजी साहित्यीक इस्टीरीन किरे यांच्या सह २१ जणांना साहित्य अकादमी पुरस्कार बुधवार दि १८ डिसेंबर २०२४, रोजी जाहीर करण्यात आला. अकादमीच्या निवड समिती सदस्यानी २१ भाषामध्ये हे सन्मान जाहिर केले. यंदा जेष्ठ जेष्ठ समिक्षक डॉ सुधीर रसाळ याना त्यांच्या विदांचे गद्य रुप या समिक्षा ग्रंथास साहित्य अकादमी पुरस्कार जाहिर झाला. रसाळ हे स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्य विश्वातील एक व्यासंगी व परखड समिक्षक म्हणून ओळखले जातात. राजहंस प्रकाशन' सलग तिसऱ्या वर्षी पुरस्काराचे मानकरी ठरले. दोन वर्षापूर्वी पवन नालट यांच्या मी संदर्भ पोखरतोय या कवितासंग्रहाला तर गेल्या वर्षी अभय सदावर्ते यांनी अनुवादीत केलेल्या 'ब्राह्मोज' या पुस्तकाला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला होता. विविध वाङ्मयीन विषयावरील मुलगामी आणि मुल्यवेधी अशी निर्मिक, निकोप, पारदर्शक व वस्तुनिष्ठ दृष्टी लाभलेल्या रसाळांना हा पुरस्कार मिळाल्याने साहित्य क्षेत्रात आनंद व्यक्त केला जात आहे.

तीन कवितासंग्रह तीन कादंबरी दोन लघुकथा तीन निबंध तीघांना साहित्य समिक्षेसाठी तर प्रत्येकी एकाला नाटक आणि संशोधनातील योगदानाबाबत पुरस्कार जाहिर झाला. के. जयकुमार (मल्याळम) हायोबस सत्यवती देवी (मनिपुरी) दिलीप झवेरी (गुजराती) समिर तँती (आसामी) मुकूट मनिराज (राजस्थानी) दिपककुमार शर्मा (संस्कृत) यांचा समावेश आहे. माधव कौशिक यांच्या अध्यक्षतेखाली साहित्य अकादमीच्या कार्यकारी मंडळाने नावांना मान्यता दिली. शाल मानाचिन्ह आणि १ लाख रुपये असे सदर पुरस्काराचे स्वरुप आहे. ८ मार्च २०२५ रोजी यांचे वितरण केले जाणार आहे.

मराठीसाठीच्या निवड समितीमध्ये जेष्ठ साहित्यीक वसंत आबाजी डहाके, हरिश्चंद्र थोरात, विद्या देवधर या लेखकांचा समावेश होता.

यंदाचे पुरस्कार विजेते :- २०२४.

काव्यसंग्रह :-

आसामी - समिर तांती

पंजाबी - पॉल कौर

गुजराती - दिलिप झव्हेरी

राजस्थानी - मुकुट मनिराज

हिंदी - गगन गिल.

मल्याळम - के. जयकुमार

संस्कृत - दिपककुमार शर्मा.

मनिपुरी - होबम सत्यवती देवी.

कादंबरी प्रकारातील विजेते :-

बोडो - अरन राजा

काश्मिरी - सोहन कौल.

इंग्रजी - इस्टरीन किरे

कथासंग्रह प्रकारातील विजेते :-

नेपाळी - युवा बराल

मैथिली - महेंद्र मलंगिया

सिंधी - हुंदराज बलवानी

ओडिया - वैष्णव चरण सामल.

साहित्य समिक्षा प्रकार :-

कन्नड - के. व्ही. नारायण

तेलगू - पेनुगोंडा लक्ष्मीनारायण.

मराठी - सुधीर रसाळ

नाटक प्रकार -

महेश्वर सोरेन (संथाळी)

संशोधन साहित्य - ए. आर. व्यंकटचलपथी (तामिळ)

सुधीर रसाळ यांची साहित्यसंपदा :-

- कविता आणि प्रतिमा कविता निरुपणे.
- काही मराठी कवी जाणिवा आणि शैली. १९५४
- ना. घ. देशपांडे यांचे कविता.
- मर्ढेकरांची कविता : आकलन आणि विश्लेषण
- मर्ढेकरांची कविता : जाणिवांचे अंत:स्वरुप

- मर्ढेकरांचे कथात्म आणि नाट्यात्म वाङ्मय
- लोभस: एक गाव.
- माणसं (व्यक्तिचित्रे)
- वाङ्मयीन संस्कृती.
- समिक्षक भालचंद्र नेमाडे.
- साहित्य अध्यापन.

१९८७ • प्रकार: सहसंपादक (प्रा. वा. ल. कुळकर्णी गौरवग्रंथ)

## पुरस्कार आणि सन्मान

- अशोक किर्तिकर पुरस्कार.
- महाराष्ट्र शासन आदर्श शिक्षक पुरस्कार.
- महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ जीवनगौरव.
- चारठाणकर प्रतिष्ठाणचा पुरस्कार.
- मराठवाडा साहित्य परिषद पहिला जीवनगौरव पुर.
- प्रा. रा. श्री. जोग पुरस्कार. • पद्मजा बर्वे पुर.
- सह्याद्री साहित्य सन्मान २०१४.
- साहित्य समिक्षा पुरस्कार.
- अशोक केळकर मराठी भाषा अभ्यासक पुर. २०२१
- मराठी भाषा अभ्यासक सन्मान.

जन्मठिकाण :- वैजापूर छत्रपती संभाजीनगर.

जन्मतारिख :-

# आर आश्विनची तडकाफडकी निवृत्ती.

भारताच्या ऑफस्पिनर रविचंद्रन आश्विन याने ऑस्ट्रेलियाच्या सामना अनिर्णीत राहिल्यानंतर अचानक आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली. प्रतिष्ठेच्या बॉर्डर-गावस्कर करंडकासाठी सुरू असलेल्या या मालिकेत दोन सामने शिल्लक असताना ३८ वर्षीय आश्विनने ही तडकाफडकी निवृत्ती जाहीर केल्यानंतर आश्चर्य वाटले. कसोटी क्रिकेटमध्ये तो भारताचा दुसरा सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. आर. आश्विनने १०६ कसोटी सामन्यामध्ये ५३७ गडी बाद केले. भारताकडून सर्वाधिक ६१९ बळी घेणाऱ्या अनिल कुंबळे याच्या नावावर आहे.

सन २०११ च्या मर्यादीत षटकाच्या एकदिवसीय क्रिकेटमध्ये विजेतेपद मिळविलेल्या आणि सन २०१३ चॅम्पियन्स करंडक अशा दोन्ही स्पर्धातील विजेत्या संघाचा आर. आश्विन भाग होता. परंतु तो आय पी एल संघातून चेन्नई सुपर किंग्ज संघाकडून खेळणार असल्याचे सांगितले. तसेच रणजी करंडक स्पर्धेत चेन्नईचे प्रतिनिधीत्व करणार असल्याचे सांगितले. रविचंद्रन आश्विनने सन २०१० मध्ये एकदिवसीय आणि टेवन्टी-२० आणि सन २०११ मध्ये कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते.

नाव :- रविचंद्रन आश्विनी

जन्म :- १७ सप्टेंबर १९८६ चेन्नई तामिळनाडू येथे.

पध्दती - उजव्या हाताने ऑफ ब्रेक. जर्सी क्र. ९९.

डिसेंबर २००६ - तामिळनाडूकडून प्रथम वर्ग क्रिकेटकडून पदार्पण

वनडे पदार्पण - ५ जून २०१० श्रीलंका विरोधात

—॥— अंतीम सामने - ८ ऑक्टोबर २०२३ - ऑस्ट्रेलिया

टेस्ट पदार्पण - ६ नोव्हेंबर २०११ वेस्ट इंडिज विरोधात

—॥— अंतीम सामने - ६ डिसेंबर २०२४ ऑस्ट्रेलिया

टी २० पदार्पण :- १२ जून २०१० - झिम्बाबे विरोधात

—॥— सामना अंतिम - १० नोव्हेंबर २०२२ - इंग्लड विरोधी

# रामशिंदे विधानपरिषद सभापती पदी.

निलम गोरे यांनी विधानपरिषद अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यानंतर गेल्या अडिच वर्षापासून रिक्त असणारे या पदावर भारतीय जनता पक्षाच्या राम शिंदे यांची बिन-विरोधी निवड करण्यात आली होती या पदावर शिवसेना एकनाथ शिंदे गट यांनी आपली उमेदवारी सांगितलेली होती. परंतु भाजपने शिवसेना शिंदे गटास सभापती पद देणे नकार दिल्याने बिनविरोधी कर्जत-जामखेड विधानसभा मतदार संघातील रोहीत पवार यांच्या विरोधातील पराभूत उमेदवार राम शिंदे यांची निवड करण्यात आली राम शिंदे हे धनगर समाजाचे नेते असून याअगोदर ते कर्जत-जामखेड मतदार संघातूनच विधानसभेवर आमदार म्हणून निवडून आले होते सन २०१९ मध्ये त्याचा पराभव रोहित पवार यांनी केला होता याशिवाय सन २०२४ मध्ये त्याचा पवार यांच्याकडूनच निसटता पराभव झाला आहे.

डिसेंबर २०१४- मध्ये त्यांनी गृह सार्वजनिक आरोग्य, कृषी आदी खात्याचे राज्यमंत्रीपद भुषविले होते.

जुलै २०१९- जलसंधारण मंत्रालय सोपविण्यात येऊन कॅबिनेट मंत्रीपदाचा कार्यभार सोपविला होता.

शिवसेना ठाकरे गटातून शिवसेना एकनाथ शिंदे गटात प्रवेश केलेल्या व विधानपरिषदेच्या सभापतीपदाची जबाबदारी सांभाळणाऱ्या तत्कालीन निलम गोरेंची उपसभापती पदी निवड करण्यात आलेली आहे. त्यांची विधानपरिषद सभापती पदी वर्णी लागेल अशी चर्चा असताना ठाकरे शिवसेना गटाने आक्षेप घेतल्या नंतर राम शिंदे यांच्या नावावर हायकमांडने शिक्का मोर्तब केले. त्याच्याबरोबरच प्रविण दरेकर यांचीही विधानपरिषद सभापतीपदी वर्णी लागेल अशी चर्चा होती पण राम शिंदे यांनी बाजी मारली.

नाव :- प्रा. राम शंकर शिंदे.

२००९ - अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत जामखेड मतदारसंघातून निवडून विधानसभेवर निवडून आले

२०१४ - सलग दुसऱ्यांदा विधानसभेवर आमदार म्हणून निवड करण्यात आली.

७ जुलै २०२२ - पासून विधानपरिषद सभापती पद निलम गोरे यांनी राजीनामा दिल्यानंतर रिक्त.

- राम शंकर शिंदे हे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या माहेरकडील कुटुंबातील नववे मातलग आहेत.

- माजी मंत्री प्रा. राम शंकर शिंदे यांचा जन्म १ जानेवारी १९६९ रोजी चौंडी येथील गरिब शेतकरी कुटुंबात झाला वडील शंकरराव हे शेतमजूर म्हणून दुसऱ्याच्या शेतात सालगडी म्हणून काम करण्यातच त्यांचे अर्धे आयुष्य केले.

- सन १९९५ मध्ये महाराष्ट्रात शिवसेना भारतीय जनता पक्षाचे युती सरकार सत्येवर आल्यानंतर राम शिंदे यांच्या जिवनास खरा आकार मिळाला.

- ३१ ऑगस्ट १९९५ रोजी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुण्यतिथी निमित्त तात्कालीन मुख्यमंत्री श्री मनोहर जोशी (शिवसेना) तसेच गोपिनाथ मुंडे आणि ग्रामविकास मंत्री अण्णा डांगे यांनी चौंडी या गावी विकास प्रकल्पाची जबाबदारी राम शिंदेवर सोपविली होती. पुढे १९९७ मध्ये त्यांनी राजकारणात प्रवेश केला.

२००० - चौंडी गावचे सरपंच

२००६ - भाजपा जामखेड तालुका प्रमुखपदी नियुक्त.

२००७ - पत्नी पंचायत समिती सदस्य (आशाताई)

२००९ - महाराष्ट्र प्रदेश भाजपा सरचिटणीस व आमदार

# जातनिहाय महाराष्ट्र विधानसभा २०२४.

विधानसभा निवडणूक २०२४ मध्ये महाराष्ट्र राज्याचा इतर मागास वर्ग आमदारांचा टक्का वाढलेला दिसतो. १४व्या विधानसभा कुणबी समाज वगळून ओबीसी चे ४० आमदार होते आता हीच संख्या ५८ आमदार वर पोहोचली आहे. या काळात मराठा आमदारांची संख्या तुलनेने घटली आहे. ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मागणीसाठी मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांचे राज्यात वर्षभर आंदोलन चालू होते. या पार्श्वभूमी वर नोव्हेंबरमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत मराठा आमदारांची संख्या घटली असून ओबीसी आमदारांची संख्या वाढली आहे. मागच्या विधानसभेत ११८ सर्वपक्षीय आमदार होते ही संख्या आता १०७ इतकी झाली आहे. सन २०१९च्या निवडणुकीत OBC इतर मागासवर्गीय ४० आमदार निवडून आले होते. ही संख्या आता 2024 ला ५८ आमदार इतकी झाली आहे. आश्चर्य म्हणजे एकट्या भारतीय जनता पक्षाचे ४३ ओबीसी आमदार आहेत त्यात विदर्भ, खानदेशचा वाटा मोठा असून मागच्या विधानसभेत भारतीय जनता पक्षाचे २४ आमदार होते. सध्या ओबीसी प्रवर्गाच्या राज्य यादीत ४०९ जाती आहेत. यावेळी जे ओबीसी आमदार निवडून आले आहेत त्यामध्ये कुणबी, तेली, कुणबी-मराठा, आगरी, धनगर, वंजारी, बंजारा माळी या जातीचे वर्चस्व दिसते. त्याचबरोबर पाचकळशी, वैश्यवाणी लेवापाटील, गुज्जर, पोवार बारी, गांधली, साळी या जाती मधूनही काही आमदार आले आहेत. १९६२ मध्ये केवळ २२ इतर मागासवर्गीय आमदार होते ही संख्या आता ५८ इतकी झाली आहे. भाजपने २५ वर्षापूर्वी आणलेल्या माधवं सूत्राचा आता विस्तार पावल्याचे याच निवडणुकीच्या माध्यमातून स्पष्ट झाले आहे.

उन्नत आणि प्रगत गटाची मर्यादा १५ लाख रुपये करण्याबाबत महायुतीने घेतलेल्या निर्णयामुळे OBC गटातील मध्यमवर्ग खुश झाला. राज्यातील सुमारे १९ जातींचा केंद्राच्या ओबीसी यादीत समावेश केला.

नव्या विधानसभेचे स्वरुप :-

मराठा आमदार १०४ इतर मागासवर्गीय आमदार ५८ मुस्लीम आमदार १०, मारवाडी आमदार ०९, ब्राम्हण आमदार ०६, गुजराती आमदार ०४, लिंगायत आमदार ०४, सीकेपी आमदार ०३, जैन आमदार ०३ जीएसबी आमदार ०२, कोमटी आमदार ०२ सिंधी आमदार ०१ असे जातनिहाय प्रतिनिधित्व आहे.

याशिवाय १ चर्मकार आमदार, आणि २ आदिवासी असे तिघेजण राखीव नसलेल्या जागावर निवडून आले आहेत.

- अनुसुचित जातीसाठी राखीव असणाऱ्या मतदारसंघाची संख्या सुमारे २९ इतकी असून अनुसुचीत जमातीसाठी राखीव असणारे विधानसभेतील मतदार संघ सुमारे २५ इतके आहेत.

पक्षनिहाय ओबीसी आमदार संख्या :-

- भारतीय जनता पक्ष - ३३ आमदार
- शिवसेना एकनाथ शिंदे गट - १३ आमदार
- राष्ट्रवादी अजित पवार गट - ०९ —॥—
- शिवसेना उद्धव ठाकरे गट - ०३ —॥—
- राष्ट्रवादी शरद पवार गट - ०३ —॥—
- भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस - ०४ —॥—
- इतर पक्ष व अपक्ष गट - ०२ —॥—

असे विधानसभेमध्ये एकुण ५८ इतर मागास वर्गीय आमदार सध्या निवडून आले आहेत.

# शेअरबाजार: रुपया का घसरलाय?

अमेरीकेची मध्यवर्ती बॅंक असलेल्या फेडरल रिझर्व्हने २०२४ मधील अंतीम बैठकीत आणखी पाव टक्का आणि तिनदा मिळून एकत्रीत पुर्ण एक टक्क्याची व्याजदर कपात केली. हे सारे अपेक्षीत असले तरी जगभरात याची प्रतिक्रिया मात्र विपरीत आहे. दरकपातीनंतर अमेरिकेतील व्याजदर आत्ता ४.२५% वरुन ४.५०% वर आले आहेत. सन २०२४ मधील ही फेडरलची व्याजदरासंबंधीची आठवी व अंतीम बैठक होती. यासाठी पुर्ण १% ची कपात साधली गेली अशी माहिती फेडचे अध्यक्ष जेरॉम पॉवेल यांच्या समालोचनाने सुचित केले. फेडरल रिझर्व्हचे अध्यक्ष जेरॉम पॉवेल अमेरिकी अर्थव्यवस्थेच्या मजबूतीबाबत आश्वासक आहेत. नोकऱ्यांची स्थिती सुधारत असून बेरोजगारीचे प्रमाण आगामी दोन वर्षात ४.२% आणि ४.३% अशा माफक मात्रेत राहण्याची शक्यता त्यांनी वर्तविली. अमेरीकेतील चलनवाढीची स्थिती अलिकडे सुधारलेली असली तरी तिला निर्धारीत २% या लक्ष पातळीवर आणणे पुढील दोन वर्षे तरी शक्य दिसत नाही. चलनवाढीच्या या स्थितीमुळे सन २०२५ मध्ये आधी घोषीत ४ ऐवजी २ टक्क्यांच्या कपातीचे त्यांनी भाकीत केले. सन २०२५ मध्ये १% तर २०२६ मध्ये पुर्ण १% ची कपातीसह अमेरिकेतील व्याजाचे दर २.७५% ते ३% पातळीवर आणण्याचे दूरगामी संकेत फेडने दिले होते. यातून जगभरातील धास्तावलेल्या गुंतवणूकदारांची चिंता वाढली आहे.

डोनाल्ड ट्रम्प व्याजदर किमान पातळीवर राखले जावेत आणि चलनवाढ, रोजगार स्थिती, अर्थव्यवस्था आपोआपच ताळ्यावर येईल अशा विचारांचे आहेत. प्रशासन व मध्यवर्ती बॅंक या दोन धोरण ध्रुवामध्ये सहअस्तित्व सामंजस्य पुढे जाऊन बखेडा निर्माण होऊ नये अशीच अपेक्षा आहे. मात्र तसेच घडेल भितीपोटीच पॉवेल यांनी जाणीवपूर्वक दोन कपातीवर आवरते घे सूचित केले असण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

फेडचा ताजा निर्णय आणि सावध भविष्यवेध हे अर्थव्यवस्थेचा विकास आणि चलनवाट नियंत्रण या दोन आघाड्यावर सारखाच समतोल राखण्यावर भर राहिल असे सुचवितो. जगभरातील मध्यवर्ती बँकाचा रोख याच दिशेने आहे. तुर्त तरी गुंतवणूकदार यातून निराश झालेले दिसतात. पश्चिम आशियायी देशात तसेच अधूनमधून भडकणारी युद्धे आणि त्यातून विशेषत: खनिज तेलांचे किमतीवर पडणारा प्रभाव हादेखिल कळीचा मुद्दा आहे. त्या अंगाने विपरीत काही घडले तर डॉलरच्या संभाव्य कमजोरीच्या परिणामाने मिळू शकणारे लाभही धुवून काढले जातील. अमेरिकेतील व्याजदर कपातीने मुख्यत: मजबूत बनलेला डॉलर तसेच जगभरातील दांडगाईस आपसूकच लगाम बसण्याची अपेक्षा आहे. याचा परिणाम भारतासारख्या उभारत्या बाजारपेठाकडे अधिक परताव्याच्या अपेक्षेने विदेशी गुंतवणूकदार संस्थांचे पाय पुन्हा वळू लागतील. हे या बाजारास हुरूप देणारे ठरेल डॉलर कमजोर झाला तरच या शक्यतेस वाव आहे. तुर्त तरी जगभरात सर्वच वातावरणात नकारात्मक वातावरण आहे. भारतीय बाजारात गुरुवारी सेन्सेक्स निफ्टी १% पर्यंत घसरला. याचा ताण रुपयावरुन दिसतो कारण तो ढासळताना दिसतो. त्याने प्रतिडॉलर ८५ रु असून अजूनही तो वाढण्याची शक्यता आहे. रिझर्व्ह बँकेचे नवे गवर्नर संजय मल्होत्रा ना जागतिक प्रवाहाच्या विपरीत त्यांच्या पतधोरणाची दिशा राखता येणार नाही. चलनवाढीची डोकेदुखी शमताना दिसत असताना त्यांना अर्थव्यवस्थेच्या विकासास पाठबळाची भूमिका त्यांना घ्यावी लागेल. रुपयातील अस्थिरता, बाजारातील अस्थिरता, चलनवाट या बाजूने ताप कायम असला तरी येत्या काळमध्ये या स्थितीबाबत आणखी काही वाईट घडण्याऐवजी सुधाराचीच शक्यता दिसून येते. त्यामुळे फेब्रुवारीतील पहिलेवहिले पतधोरण निर्धारित समितीच्या बैठकीतून ते या बदललेल्या दृष्टीकोनाचा प्रत्यय देतील त्यामुळे फेब्रुवारी २०२५ पासून भारतातही व्याजदर कपातीचे पर्व सुरु होण्याची दाट शक्यता आहे.

# विशेष तरतूदी सिक्कीम मिझोराम अरुणाचल.

सिक्कीम राज्यात अनेक वर्षे नामग्याल घराण्याची सत्ता होती. १९४७ नंतर भारतास स्वातंत्र्य मिळाले व सिक्कीम राजाने भारतासोबत करार केला. यानुसार सिक्कीम संरक्षीत राज्ये आले त्याअनुसार संरक्षण परराष्ट्र धोरण, संदेशवहन याबाबत भारत सरकार निर्णय घेईल बाकी बाबतीत सिक्कीमला स्वायत्तता असेल असा करार व संरक्षित राज्याची अट भारताने मान्य केली. सिक्कीमला लागून तिबेट चीनची सीमा लागून असल्याने राज्यास महत्व प्राप्त होते. चीनच्या आक्रमक कारवाया सूरु केल्याच होत्या. अशा अवस्थेत १९५९ साली १४वे दलायी लामा पं. नेहरूंना भेटले व तिबेटमधील निर्वासीतांचा प्रश्न मांडला नेहरूंनी स्वागत केले भारतासाठी ही वागणूक सिक्कीमच्या पथ्यावर पडली त्यामूळे १९७४ साली जेव्हा भारतात सार्वमत घेण्यास जेव्हा बहुमत घेतले. तेव्हा ९७% लोकांनी भारतात सामिल होण्याला कौल दिला. १९७५ साली अधिकृतपणे भारताचे सिक्कीम २२वे राज्य बनले या राज्यासाठीच्या विशेष तरतुदी कलम ३७१ (च) मध्ये आहेत. त्यानुसार विधानसभा, लोकसभा यांच्या जागा निर्धारित केल्या सिक्कीममधील विविध समुदायांना प्रतिनिधीत्व मिळेल अशा तऱ्हेने या तरतूदी आखलेल्या आहेत.

मिझोरामची कहाणी सिक्कीमपेक्षा बरीच वेगळी होती मिझो जमातीचे वर्चस्व असलेला हा भाग ब्रिटीशांनी १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात काबिज केला. स्वातंत्र्य मिळ-त्यानंतर हा भाग आसामच्या एक जिल्हा बनला. या भागात १९५९ साली दुष्काळ पडला व लोकांना जगणे अशक्य झाले उधळत्या मिझो नॅशनल फ्रंटने १९६६ साली उठाव केला. पण भारत सरकारने तो मोडून काढला व अशांतता ~~मिझो~~ वाढत गेली. ईशान्य भारताची पुनर्रचना करणारा कायदा झाला. तेव्हा १९७२ साली मिझोरामला केंद्रशासित प्रदेश

च्या दर्जा मिळाला. इथला वाढता असंतोष लक्षात घेता या प्रदेशास अशांत प्रदेश असे १९५८ साली घोषीत केले. आसाम सरकारकडून आपल्याकडे दुर्लक्ष केले जातेय ही जनभावना मिझो नॅशनल फ्रंटने निर्माण केली पर्यायाने मिझोराम शांततेचा करार १९८७ साली संमत झाला आणि मिझोराम हे देशातील २३ वे राज्य उदयास आले. त्यासाठी कलम ३७१ (G) मध्ये तरतूदी करण्यात आल्या आणि मिझो जमातीच्या प्रथा परंपरांचे रक्षण करीत कायद्याची अंमलबजावणी होईल असे घोषीत केले. १९८७ साली मिझोराम राज्य अस्तित्वात आले याच वर्षी अरुणाचल प्रदेशाला स्वतंत्र राज्याची मान्यता दिली. अरुणाचल भारतासाठी अत्यंत महत्वाचे आहे कारण भारत-चीन मॅकमोहन सीमारेषा येथेच आहे ही सीमा रेषा आखली सन १९१२/१३ साली. तेव्हाही चीनला ती अमान्य होती. भारत- चीन १९६२ च्या युद्धात अरुणाचलप्रदेशाचा बराच भाग चीनने ताब्यात घेतला. पुढच्याच वर्षी भारताने तो परत मिळविला. मात्र चिनच्या सततच्या आक्रमक पवित्र्यामुळे भारतास अरुणाचल बाबत सावध भुमिका घ्यावी लागते. याच वर्षी चीनने अरुणाचलवर कब्जा करुन तो त्याच्या नकाशात दाखविला आहे. या राज्यासाठीही कलम ३७१ (H) मध्ये विशेष तरतूदी केलेल्या आहेत त्यानुसार तेथील राज्यपालावर विशेष जबाबदारी सोपविली आहे. तसेच प्रतिनिधीत्वाचा विचार करुन विधानसभेची सदस्य संख्या ठरविली आहे. अरुणाचलप्रदेशाला उगवत्या सूर्याचा प्रदेश असे म्हंटले जाते कारण सर्वात आधी येथे सुर्योदय होतो. युध्दजन्य परिस्थीतीत सापडलेल्या प्रदेशात शांततेचा सूर्य कधी उगवेल हे माहित नाही. मात्र भारताने यासाठी विशेष तरतूदी घटनेत केल्या ही बाब पण लक्षात घेणे महत्वाचे आहे.